**<u>सभापतीस्थानी - माननीय सभापती</u>**

**<u>तोंडी उत्तरे</u>**

**ता. विक्रमगड, केव ग्रामपंचायतीचे व पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष व ग्रामसेवक यांनी पाणीपुरवठा योजनेचा साडे आठ लाख रुपयांचा निधी हडप केल्याबाबत**

**(1) * 24652 श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त, श्री. धनाजी साठे, श्री. रमेश निकोसे, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री.नितीन गडकरी, श्री.संजय केळकर, श्री.रामनाथ मोते** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) विक्रमगड तालुक्यात केव ग्रामपंचायतीचे पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष आणि ग्रामसेवक यांनी गावासाठी पाणीपुरवठा योजनेच्या साडे आठ लाख रुपयाच्या निधीचा अपहार केल्याची घटना दिनांक 24 डिसेंबर, 2006 रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात येत आहे वा आली आहे,
(3) अपहार केलेल्या रकमेची वसूली करण्यात आलेली आहे काय, असल्यास, केव्हा व किती रकमेची वसूली करण्यात आली आहे,
(4) उक्त रकमेची वसूली करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व यासाठी अजून किती कालावधी लागणार आहे ?

**श्री.अजित पवार** : (1) होय. तथापि सदर घटना ऑक्टोबर, 2005 मध्ये उघडकीस आली आहे.
(2) विस्तार अधिकारी पंचायत समिती विक्रमगड यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत सदर योजनेचे कोणतेही काम न करता ग्रामसेवक व अध्यक्ष, केव यांनी वेळोवेळी खात्यातून रक्कम काढून अपहार केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे ग्रामसेवक यास दिनांक 21 ऑक्टोबर, 2005 रोजी सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्याचे विरुद्ध खाते निहाय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

तसेच ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व ग्रामसेवक यांचेविरुद्ध मनोर पोलीस ठाणे येथे दिनांक 19 डिसेंबर, 2006 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना अनुक्रमे दिनांक 19 व 20 जानेवारी, 2007 रोजी पोलिसांनी अटक करुन न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दिनांक 22 जानेवारी, 2007 रोजी जामिनावर सोडले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.
(3) नाही. सदर प्रकरण न्यायालयात न्याय प्रविष्ठ असल्याने संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व ग्रामसेवक यांचेकडून अपहार करण्यात आलेल्या रक्कमेची वसूली करण्यात आलेली नाही. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...... ए 2 ...

ता.प्र.क्र. 24652 .....

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या उत्तरात म्हटले आहे की, सदर प्रकरणी ग्रामसेवक यास 21 ऑक्टोबर 2005 रोजी सेवेतून निलंबित करण्यात आले आहे, म्हणजे त्याला आता दीड वर्ष झाले आहे तरीही या प्रकरणाची खातेनिहाय चौकशी का पूर्ण करण्यात आलेली नाही. तसेच सदर ग्रामसेवक सध्या सेवेमध्ये आहे का ? त्याचप्रमाणे हे प्रकरण ऑक्टोबर 2005 मध्ये उघडकीस आले मात्र या प्रकरणी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यास एक वर्षाचा कालावधी लागण्याचे कारण काय ? गुन्हा दाखल करण्यास विलंब लावणाऱ्यावर शासन कोणी कारवाई करणार आहे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, यामध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडून आपण चौकशी केली. आता सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या गोष्टीला जरा उशीर लागला आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या प्रकरणी तक्रार करण्यासाठी वा पोलीस केस करण्यासाठी ज्या कोणी संबंधितांनी उशीर लावला आहे त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, या निमित्ताने मला आणखीही एक गोष्ट आपल्याला सांगावयाची आहे की, अलिकडच्या काळामध्ये ग्रामीण पाणीपुरवठा आणि स्वच्छता समित्या स्थापन केल्या आणि त्यांच्या अध्यक्ष व सचिवांमार्फत आपण त्यांना त्या ठिकाणी असे पैसे वगैरे देत असतो. त्यामध्ये ठाणे जिल्ह्यात बरेच गैरव्यवहार झाल्याचे लक्षात यावयास लागले आहे. त्यामुळे लवकरच राज्य सरकार यामध्ये उप अभियंता, जिल्हा परिषद यांची तरी त्यात संमती असली पाहिजे अशी अट घालणार आहे. म्हणजे केवळ सचिव आणि अध्यक्षाला हा अधिकार न देता कोठला तरी शासनाचा अधिकारी मध्ये ठेवून त्याच्याकडे याबाबत जबाबदारी सोपविली गेली म्हणजे काम कोठपर्यंत झालेले आहे, पैसे काढण्याइतपत काम तेथे झालेले आहे काय ? वगैरे पाहूनच पैसे काढता येतील अशी पद्धत लागू करण्याचा शासनाचा विचार आहे. कारण आता याच प्रकरणामध्ये त्यांनी 8 लाख 54 हजार रूपये बँकेतून काढले पण तेथे काम कोठल्याही प्रकारे झालेले नव्हते. सभापती महोदय, लोकांनी स्वत:च्या गावातील पिण्याच्या पाण्याची योजना करावी म्हणून आपण हे नवीन धोरण अवलंबिले आहे. पण त्याचा गैरफायदा काही लोकांनी चालविला आहे. दुसरा असा विचार याबाबत आम्ही करीत आहोत की, यासाठी जो कोणी अध्यक्ष, सचिव असेल त्याच्याकडून यासाठी बॉण्ड लिहून घ्यावयाचा. जेणे करून आपण अशा अशा प्रकारचा बॉण्ड लिहून दिलेला आहे याचा दबाव त्यांचेवर

...... ए 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राहील आणि ते अशा गोष्टी करण्यास धजावणार नाहीत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा जो तिसरा प्रश्न आहे त्याला उत्तर देताना मी सांगू इच्छितो की, सदर ग्रामसेवक आता बडतर्फच आहे. त्याला कामावर घेतलेले नाही आणि कोर्टामध्ये केस दाखल केलेली असल्याने कोर्ट जो निकाल देईल त्या पद्धतीने कारवाई केली जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, जसजसे अधिकार खालच्या स्तरावरील लोकांना देण्यास सुरूवात केली तसे भ्रष्टाचाराचे प्रमाण हे वरून खाली झिरपत चालले आहे. वरच्या पातळीवर भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार येथे निघतात पण त्याबाबत परिणामकारक कारवाई केल्याचे दिसून येत नाही आणि त्यामुळे आता हे प्रकार झिरपत झिरपत गाव पातळीपर्यंत पोहोचले आहेत. परिणाम स्वरूप अशा प्रकारे पाणी पुरवठा योजनांसाठी पैसे खर्च करतो पण त्यानंतरही तेथे पाणी मिळत नाही. त्यामध्ये भ्रष्टाचार होतात. त्या योजनेकडे दुर्लक्ष केलेले असते किंवा कनिष्ठ दर्जाचे काम तेथे झालेले असते वा जे मटेरिअल त्यासाठी वापरले जाते ते अत्यंत खालच्या दर्जाचे, क श्रेणीचे किंवा त्याही पेक्षा खालच्या दर्जाचे असते. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... बी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24652...

श्री. मधुकर सरपोतदार....

परिणामी गावातील जनतेला पाणी मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असे आपण सांगितले ते आम्हाला मान्य आहे. परंतु या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी यासाठी आपल्याला काही व्यवस्था करता येईल काय? योजनेचे पैसे खालच्या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचतात. त्या पैश्यांचा विनियोग त्याच कामासाठी व ते काम उत्कृष्ट, दर्जेदार करण्यासाठी होईल यासाठी आपण उपाय योजना करणार आहात काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सुरुवातीच्या काळात अशाप्रकारच्या तक्रारी मोठया प्रमाणात आल्यानंतर राज्य सरकारने त्याबाबत भूमिका घेतली. आणि गावातील लोकांची ग्रामसभा घेऊन त्या ग्रामसभेला 40 टक्के उपस्थिती असेल तर त्या उपस्थित असलेल्या लोकांमध्ये एक समिती स्थापन करावयाची. त्या समितीचे अध्यक्ष, सचिव आणि सदस्य निवडावयाचे. काम करण्याकरिता बाहेरचा कॉट्रॅक्टर नेमला तर तो काम दर्जेदार करीत नाही, त्याच्या कामाबाबत तक्रारी येतात. त्यामुळे गावातील लोकांची समिती असल्यामुळे त्या समितीमार्फत काम केले तर कामाचा दर्जा चांगला राहील आणि ही कायम पाणीपुरवठा योजना गावामध्ये रहाणार असल्यामुळे चांगल्या दर्जाचे काम करुन घेतले जाईल. यामध्ये गैरव्यवहाराच्या बाबी होत असल्यामुळे त्याला आळा बसावा याकरिता काम करणाऱ्या एजन्सीकडून चांगल्या दर्जाचे काम केले जाईल अशाप्रकारचा बाँड लिहून घेण्यात येईल. त्याचबरोबर बँकेमधून पैसे काढण्यासाठी चेकवर डेप्युटी इंजिनिअरची सही आवश्यक करण्यात आली आहे. यापूर्वीचे चेक अध्यक्ष व सचिव यांच्या नावाने निघत होते. त्यामध्ये ग्रामसेवकाला चुकून इन्व्हॉल्व करण्यात आले, वास्तविक त्याच्या सहीची गरज नव्हती. त्यामुळे मी सुरुवातीला सांगितले आहे की, यामध्ये जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करु. तसेच, यापुढील काळात अशाप्रकारच्या योजनेमध्ये गैरव्यवहार होऊ नये याकरिता बाँड लिहून घेणे इत्यादी प्रकारची खबरदारी घेणे घेण्यात येईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, राज्याच्या ग्रामीण भागामध्ये पाणी पुरवठा व शाळा बांधकाम करण्यासाठी बांधकामाशी संबंध नसलेल्या व्यक्तिच्या सहभागामुळे गैरव्यवहार होत असल्याचे दिसून येते. प्रश्न असा आहे की, या कामामध्ये इंजिनिअरींग केडरला समाविष्ट करुन ती कामे करण्यात आली पाहिजेत. फायनल ॲप्रुव्हलच्या वेळी त्या व्यक्तिचा सहभाग घेण्यात यावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MHM/

ता.प्र.क्र. 24652...

श्री. श्रीकांत जोशी....

उदा. शाळा बांधकाम असेल तर त्यामध्ये मुख्याध्यापकांना इन्व्हॉल्व्ह करावे. अशाप्रकारे इंजिनिअरींग सेक्शनकडे हे काम सोपविण्याचे धोरण आपण स्वीकारणार काय?

श्री. अजित पवार : सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिक्‌ाणी संबंधित ग्रामसेवकाला 21.10.2005 रोजी निलंबित करण्यात आले. अद्यापि त्या ग्रामसेवकाची चौकशी सुरु आहे. खातेनिहाय चौकशी 120 दिवसांच्या आत पूर्ण झाली पाहिजे ती अद्यापि पूर्ण झाली नाही. उत्तरामध्ये म्हटले आहे की, न्यायालय जो निकाल देईल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल. याठिकाणी न्यायालयाच्या निकालाचा काहीही संबंध नाही. खातेनिहाय चौकशी सुरु करुन त्यांचा जो काही निर्णय येईल त्यानुसार शासनाला कारवाई करता येईल. म्हणून ही चौकशी तातडीने पूर्ण करुन संबंधित ग्रामसेवकावर कारवाई करण्यात येईल काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले आहे की, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचेमार्फत करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल प्राप्त झाला असून त्याप्रमाणे ग्रामसेवकावर कडक कारवाई केली जाईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, योजनेमध्ये भ्रष्टाचार होऊ नये याकरिता अध्यक्ष व सचिव यांच्याबरोबर जिल्हा परिषदेच्या उप अभियंत्यांच्या सहीने पेमेंट करण्यात येईल. परंतु ही योजना मंजूर करीत असतांना शासनाने किचकट अटी घातल्या आहेत. त्यामध्ये ग्रामसभेला 40 टक्के ग्रामस्थांची उपस्थिती अनिवार्य आहे. तसेच, त्यांनी सहली काढल्या पाहिजेत, निर्मल गाव योजना केली पाहिजे. अशाप्रकारच्या अटींची पूर्तता केल्यानंतर योजनेला मंजूरी मिळते. या अटी पूर्ण करतांना सरपंच व ग्रामस्थांच्या नाकीनऊ येते. आपण योजनेकरिता 10 टक्के लोकवर्गणी जरुर ठेवली पाहिजे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र24652 (पुढे सुरु...

श्री.भास्कर जाधव (पुढे सुरु..

संबंधित लोकांचा पाणी योजनेमध्ये सहभाग असल्यामुळे ती योजना कशी चालवावी, कशी टिकवावी हे कळते. तसेच या योजनेमधील किचकट अटी आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी थोडीफार सल्लामसलत करावी लागते. या अटींमध्ये सुलभता आणणार आहात काय ?

श्री.अजित पवार : एखादी नवीन गोष्ट राबवत असताना काही त्रुटी राहू शकतात. योजनेमध्ये पारदर्शकता यावी, यामध्ये लोकांचा सहभाग असावा, यासाठी लोकांनी एकत्र यावे आणि या योजनेचे काम चांगले व्हावे अशाप्रकारची आपली कल्पना आहे. त्यामध्ये ज्या अटी घातलेल्या आहेत त्यामध्ये बॉन्ड लिहून घेणे, डेप्युटी इंजिनियर यांची सही घेणे इ. जाचक अटी आहेत. या जाचक अटी असतील त्या काढल्या जातील आणि ही योजना पारदर्शक होण्यासाठी या जाचक अटी असतील तर त्या तपासून घेऊन त्या काढल्या जातील.

--

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्न क्रमांक 28095**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

---

**ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगाराबाबत घरबसल्या**
**रोजगाराची माहिती देणारी वाहिनी बंद पडल्याबाबत**

**(3) * 24854 श्री. श्रीकांत जोशी** : सन्माननीय **रोजगार व स्वयंरोजगारमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 21 डिसेंबर, 2006 रोजी वा त्या सुमारास ग्रामीण भागातील बेरोजगारांना घरबसल्या रोजगाराची माहिती मिळावी या हेतूने इंटरनेटवर सुरु करण्यात आलेली रोजगार वाहिनी बंद पडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,

(3) चौकशीनुसार रोजगार वाहिनी चालु ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री.राणा जगजितसिंह पाटील ,श्री. सतीश चतुर्वेदी यांच्याकरिता** : (1) होय,

(2) व (3) 'रोजगार वाहिनी' ही वेबसाईट एन.आय.शी. पुणे या केंद्र शासनाच्या कार्यालयामार्फत कार्यान्वीत करण्यात येत आहे. त्या संस्थेकडून माहिती घेतली असता सध्याच्या सर्व्हरच्या क्षमतेच्या तुलनेत डाटाबेसमधील माहिती जास्त होत असल्याने 'रोजगार वाहिनी' बंद पडत आहे. त्यामुळे जादा क्षमतेचा सर्व्हर खरेदी करण्यास शासनाने मान्यता दिली आहे व सर्व्हर खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सध्या वापरात असलेल्या डीबी-2 व्हर्जन 7.2 या सॉप्टवेअरला डाटाबेसच्या व्याप्तीमुळे मर्यादा येत असल्याने पर्यायी ॲडव्हान्स सॉप्टवेअरची चाचणी व खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ KGS/ MHM/

ता.प्र.क्र.28854....

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, बेरोजगारांना न्याय मिळण्यासाठी सरकार काहीच करत नाही. मी या ठिकाणी छोटा लॅपटॉप आणणार होतो, म्हणजे आपल्याला पहाता आले असते. बेरोजगारांना घरबसल्या रोजगाराची माहिती मिळावी या हेतूने इंटरनेटवर वेबसाईट सुरु केली परंतु ती वेबसाईट उपलब्ध नाही. 25 हजारपेक्षा जास्त सरकारी नोकऱ्या रिक्त आहेत, दीड लाख जागा भरणार आहोत अशी घोषणा केली जाते, नोकऱ्यांची जाहिरात वेबसाईडवर देण्यात येत असल्याचे सांगितले जाते. महाराष्ट्र शासनाची वेबसाईट ww.Mahstshtra government.in/career wahini अशी आहे. परंतु ही वेबसाईट ओपनच होत नाही, त्यामुळे बेरोजगारांनी काय करावे ? हे समजत नाही. अधिकाऱ्यांकडे चौकशीसाठी गेले तर त्यांच्याकडून सांगण्यात येते की, ही माहिती वेबसाईटवर दिलेली आहे, तुम्ही वेबसाईवर पहावी. परंतु वेबसाईड चालूच नाही. ही वेबसाईट ज्या अधिकाऱ्यानी सुरु केली नाही, त्यांच्यावर कडक कारवाई करणार आहात काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : वेबसाइट एनआयसीमार्फत सुरु केलेली आहे. एनआयसी म्हणजे नॅशनल इन्फोर्मेटिक सेंटर. सन 2002 साली सर्व्हर घेतला होता. डीबी-2, लिनेक्स व्हर्जनचे सॉफ्टवेअर वापरण्यास सुरुवात केली होती. 36 जी.बी.ची हार्ड डिस्क होती. दीड वर्षापासून डेटा भरण्याचे काम चालू होते. 40 लाख अर्ज म्हणजेच लाईव्ह रजिस्ट्रेशन ...ज्याला आपण एल.आर. म्हणतो ते काम चालू होते. त्यासाठी 220 जी.बी.स्पेस लागते परंतु जुन्या सर्व्हरवर 145 जी.बी. स्पेस उपलब्ध आहे. त्यामुळे त्यामुळे डाटा भरण्यास सुरुवात केली असताना सर्व्हर क्रॅश झाला. आता सर्व्हर नवीन घ्यावा लागणार आहे, त्याची ऑर्डर देण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 24854 ...... श्री. राणा जगजितसिंह पाटील...

एप्रिल अखेरपर्यंत सिंगापूरहून सर्व्हर येईल अशी अपेक्षा आहे. आपण सॉफ्टवेअर अपग्रेड करण्याचे ठरविले आहे. कारण नवीन सर्व्हरवर जुने सॉफ्टवेअर चालणार नाही. मे अखेरपर्यंत ही साईट परत अप होईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही. तोपर्यंत एन.आय.सी.मार्फत सॉफ्टवेअर अपग्रेड करणार आहोत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, संबंधितांना माहिती मिळावी यादृष्टीने शासन काय प्रयत्न करणार आहे ? दीड लाख पदे भरावयाची आहेत. त्याची काय व्यवस्था करणार ? त्यामध्ये सुध्दा काही तांत्रिक दोष निर्माण झाला तर शासन काय करणार ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, सध्याच्या सर्व्हरच्या क्षमतेच्या तुलनेत डाटाबेसमधील माहिती जास्त होत असल्याने "रोजगार वाहिनी" बंद पडत आहे. ही माहिती त्या सर्व्हरच्या कॅपॅसिटीपेक्षा जास्त असणार आहे यादृष्टीने सुरुवातीला त्याची दक्षता का घेतली नाही ? माननीय मंत्रिमहोदयांनी आता जे सांगितले ते बरोबर आहे असे गृहीत धरले तरी तोपर्यंत बेरोजगारांना माहिती कळण्यासाठी काय व्यवस्था करणार ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यामध्ये दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. पहिली बाब अशी की, आपण जी माहिती पुरवावयाची आहे ती माहिती 2002 साली पुरविण्याचे ठरविले होते. त्यादृष्टीने आपण इंटर्नल माहितीसाठी 2006 साली "रोजगार मित्र" योजना सुरु करण्याचे ठरविले. ती योजना आफिशियली लॉंच झालेली नाही. इंटर्नल डेटा अपलोडिंगचे काम चालू असताना सर्व्हर क्रॅश झाला. वेबसाईट उपलब्ध असली तरी ती ऑफिशियली लॉंच झालेली नाही. डाटा जास्त असल्यामुळे जोपर्यंत सर्व्हर मिळत नाही तोपर्यंत जे 40 लाख अर्ज आहेत किंवा जे लाईव्ह रजिस्ट्रेशन आहे त्याची माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही.

श्री. श्रीकांत जोशी : बेरोजगारांची जी फसवणूक होते त्यादृष्टीने हा प्रश्न विचारलेला आहे. प्रत्येक जाहिरातीमध्ये अधिक माहितीसाठी या वेबसाईटवर संपर्क साधावा असे म्हटले आहे. यामध्ये शासनाची चूक झालेली आहे. त्यामुळे बेरोजगारांची फसवणूक झालेली आहे. आपण एन.आय.सी.कडे जबाबदारी देतो परंतु त्यापेक्षा गुगल किंवा अन्य मोठ्या कंपन्या आहेत त्यांच्या माध्यमातून मार्ग काढू शकतो. एन.आय.सी. आऊटडेटेड झालेली आहे. ज्या गतीने सॉफ्टवेअर बदलत आहेत ते पाहता एन.आय.सी.वर अवलंबून न राहता गुगल किंवा अन्य कंपन्यांकडे ॲप्रोच करणार काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 24854 ......

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सर्व्हर होस्टींगचे काम दुसरीकडे देता येईल. परंतु हे सॉफ्टवेअर आपण एन.आय.सी.कडून डेव्हलप करुन घेत आहोत. दुसरे जे सॉफ्टवेअर डीबी 9.1 व्हर्शन आहे त्याची किंमत 60 ते 65 लाखापर्यंत आहे. यांच्या फ्री वेअरमध्ये दुसरे सॉफ्टवेअर पोस्ट ग्रेस आहे ते आम्हाला फुकट मिळते. हे सॉफ्टवेअर डेव्हलप करुन घ्यावयाचे म्हटले तर आपल्याला एन.आय.सी.कडे जावे लागेल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

**नंदुरबार जिल्ह्यातील तापी खोऱ्यातील प्रकाशा, सारंगखेडा व सुरवाडे येथील बॅरेजचे काम अत्यंत मंदगतीने सुरु असल्याबाबत**

**(४) * २८०६९ श्री. चंद्रकांत रघुवंशी , श्री. संजय दत्त :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकासमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील तापी खोऱ्यातील प्रकाशा, सारंगखेडा व सुरवाडे येथील बॅरेजचे काम अत्यंत मंदगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणते नियोजन केले आहे,

(४) अद्याप, याबाबत वरील कार्यवाहीस विलंब होत असल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता :** (१) नाही.

या महामंडळांतर्गत प्रकाशा बॅरेज, सारंगखेडा बॅरेज (जि. नंदुरबार) व सुलवाडे बॅरेज (जि. धुळे) या प्रकल्पांची कामे खानदेश पॅकेज अंतर्गत उपलब्ध निधीतुन वेगाने प्रगतीत आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) या महामंडळाला बॅरेजची कामे सत्वर पूर्ण होण्याच्या दृष्टीने खानदेश पॅकेज अंतर्गत निधी उपलब्ध करुन दिलेला आहे व त्यातून झालेला खर्च व उर्वरित किंमत इत्यादी तपशील खालीलप्रमाणे आहे.

**(रक्कम रुपये लक्ष)**

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्पाची कामाची अद्ययावत किंमत | खानदेश पॅकेज अंतर्गत उपलब्ध निधी २००६-२००७ | खानदेश पॅकेज निधीतून कामावर झालेला खर्च २०.२.०७ अखेर | २०.२.०७ अखेर कामावर झालेला एकूण खर्च | कामाची उर्वरित किंमत |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| प्रकाशा बॅरेज | १८३३३.०० | ५५००.०० | १६६४.३५ | १०९९८.०० | ३४९९.०० |
| सारंगखेडा बॅरेज | १९३७२.०० | ५५००.०० | ४६८९.०० | १३९०२.०० | ४६५९.०० |
| सुलवाडे बॅरेज | १८५२४.०० | ५५००.०० | ३९९९.०० | १३२३१.०० | ३७९२.०० |
| निधीच्या उपलब्धतेनुसार सन २००७-२००८ मध्ये तीनही बॅरेजेसचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. | | | | | |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

ता.प्र.क्र. 28069 ...

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, पहिल्यांदा प्रकाशा बॅरेजचे काम पूर्ण करण्याचे शासनाचे धोरण असताना अजूनही या बॅरेजचे काम पूर्ण झालेले नाही. यामध्ये विलंब होण्याचे कारण काय ? हे काम केव्हा पूर्ण होणार आहे ? या वर्षीच्या पावसाळ्यात बॅरेजमध्ये पाणी अडवले जाईल काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मी या तीनही बॅरेजना भेटी दिलेल्या आहेत. प्रकाशा, सारंगखेडा आणि सुलवाडे या तीनही बॅरेजची पाहणी केली. साधारणत: यंदाच्या पावसाळ्यामध्ये या तीनही बॅरेजमध्ये पाणी अडवले जावे अशा प्रकारचा प्रयत्न जलसंपदा विभागाचा आहे. सुरुवातीच्या काळामध्ये प्रकाशा बॅरेजच्या बाबतीत थोडेसे काम रेंगाळले होते परंतु आता जलद गतीने काम सुरु झालेले आहे आणि तेथील संबंधित कॉन्ट्रॅक्टर आणि बाकीच्या अधिकाऱ्यांना सांगितलेले आहे की, यातून साधारणत: प्रत्येकी आठ आठ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे त्यामुळे यंदाचा पावसाळा ज्यावेळी संपेल त्यावेळी हे तीनही बॅरेज पूर्ण झाले पाहिजेत. त्या ठिकाणी गेट बसले पाहिजेत आणि पाणी अडले गेले पाहिजे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 11:20

(ता.प्र.क्र. 28069...

या संदर्भात निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही असे आम्ही कालच संबंधितांना सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांना मी सांगू इच्छितो की, सप्टेंबरमध्ये पावसाळा संपल्यानंतर या तिन्ही बॅरेजमध्ये दरवाजे टाकून पाणी अडविले जाणार आहे. प्रकाशा आणि सुलवाडे बॅरेजमध्ये शंभर टक्के पाणी अडले जाणार आहे. परंतु सारंगखेडा बॅरेजमध्ये पाणी अडविण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यासाठी टाईम टेबल ठरवून दिलेले आहेत. सारंगखेडा बॅरेजचे खोदकाम कोल-ग्राऊटीं इत्यादी कामे अंतिम टप्प्यामध्ये आलेली आहेत. त्यामुळे त्याही बॅरेजमध्ये पाणी अडविण्याच्या दृष्टीने कोणती अडचण राहील असे मला वाटत नाही.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सहकार खात्यात तालुका स्तरावरील उपनिबंधक, सहायक निबंधक व तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५) * २४८७१ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील :** सन्माननीय **सहकारमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकार खात्यात तालुकास्तरावरील उपनिबंधक, सहाय्यक निबंधक व तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच कर्मचारी वृंद अपुरा असल्यामुळे सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवणे तसेच पतसंस्था व नागरी बँकांच्या विरुध्द चौकशी करण्यास विलंब होतो, हे ही खरे आहे काय,,

(३) असल्यास, रिक्त जागा त्वरीत भरण्यासंबंधी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. पतंगराव कदम** : (१) होय,

(२) होय,

(३) वर्ग-१ व वर्ग-२ मधील सरळसेवेने नियुक्ती करावयाच्या पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आले आहे. तसेच पदोन्नतीची रिक्त पदे भरण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग व शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. त्यांच्या मान्यतेनंतर पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने जाहिरात देवून अर्ज मागविणे, परिक्षा घेणे, मुलाखती इ. बाबी संदर्भात कार्यवाही चालू आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : वर्ग-1 आणि वर्ग-2 मधील सरळसेवेने आणि पदोन्नतीने भरावयाची पदांची संख्या किती आहेत ? पदे भरण्यासंबंधीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे केव्हा पाठविलेला आहे ?

डॉ. पतंगराव कदम : अपर निबंधकाची 3 पदे भरावयाची आहेत. सह निबंधकाची मंजूर पदे रिक्त नाहीत. तरीही आणखी 20 अधिका-यांची मागणी केलेली आहे. उप निबंधकाची 17 पदे रिक्त असून त्यापैकी 15 पदे सरळसेवेने आणि 2 पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सहाय्यक निबंधकाच्या एकूण 237 पदांपैकी 113 पदे सरळसेवेने आणि 124 पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. लेखापरीक्षण विभागामध्ये अपर निबंधकाचे 1 पद रिक्त आहे. विशेष लेखापरीक्षक वर्ग-1ची 38 पदे आहेत. त्यापैकी 29 पदे सरळसेवेने आणि 9 पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. विशेष लेखा परीक्षक वर्ग-2ची 116 पदे रिक्त आहेत. त्यापैकी 70 पदे सरळसेवेने आणि 46 पदे

...3..

पदोन्नतीने भरावयाची आहेत. वर्ग-3 आणि वर्ग-4ची पदे भरण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधकांना सूचना दिलेल्या आहेत. त्यांनी जाहिराती दिलेल्या आहेत. उमेदवारांची परीक्षा आणि मुलाखती घेऊन ही पदे भरली जातील. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेऊन ही सर्व पदे 1 महिन्याच्या आत भरली जातील. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जी पदे भरली जातात त्याबाबतीतही आम्ही त्यांच्याकडे मागणी केलेली आहे. परंतु महाराष्ट्र लोकसेवा आयोग आमच्या अखत्यारित येत नाही.

प्रा. शरद पाटील : अनेक वर्षे ही पदे रिक्त आहेत. सहकारी बँकांची आणि नागरी सहकारी पतसंस्थांची 101ची अनेक प्रकरणे उप निबंधकांकडे येत असतात. पदे रिक्त असल्यामुळे 101च्या प्रकरणांचा निकाल लागण्यास वेळ लागतो. ही सर्व पदे 1 महिन्याच्या आत भरली जातील असे मंत्री महोदयांनी सांगितले. तेव्हा या सहकार खात्यातील अधिकारी आणि कर्मचा-यांची रिक्त पदे एक महिन्याच्या आत भरली जातील काय ?

डॉ.पतंगराव कदम : अधिका-यांची पदे भरल्यानंतर ते अधिकारी सर्व कार्यालयांना दिले जातील.

श्री. श्रीकांत जोशी : ही पदे भरण्याच्या बाबतीत सहकार मंत्र्यांची सामूहिक जबाबदारी आहे.एमपीएससीकडे 25 हजार पदांची मागणी केलेली आहे. एमपीएससीची केवळ 3 हजार पदे भरण्याची कॅपॅसिटी आहे. याप्रमाणे भरती करावयाची झाल्यास 25 हजार पदे भरण्यासाठी 8 वर्षे लागतील. माननीय मंत्री महोदयांनी एमपीएससी त्यांच्या अखत्यारित येत नाही असे सांगितले. एमपीएससी हे महाराष्ट्र शासना पेक्षा मोठे नाही. तेव्हा पदे भरण्याच्या बाबतीत एमपीएससीची व्यवस्था कमी पडत असेल तर ही पदे भरण्याच्या बाबतीत सरकार कोणती पर्यायी व्यवस्था करणार आहे ?

डॉ. पतंगराव कदम : एमपीएससीच्या बाबतीत मान्यता मिळत नाही. पदोन्नतीची पदे भरता येतील. उर्वरित जागा भरण्यासंबंधी पर्यायी व्यवस्था काय करता येईल हे पाहून तसा प्रस्ताव आम्ही मंत्रिमंडळापुढे ठेवू.

...नंतर श्री.भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24871...........

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, पदे भरण्याची मागणी सामान्य प्रशासन विभागामार्फत लोकसेवा आयोगाकडे केलेली आहे. आज सा.प्र.विभागामध्ये 15 सचिव कार्यरत आहेत, ते काय काम करतात याची मला कल्पना नाही. प्रश्न असा आहे की, कोकणामध्ये विशेषत: सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयामध्ये डीडीआर या पदावर नियुक्त केलेले अधिकारी एका वर्षापेक्षा जास्त काळ टिकत नाहीत, त्यांची लगेच बदली केली जाते. सिंधुदुर्ग जिल्हयात सहकार विभागातील 75 टक्के पदे रिक्त आहेत. किमान वाजवी पदे त्या जिल्हयामध्ये मेंटेन करण्याची जबाबदारी शासनाची आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयातील सहकार विभागामधील रिक्त पदे त्वरित भरण्याच्या दृष्टीने शासन काय उपाययोजना करणार आहे?

डॉ.पतंगराव कदम : एकूण जिल्हयातील कामाचा वर्कलोड पाहता जी पदे कार्यरत आहेत ती विचारात घेऊन पदे भरण्याचा निर्णय घेतला जातो. परंतु सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयामध्ये जी रिक्त पदे आहेत ती त्वरित भरली जाणे आवश्यक आहे. एप्रिल, मे व जून या तीन महिन्यात रिक्त पदे भरली जातात, बदली करण्यात येते. त्यामुळे येत्या तीन महिन्याच्या आत सर्व पदे भरली जातील.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

05-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) F.2

**परांडा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) साकत मध्यम प्रकल्पासाठी घेतलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत**

**(६) * २८७३९ श्री. विक्रम काळे :** सन्माननीय **महसूलमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परांडा तालुक्यातील (जि. उस्मानाबाद) साकत मध्यम प्रकल्पाच्या उजव्या कालव्यासाठी तेरा वर्षापूर्वी घेतलेल्या जमिनीचा मोबदला अद्याप शेतकऱ्यांना देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) जमिनीचा मोबदला देण्यात यावा यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी दिनांक १३ फेब्रुवारी, २००७ पासून भूसंपादन कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांनी जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) साकत मध्यम प्रकल्पासाठी एकूण ४२ खातेदाराच्या जमिनी संपादीत झालेल्या होत्या. त्यापैकी ३४ खातेदारांना मावेजाचे वाटप पूर्ण झालेले आहे. उर्वरित ८ खातेदार हे अवार्ड मध्ये देवस्थान/मस्जीदची नोंदी असल्यामुळे त्यांना कॅश अलाऊन्स देय करण्यासाठी विभागीय आयुक्तांनी दिनांक २ फेब्रुवारी, २००७ रोजी मंजूरी दिलेली आहे.
(३) होय.
(४) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी संबंधितांना ८ टक्के कॅश अलाऊन्स देण्याबाबतचे मंजूरी आदेश दिनांक २ फेब्रुवारी, २००७ रोजी पारित केले आहेत. कॅश अलाऊन्स तातडीने अदा करण्याबाबत शासन स्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, कॅश अलाऊन्स देय करण्यासाठी विभागीय आयुक्तांनी दिनांक २ फेब्रुवारी, २००७ रोजी मंजुरी दिल्याचे उत्तरात म्हटले आहे. आज एप्रिल महिन्याची ५ तारीख आहे. आजची सद्यस्थिती काय आहे याची माहिती मंत्रीमहोदय सभागृहाला देतील का?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, कॅश अलाऊन्स दिनांक २.२.२००७ रोजी दिला आहे. येत्या १५ दिवसात संबंधितांना ते पैसे अदा करण्यात येतील.

श्री.विक्रम काळे : महाराष्ट्र राज्यामध्ये शेतकरी बांधव पाझर तलाव, विहिरींच्या कामासाठी शेत जमीन देत असतात. त्यांना मोबदल्याची रक्कम वेळेवर दिली जात नाही अशी अनेक उदाहरणे आहेत. शासन दरबारी त्यांना हेलपाटे घालावे लागतात. यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी शासनाने धोरण आखले आहे का?

..३..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२८७३९...........

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. अनेक ठिकाणी जमिनी संपादित केल्यानंतर वेळेवर मोबदला मिळत नाही. ॲवार्ड जाहीर झाल्यानंतर सुध्दा पैसे मिळण्यास विलंब होतो अशी मागील काळात परिस्थिती होती. अलिकडच्या काळात विशेषत: पाटबंधारे विभागाच्या संदर्भात आपण तरतूद करीत आहोत. मागील वर्षापासून पुनर्वसन विभागाच्या माध्यमातून स्वतंत्रपणे ८० कोटी रुपयांची तरतूद या कामासाठी केली होती. यावर्षी सुध्दा जवळपास तेवढीच तरतूद पुनर्वसन विभागाच्या माध्यमातून करीत आहोत.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, भूसंपादन कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केल्याचे उत्तरात मान्य केले आहे. उपोषणकर्त्यांची शासनाच्या प्रतिनिधींनी भेट घेऊन त्यांना काही आश्वासन दिले आहे का? त्यांचे उपोषण अद्यापही सुरु आहे का?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, उपोषण मागे घेण्यात आले आहे. शासनाने निधीची तरतूद केली आहे.

श्री.दिवाकर रावते : मी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना धन्यवाद देतो. त्यांनी शासनाचे धोरण विचारल्यामुळे पुनर्वसन खात्याकडे ८० कोटी रुपये वळते केल्याची माहिती मंत्रीमहोदयांनी दिली. सन्माननीय पुनर्वसन मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. या ८० कोटी रुपयांच्या निधीबाबत शासनाचे निश्चित धोरण काय आहे?

डॉ.पतंगराव कदम : मागील वर्षी तरतूद केलेली ८० कोटी रुपयांची रक्कम पूर्णपणे खर्च झाली आहे. यावर्षी ८० कोटी रुपयांची तरतूद केली असून त्याबाबत नियोजन केले जाईल.

-----------

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**उत्तरप्रदेश सरकारने खाजगी उद्योगांना आकर्षित करण्यासाठी दिलेल्या सवलती**

**(7) * 25084 श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी , श्री. रमेश निकोसे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री.सय्यद जामा** : सन्माननीय **सहकारमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) उत्तरप्रदेश सरकारने खाजगी उद्योगांना आकर्षित करण्यासाठी भाग भांडवलात 10 टक्के मदत, विक्रीकर, उत्पादन शुल्कात सवलत जमिन संपादित करण्यासाठी सहाय्य, साखर वाहतुकीस अनुदान आदी सवलती देण्याचे ठरविले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उत्तर प्रदेश सरकारच्या धर्तीवर साखर कारखान्यांना आकर्षित व गुंतवणूक करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने धोरण आखण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे काय,

(3) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

**डॉ.पतंगराव कदम** : (1) होय.

(2) नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, उत्तरप्रदेशात खाजगी साखर कारखान्यांना शासनाकडून मोठया प्रमाणात सवलती देण्यात आलेल्या आहेत. शासनाने खाजगी साखर कारखान्यांना मोठया प्रमाणात सवलती दिल्यामुळे या ठिकाणी मोठया प्रमाणात गुंतवणूक झालेली आहे. उत्तर प्रदेश सरकारने, खाजगी साखर कारखान्यांना सवलती दिल्यामुळे साखर उत्पादनात तसेच वीज निर्मितीत खूप फायदा झालेला आहे. उत्तर प्रदेश सरकार प्रमाणेच महाराष्ट्र शासन महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना काही सवलती देणार आहे काय? महाराष्ट्रात खाजगी साखर कारखान्यांची किती गुंतवणूक झालेली आहे? केंद्रशासनाने साखर कारखान्यांच्या संदर्भात कोणते पॅकेज जाहीर केलेले आहे व त्याचा फायदा महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना कशा पध्दतीने होणार आहे?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, उत्तर प्रदेश सरकारने खाजगी साखर कारखान्यांसाठी वेगवेगळया कर सवलती दिलेल्या आहेत, पॅकेज दिलेले आहेत. महाराष्ट्र शासनाने सुध्दा गतवर्षी 100 साखर कारखान्यांना पॅकेज दिले होते. साखर कारखान्यांना बाकीच्या सवलती देण्याच्या संदर्भात मंत्रिमंडळाच्या लवकरच विषय मांडला जाणार आहे. कदाचित या आठवडयातच मंत्रिमंडळासमोर साखर कारखान्यांना सवलती देण्याचा प्रस्ताव मांडला जाणार आहे. एकंदर



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MHM/ KGS/ प्रथम श्री. भोगले.. 11:30

**ता.प्र.क्र. : 25084** .........

डॉ. पतंगराव कदम ....

परिस्थितीत साखर उद्योग गडगडायला लागलेला आहे, साखर उद्योग अडचणीत आलेला आहे, ऊस उत्पादन करणारा शेतकरी अडचणीत आलेला आहे त्यामुळे यासंदर्भात निश्चितपणे निर्णय घेण्यात येणार आहे. शासनाने ऊसावरील पर्चेस टॅक्स रद्द करण्याचा निर्णय अगोदरच घेतलेला आहेत. तसेच साखर कारखान्यांच्या संदर्भात जे वेगवेगळे प्रश्न आहेत ते सोडवण्यासाठी या आठवडयात मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मांडून निर्णय घेतला जाईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, उत्तर प्रदेश सरकारने खाजगी उद्योगांना आकर्षित करण्याकरता काही विविध योजना जाहीर केलेल्या आहेत हे महाराष्ट्र शासनाने मान्य केलेले आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, जर उत्तर प्रदेश सरकार खाजगी साखर कारखान्यांसाठी विविध योजना, विविध कर सवलती देऊ शकते तर महाराष्ट्र शासन महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना विविध योजना, विविध सवलती का देऊ शकत नाही?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, यामध्ये दोन विषय आहेत. खाजगी उद्योगांना आकर्षित करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य देशातील पहिले राज्य आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी 1960 मध्ये उद्योगांची तसेच कै. स.गो. बर्वे यांनी एमआयडीसीची निर्मिती केली होती. खरे म्हणजे उद्योजक मुंबई, पुणे या बेल्टमध्येच राहणे पसंत करतात. उद्योगांना सवलती आणि सबसीडी सुध्दा दिली जाते. उत्तर प्रदेश सरकारने खाजगी साखर कारखान्यांसाठी काही सवलती जाहीर केलेल्या आहेत, त्या ठिकाणी आता निवडणुका सुध्दा जाहीर झालेल्या आहेत. उत्तर प्रदेशात खाजगी साखर कारखान्यांना कशा प्रकारे सवलती जाहीर केलेल्या आहेत त्याची माहिती घेऊन त्यांनी ज्या प्रकारच्या सवलती दिलेल्या आहेत त्या सवलती आपल्या साखर कारखान्यांना कशा देता येतील यासंदर्भात शासन जरुर विचार करेल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, परभरणी जिल्हयात 1.5 लक्ष हेक्टर क्षेत्र ऊसाखाली आहे. या ठिकाणी जवळपास 30 ते 35 लक्ष टन ऊसाचे उत्पादन होऊ शकते. आता सुध्दा 10 लाख टन ऊस शेतामध्ये उभा आहे. या ठिकाणी एक सुध्दा सहकारी साखर कारखाना चांगल्या प्रकारे सुरु नाही. त्यामुळे येथे चांगल्या प्रकारचा कारखाना येऊ शकेल यासाठी शासन काही सवलती देणार आहे काय? यासंदर्भात आपण काही उपाययोजना करणार आहे काय?

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 25084** .........

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा या ठिकाणी उद्योग यावेत यासाठी शासनाने उद्योगांना सवलती दिलेल्या आहेत. मी उद्योग मंत्री असतांना या ठिकाणचे सर्व उद्योग मी डी प्लसमध्ये घातलेले आहेत. एक रुपया दराने उद्योगांसाठी जमीन देण्याची घोषणा केलेली आहे. परंतु या ठिकाणी उद्योजक जावयास तयार नाहीत. या उद्योगांना ज्या ठिकाणी फायदा असतो, पोषक वातावरण असते अशाच ठिकाणी उद्योजक उद्योग सुरु करीत असतो. आपण उद्योजकांना फोर्स करुन उद्योग आणू शकत नाही तर उद्योजकाला उद्योग सुरु करण्याची इच्छा असली तरच तो उद्योग सुरु करु शकतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मूळ प्रश्न साखर कारखान्यांना सवलती देण्याच्या संदर्भात आहे. आज महाराष्ट्रातील साखर कारखान्या सवलती देऊनही अनेक साखर कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. ऊसाच्या प्रश्नाच्या संदर्भात या सभागृहात शासनाकडून उत्तर मिळालेले नाही. परभणीमधील गोदावरी दुधना साखर कारखान्याच्या क्षेत्रात आज सुध्दा 4.5 लाख टन ऊस उभा आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25084.....

श्री.दिवाकर रावते..........

आज मी एक बातमी वाचली. त्या बातमीमध्ये असा उल्लेख आहे की, साखर आयुक्तांनी 1 लाख टन ऊसाची व्यवस्था केलेली आहे, उर्वरित 3 लाख टन ऊसाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच गोदावरी दुधना साखर कारखाना सुरु होणार नाही. तेव्हा या संदर्भातील माहिती मंत्रिमहोदय देतील काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, गोदावरी दुधना साखर कारखान्याचे प्रकरण उच्च न्यायालयात पेंडींग आहे. त्यामुळे त्यासंबंधीचा फायनल निर्णय घेता आलेला नाही. हा कारखाना सुरु झाला पाहिजे अशी शासनाची तीव्र इच्छा आहे. मराठवाड्यातील 22 बंद कारखान्यापैकी 12 कारखाने सरकारने सुरु केलेले आहेत. दिनांक 31 मार्च रोजी साखर संकूल,पुणे येथे सर्व साखर कारखानदारांची बैठक घेतलेली आहे. त्या बैठकीत निर्णय घेतल्यानुसार अतिरिक्त ऊस निरनिराळ्या साखर कारखान्यांना डिस्ट्रीब्युट केलेला आहे...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, साखर आयुक्तांनी 1 लाख टनाचे नियोजन केलेले आहे, उर्वरित 3 लाख टन ऊसाचा प्रश्न आहे असे सांगितलेले आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, वर्तमानपत्रात आलेली माहिती खरी की, मी येथे देत असलेली माहिती खरी. मराठवाड्यातील ऊस आजूबाजूच्या साखर कारखान्यांमध्ये डिस्ट्रीब्युट केला जाईल..... सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी आपला ऊसाशी काय संबंध आहे ?

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून सांगतो की, मी दोन साखर कारखान्यांचा संचालक असून तीन साखर कारखाने उभे केलेले आहेत.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आम्ही 31 मे पर्यंत पूर्ण नियोजन केलेले आहे. त्यामुळे काही प्रश्न उद्भवणार नाही. कारखान्यामध्ये कामगार किती आहेत या संबंधीची माहिती साखर आयुक्त दर आठवड्याला घेत आहेत. ऊस गाळण्याची जबाबदारी शासनाची आहे आणि ही जबाबदार शासन योग्य रितीने पार पाडेल.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25084.....

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, उत्तर प्रदेश सरकारने खाजगी साखर कारखान्यांना आकर्षित करण्यासाठी काही सवलती दिलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये तो प्रश्न येत नाही. महाराष्ट्रामध्ये सहकारी सेक्टर खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. मला याठिकाणी विरोधी पक्षांचे आभार मानले पाहिजेत कारण आता ते ही म्हणू लागले आहेत की, सहकारी कारखानदारी वाचली पाहिजे, ऊस वाचला पाहिजे. ज्याप्रमाणे उत्तर प्रदेश सरकारने साखर कारखान्यासाठी पॅकेज जाहीर केले, काही योजना जाहीर केल्या त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यामध्ये घोषणा करणार आहेत का ? तसेच जो 80 टक्के ऊस शिल्लक राहणार आहे, तो राहू नये म्हणून कोणती उपाय योजना करणार आहात ? शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने निर्णय घेतला आहे किंवा घेणार आहे का ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, उत्तर प्रदेशात खाजगी साखर कारखान्यांना सवलती देण्यात आलेल्या आहेत ही गोष्ट खरी आहे. परंतु मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तेथील परिस्थिती आणि महाराष्ट्रातील परिस्थिती वेगळी आहे. तरी सुध्दा उत्तर प्रदेश सरकारने दिलेल्या सवलतींचा विचार करता येईल का याबाबत मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणून त्यासंबंधी विचार करण्यात येईल.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, माझा आणि ऊसाचा काय संबंध आहे असे माननीय मंत्रिमहोदयांनी विचारण्यापूर्वी मी त्यांना सांगू इच्छितो की, आता कोकणातील संगमेश्वर, राजापूर, कणकवली, दोडामार्ग, वैभववाडी या भागात ऊस पीक घेण्यास सुरुवात झालेली आहे. सहकारी साखर कारखानदारीमध्ये महाराष्ट्र राज्य हे अग्रगण होते. आता ती जागा उत्तर प्रदेश घेत आहे आणि ही चिंतेची बाब आहे. उत्तर प्रदेश सरकारने खाजगी कारखानदारीला मोठया प्रमाणावर चालना दिली त्यामुळे तेथील कारखाने फायद्यामध्ये आहेत. तेव्हा अशाप्रकारचे प्रयत्न महाराष्ट्रात होणार आहेत का ?

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ पूर्वी श्री.अजित.... 11:40

ता.प्र.क्र.25084....

श्री.कर्नल सावंत....

आज महाराष्ट्रामध्ये जी कारखानदारी आहे ती को-ऑपरेटीव्ह सेक्टर्स्मध्ये आहे आणि ते नुकसानीत आहेत का ? असल्यास, ते सुधारण्याच्या दृष्टीने किंवा फायद्यात आणण्याच्या दृष्टीने आपण कोणते प्रयत्न करत आहात ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, कारखानदारी जी नुकसानीत येत आहे, त्याची अनेक कारणे आहेत. त्यामध्ये पहिले कारण हे नैसर्गिक असून त्यामुळे फार मोठयाप्रमाणात कारखानदारी अडचणीत येत आहे. दुसरे कारण हे केंद्र शासनाचे यासंबंधीचे धोरण असून तिसरे कारण हे मिस मॅनेजमेंटचे आहे. मिस मॅनेजमेंटचा विषय राज्य शासनाच्या अखत्यारीत येतो. याबाबतीत आपण सर्वप्रकारचे प्रयत्न करत असतो. याबाबतीत आपण तपासणी करुन ऑडीटही करीत असतो. मिस मॅनेजमेंटच्या बाबतीत आपण योग्य प्रकारची कार्यवाही चालू ठेवलेली आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, परभणी जिल्हयामध्ये कारखानदारी करण्यास सुरुवात केली आहे, असे सांगण्यात आले. मग, परभणी जिल्हयामध्ये सहकारी तत्वावरील किती कारखाने आहेत ? व त्या कारखान्यांकडे किती प्रमाणात थकबाकी आहे ? तसेच, कुठल्या कुठल्या बँकांची थकबाकी आहे ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, यासंबंधीची बरीच माहिती असून ती सर्व माहिती मी पटलावर ठेवतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ज्याप्रमाणे सभागृहामध्ये माननीय सहकार मंत्री उत्तर देत आहेत, ते उचित नाही. सदनामध्ये येणाऱ्या प्रत्येक विषयावर बोलण्याचा प्रत्येक सन्माननीय सदस्यांस अधिकार आहे. त्याप्रमाणे याठिकाणी साखर कारखान्याचा विषय आल्यामुळेच सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी प्रश्न विचारला. परंतु माननीय मंत्री महोदयांनी त्यांची अशाप्रकारे अवहेलना करणे योग्य नाही. माननीय मंत्री महोदयांनी सदनामध्ये जबाबदारीने बोलले पाहिजे. कारखानदारी ही काय आपलीच मिरासदारी आहे का ? कारखाने काय आपलेच आहेत का ? माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना ते काळजीपूर्वक दिले पाहिजे. दुसरे असे की, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना याठिकाणी "मिस मॅनेजमेंट" हा शब्द वापरला. परंतु महाराष्ट्रातील बरेच कारखाने अनेक वर्षापासून बंद पडलेले आहेत. त्यांचे

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25084....

श्री.मधुकर सरपोतदार...

पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने आपले प्रयत्न चालू आहेत. परंतु मिस मॅनेजमेंटच्या बाबतीत आपण कोणत्या कारखान्यावर कारवाई करुन एखादा आदर्श निर्माण करुन दिलेला आहे ? याचे एखादेतरी उदाहरण आपल्याकडे आहे का ? मला आठवते की, याबाबतीत मी विधानसभा सभागृहाचा सदस्य असताना हा प्रश्न विचारला होता. सभापती महोदय, आज महाराष्ट्रामध्ये मोठयाप्रमाणात ऊसाचे उत्पादन होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चिंता लागली आहे की, मोठयाप्रमाणात झालेल्या ऊसाचे उत्पादनाचा वापर कसा होईल, त्याची साखर निर्मिती कशी होईल ? त्यामुळे याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, ऊसाचे क्रश करण्याच्या दृष्टीने आपण कोणती योजना आखली आहे ? किंवा ती योजना काय आहे ? तसेच, याबाबतीत जनतेला विशेषत: शेतकरी कुटुंबियांना दिलासा देण्याच्या दृष्टीने आपण कोणते प्रयत्न करणार आहात ? याबाबतचा खुलासा कृपया माननीय मंत्री महोदयांनी करावा, अशी माझी त्यांना माननीय सभापती महोदयांमार्फत विनंती आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, ज्याठिकाणी मिस मॅनेजमेंट होते, आर्थिक घोटाळे होतात असे 22 कारखाने लिक्विडीशनमध्ये काढलेले आहेत. याठिकाणी मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्या कारखान्यांच्या हद्दीमध्ये जादा ऊसाचे उत्पादन झालेले आहे, त्याचे डिस्ट्रीब्यूशन इतर कारखान्यांमध्ये करण्यासंबंधीच्या ऑर्डर्स् आयुक्तांना देण्यात आलेल्या आहेत. कुठल्याही कारखान्याने ऊस नेण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आलेले आहे.

-----

..3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पेण जि. रायगड तालुक्यातील हमरापूर विभागातील डावरे, कोपर इ. भागातील जमीनीत खाडीचे पाणी शिरल्यामुळे शेतकऱ्यांचे व मच्छीमारांचे झालेले नुकसान**

**(८) * २७६०७ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि. रायगड) तालुक्यातील हमरापूर विभागातील डावरे, कोपर इत्यादी भागातील जमीनीत खाडीचे पाणी मोठ्या प्रमाणात शिरल्यामुळे ५०० एकर भातशेती पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे व मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानीची पाहणी करुन पंचनामे तयार करण्यात आले आहेत काय, असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय मदत देण्यात आली आहे काय,

(३) अद्यापही नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे केले गेले नसल्यास त्याची कारणे व त्याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, डॉ. पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) अंशत: खरे आहे,

(२) व (३) जुलै, २००६ मधील अतिवृष्टी कोपर खारभूमी योजनेच्या बांधाला ठिकठिकाणी लहान मोठया खांडी गेल्यामुळे डावरे येथील १०.४३ हेक्टर व कोपर येथील ३१.५६ हेक्टर क्षेत्राचे ५० टक्केपेक्षा अधिक नुकसान झाले आहे. मच्छिमारांचे नुकसान झालेले नाही.

डावरे येथील भात शेतीचे ५० टक्केपेक्षा जास्त क्षेत्राचे नुकसान झालेल्या ३४ शेतकऱ्यांना रुपये ५२,१५०/- व कोपर येथील भात शेतीचे ५० टक्केपेक्षा जास्त क्षेत्राचे नुकसान झालेल्या ८३ शेतकऱ्यांना रुपये १,५७,८००/- इतके अर्थसहाय्य कृषि विभागामार्फत देण्यात आलेले आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, याठिकाणी जी नुकसान भरपाई दिलेली आहे, ती किती वर्षे शेतीचे नुकसान होईल हे अपेक्षित धरुन शासनाने दिलेली आहे ? कारण, खारेपाणी शेतीमध्ये घुसल्यानंतर किमान ३ वर्षे त्या जमिनीवर काहीच पिकत नाही. याची जाणीव शासनाला आहे का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कोपर खारभूमीत लहान-मोठया भेगा पडल्यामुळे शेतीमध्ये पाणी घुसले होते. तसेच, अतिवृष्टी झाल्यामुळे पुराचे पाणी शेतीमध्ये घुसले होते. त्यामुळे ५० टक्क्यांच्या वर शेतक-यांचे नुकसान झाले. त्यांना यावर्षी मदत देण्यात आलेली आहे.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 27607... पुढे सुरु....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, शेतामध्ये खाडीचे खारे पाणी घुसले तर 3 वर्षे त्या शेतात पीक येत नाही. परंतु शासनाने शेतकऱ्यांना जी नुकसानभरपाई दिलेली आहे ती अत्यल्प आहे. त्यामुळे 3 वर्षाची नुकसान भरपाई शासन या शेतकऱ्यांना देणार का ? 'भेग' पडणे आणि 'खाण' यामध्ये फरक आहे. गेल्या अधिवेशनामध्ये देहरण या माझ्या गावासंदर्भात मी प्रश्न विचारला गेला होता. या गावामध्ये 300 एकर जमिनीचे नुकसान झालेले होते. त्यावेळी शासनाने सांगितले होते की, शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात येईल. परंतु अजूनपर्यंत कोणतेही नुकसानभरपाई देण्यात आलेली नाही. ही नुकसानभरपाई देण्यासंबंधी शासन काही व्यवस्था करणार आहे का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तीन वर्षे खाडीचे खारे पाणी शेतात आल्यामुळे पीक येणार नसेल तर निश्चितपणे या संबंधी अभ्यास करुन आढावा घेण्यात येईल व त्या शेतात पीकच येणार नसेल तर त्या संदर्भात नुकसानभरपाई देण्याच्या संदर्भात शासनाकडून विचार करण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, डावरे येथील 34 शेतकऱ्यांना 52,150 रुपये दिलेले आहेत म्हणजे साधारणत: दीड हजार रुपये प्रत्येक शेतकऱ्याला दिलेले आहेत. कोपर येथील भात शेतीचे 50 टक्केपेक्षा जास्त क्षेत्राचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना 1,57,800 रुपये इतक अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे. अशा प्रकारे नुकसानभरपाईच्या रकमा देताना शासनाचे कोणते निकष आहेत ? दीड हजार रुपयांमध्ये त्या शेतकऱ्याची संपूर्ण वर्षभर गुजराण होणे शक्य आहे का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, 10 सप्टेंबर 2005 रोजी एक जी.आर. काढला होता. त्या अनुसार हेक्टरी 5 हजार रुपये, व 2 हेक्टरच्या मर्यादेपर्यंत मदत देण्याचे निकष निश्चित होते. निश्चित केलेल्या निकषांप्रमाणे मदत करण्यात आलेली होती.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न लहान नाही. समुद्रची पातळी वाढल्यामुळे कोकणातील शेतजमिनीमध्ये खाडीचे पाणी शिरले. सभागृहामध्ये कोकणासंबंधी चर्चा झाली त्यावेळी हा विषय उपस्थित करण्यात आला होता. परंतु त्याबाबत मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले नाही. संबंधी शासन काय उपाययोजना करीत आहे ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 27607... पुढे सुरु....

कर्नल सुधीर सावंत ....

हा प्रश्न या पुढे उद्‌भवू नये यासाठी महाराष्ट्र सरकारने एक मास्टर प्लान तयार केला पाहिजे. अनेक गावांमध्ये खाडीचे खारे पाणी शिरल्यामुळे अनेक गावे बेचिराख होतात त्यासंबंधी अभ्यास करुन शासन एखादे धोरण राबविणार आहे का ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे सदर प्रकरणाचा अभ्यास करुन एखाद्या शेतामध्ये खारे पाणी घुसल्यानंतर तीन वर्षापेक्षा जर जास्त वर्षे त्या शेतामध्ये नापिकी असेल ,पीकच येत नसेल तर त्या संदर्भात धोरण ठरविण्याचा शासन निश्चितपणे विचार करेल. कोपरखार भूमी योजनेअंतर्गत येथे 1992 -93 मध्ये 3.70 मीटर उंचीची भिंत बांधण्यात आली होती. तथापि डावरे, कोपर या गावातील जमिनीमध्ये मध्ये शिरलेल्या खाऱ्या पाण्याच्या संदर्भात पुन्हा अभ्यास करुन निश्चित धोरण ठरविण्यात येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या ठिकाणी असे म्हंटले आहे की, कोपर आणि डावरे तालुक्यातील 117 शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिलेली आहे.माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, अजून किती शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे बाकी आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, 50 टक्कयांच्यावर ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्या सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

.....................



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुकुटबन (जि. यवतमाळ) येथील पाटणबोरी मार्गावरील बालाजी जिनिंगला भीषण आग लागून सुमारे ४० लाख रुपयांचा कापूस जळून खाक झाल्याबाबत**

**(९) * २५२५३ श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **पणनमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुकुटबन (जि. यवतमाळ) येथील पाटणबोरी मार्गावरील बालाजी जिनिंगला दिनांक २९ डिसेंबर, २००६ रोजी वा त्या दरम्यान भीषण आग लागून सुमारे ४० लाख रुपयांचा कापूस जळून खाक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच आठवड्यात ही दुसऱ्यांदा कापसाला लागलेली आग असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिनिंगमधील कापसाला वारंवार आग लागण्याची कारणे काय आहेत याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या घटनेत दोषी आढळून येणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) होय.

(२) होय.

(३) सदर आग खाजगी जिनिंग मिलला लागलेली आहे. महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघानी खरेदी केलेल्या कापसास आग लागली नसल्याने या आगीची चौकशी आग चौकशी समितीकडून करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, राज्यात अशा प्रकारच्या घटना सतत घडत असून त्यात लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. तेव्हा अशा घटना होऊ नये यासाठी शासन कोणती कारवाई करणार आहे ?

यानंतर श्री. रोझेकर ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.25253 पुढे सुरु...........**

श्री.हषवर्धन पाटील : सभापती महोदय, आगी लागून होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता व करावयाची उपाययोजना इत्यादीबाबत सविस्तर सूचना कापूस पणन महासंघाने परिपत्रकान्वये संबंधितांना दिल्या आहेत. फायर ब्रिगेड, पाणी, कंपाऊंड, गोडाऊन, इलेक्ट्रिफिकेशन, एम.एस.ई.बी.ओव्हरहेड वायर यासंबंधी घ्यावयाच्या दक्षते संबंधीचे मार्गदर्शन सर्वच कापूस खरेदी केंद्रांना परिपत्रकाच्या माध्यमातून करण्यात येते. तसेच, त्या त्या विभागातील क्षेत्रीय व्यवस्थापकांवर जबाबदारी निश्चित केली जाते व त्याप्रमाणे ते कार्यवाही करतात.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत तारांकित प्रश्न क्रमांक 28095 हा कापसाला लागलेल्या आगींच्या संदर्भातीलच आहे. परंतु, संबंधित सन्माननीय सदस्य सभागृहात अनुपस्थित असल्यामुळे त्यावर चर्चा होऊ शकली नाही. यवतमाळ जिल्हयात कापसांना आगी लावण्याचे प्रकार जाणुनबुजून घडवल्याचे चित्र, या तारांकित प्रश्नांतून दिसते आहे. कारण, एका महिन्यात एकाचवेळी चार ठिकाणी आगी लागलेल्या आहेत. त्यामुळे यासंदर्भात शासन काही निर्णय घेणार आहे का ? आता ज्या तारांकित प्रश्नाच्या संदर्भात चर्चा सुरु आहे त्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, "सदर आग खाजगी जिनिंग मिलला लागलेली आहे." माझा प्रश्न असा आहे की, खाजगी जिनिंग मिलला लागणा-या आगींचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, त्यावर नियंत्रण आणण्यासाठी शासन काही ठोस उपाययोजना करणार काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, यवतमाळ जिल्हयामध्ये खाजगी जिनिंग मिलला आग लागलेली आहे. ज्या ठिकाणी खाजगी जिनिंग मिलव्दारा कापूस खरेदी केला जातो त्या ठिकाणी लागलेल्या आगींसंबंधीच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. यासंदर्भात जिल्हाधिका-यांच्या स्तरावर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली जाते. अशा काही प्रकरणी संबंधित अधिका-यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. खाजगी व्यापा-यांकडून कापूस खरेदी केला जात असतांना काही प्रिकॉशन्स घेण्याची आवश्यकता होती. मागच्या कालखंडात वणी येथे घडलेली घटना आपल्या सर्वांना माहित आहे. त्या ठिकाणी असलेल्या कापूस खरेदी केंद्रावर मोठया प्रमाणावर शेतकरी बैलगाडया घेऊन आले होते तर दुस-या बाजूला

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.25253 पुढे सुरु**...........

श्री.हर्षवर्धन पाटील...........

खाजगी कापूस खरेदी सुरु होती. खरेदी केंद्रावर आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना केलेल्या नसल्यामुळे प्रकरण वाढले. यापुढे आगी लागून होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता व करावयाची उपाययोजना यासंबंधी जे परिपत्रक पाठविण्यात आले आहे त्याची अंमलबजावणी होईल, असे पाहिले जाईल. जर एखाद्या ठिकाणी अंमलबजावणी झाली नाही तर कॉटन फेडरेशनकडून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "खाजगी जिनिंग मिलला आग लागलेली असल्यामुळे या आगीची चौकशी आग चौकशी समितीकडून करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही." महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघाच्या अखत्यारितील कापूस खरेदी केंद्रातील कापसाला कित्येक ठिकाणी आगी लागल्याचे आपण वर्तमानपत्रात वाचत असतो. माझा प्रश्न असा आहे की, कापूस पणन महासंघाच्या अखत्यारितील कापूस खरेदी केंद्रातील कापसाला लागलेल्या आगीची किती प्रकरणे घडली आहेत, त्याची चौकशी करण्यात आली का, असल्यास त्याची कारणमीमांसा करण्यात आली आहे का व त्यामधून निष्पन्न काय झाले ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन 2006-2007 या वर्षामध्ये एकूण 12 ठिकाणी कापूस पणन महासंघाच्या खरेदी केंद्रांमध्ये आगी लागलेल्या आहेत. यामधील अंदाजित नुकसान सुमारे 95 लक्ष रुपयांचे आहे. कापूस खरेदी केंद्रावर मोठया प्रमाणात शेतकरी येत असतात व त्याच ठिकाणी मुक्काम करीत असतात, त्यामुळे शेतक-यांच्या माध्यमातून म्हणा किंवा कर्मचा-यांच्या माध्यमातून हलगर्जीपणा होतो, सिगारेट, बिडी यामुळे आगी लागतात, अशा 4/5 घटना घडलेल्या आहेत. तसेच, जिनिंग, प्रेसिंग देखील त्याच परिसरात होत असते, मिलमधील मोटारी नादुरुस्त झाल्याने व त्यात स्पार्किंग झाल्याने काही ठिकाणी आगी लागलेल्या आहेत. तर दोन ठिकाणी शॉर्ट सर्किटमुळे आगी लागलेल्या आहेत, अशी विविध कारणे चौकशीतून बाहेर आलेली आहेत. कापूस पणन महासंघाने सेल्फ इंन्शुरन्स स्कीम तयार केलेली आहे, त्या माध्यमातून नुकसान भरपाई दिली जाते. भविष्यकाळात अशा प्रकारच्या आगी लागण्याचे प्रमाण कमी व्हावे, या दृष्टीकोनातून निश्चितपणे प्रयत्न केले जातील.

यानंतर कुमारी धनश्री...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25253......

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, यवतमाळ हा जिल्हा कापूस उत्पादनाच्या बाबतीत अग्रेसर आहे. त्या ठिकाणाहून कापूस जितक्या प्रमाणामध्ये पणन महासंघाला मिळाला पाहिजे तितका मिळत नाही आणि खाजगी व्यापा-यांनाही कापूस कमी मिळतो व त्यांची गैरसोय होते, पणन महासंघ या आगीची कशा प्रकारे काळजी घेणार आहे ? ही आग जरी महाराष्ट्राच्या कापूस पणन महासंघाच्या कापसाला लागलेली नसली तरी या ठिकाणी जर पणन महासंघाचा कापूस असता तर आगीने महासंघाचा कापूस जाळायचा सोडला असता का ? मघाशी माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, स्पार्किंग, शॉर्टसर्किट वगैरे या घटनांमुळे आगीचे प्रकार घडतात. परंतु इलेक्ट्रीक मीटर बोर्ड कुठे असते ? कापूस कुठे असतो ? याची सखोल चौकशी करुन काहीतरी ठोस उपाययोजना पणन महासंघ याकरिता करणार आहे का ? शेतकरी एवढे कष्ट करुन,घाम गाळून कापूस पिकवितो व बाजारात विकण्याकरिता आणतो. शेतक-याच्या कष्टाचे काहीच मोल नाही का. गेली 10-15 वर्ष मी अशा प्रकारच्या आगीबाबतच्या घटना वर्तमानपत्रामध्ये ऐकतो, याबाबतचे तारांकित प्रश्न सभागृहामध्ये चर्चेकरिता आलेले ऐकतो. काही ठिकाणी आग मुद्दाम लावली जाते, काही ठिकाणी निष्काळजीपणामुळे आग लागते ही वस्तुस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर आपण प्रतिबंधात्मक कोणती उपाययोजना करणार आहात ? आतापर्यंत या आगींकरिता आपण कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला ? भविष्यकाळामध्ये याकरिता कोणत्या उपाययोजना आखणार आहात ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला, तो अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. या आगींचे प्रमाण वाढत चालले आहे व यामुळे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसानही होत आहे. शासनाने यावर असा निर्णय घेतलेला आहे की, कापूण पणन महासंघाचे इलेक्ट्रीक मीटर बोर्ड आता आलेले आहे. ही योजना एक एजंट म्हणून कॉटन फेडरेशन राबविते. कॉटन फेडरेशनने आता असा निर्णय घेतलेला आहे की, या ठिकाणी आता आग लागल्यावर त्याची संपूर्ण जबाबदारी तेथील झोनल मॅनेजरवर किंवा तेथील जे कोणी इन्चार्ज असतील त्यांच्यावर राहील. जिल्हाधिकारी व एस.पी.यांची एक सनियंत्रण समिती याकरिता गठित केलेली आहे. तसेच, या ठिकाणी मी दोन सी.आय.डी.गट चौकशीकरिता पाठविले होते, या गटांच्या दोन रिपोर्टवर देखील कारवाई झालेली आहे. परंतु हंगाम सुरु





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

होण्याच्या आधी ख-या अडचणी सुरु होतात. कापूस खरेदी करतांना काय होते की, खरेदी केलेल्या सर्व कापसावर जिनिंग,प्रेसिंग होत नाही. नागपूरच्या अधिवेशनामध्ये मी याबाबतच्या दीर्घकालीन उपाययोजनेबद्दल सांगितले होते. याबाबतीत दीर्घकालीन उपाययोजना आम्ही कॉटन फेडरेशनच्या माध्यमातून तयार करीत आहोत, या उपाययोजनेमध्ये उपरोक्त सर्व गोष्टींचा विचार करण्यात येईल.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## अमरावती शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजना टप्पा दोनची सद्य:स्थिती

**(१०) * २६६७४ श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे : तारांकित प्रश्न क्रमांक २२१९१ ला दिनांक ५ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजना टप्पा-२ साठी रु. ७.५० कोटींचे कर्ज प्राप्त करुन घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार** : (१) नाही,

(२) हुडको या वित्तीय संस्थेकडून कर्ज मंजूर करुन घेण्याची कार्यवाही सुरु होती तथापि हुडकोकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे कर्ज प्रस्ताव इन्फास्ट्रक्चर लिजिंग ॲन्ड फायनान्स सर्व्हिसेस लिमिटेड, मुंबई या संस्थेकडे सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याबाबत सन १९८४ मध्ये दांडेकर समितीने जो रिपोर्ट दिला, त्यामध्ये सर्वात जास्त नागरी पाणीपुरवठयाचा अनुशेष विदर्भामध्ये असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. सर्वात जास्त अनुशेष असलेलया प्रदेशातील अनुशेषामध्ये सर्वात जास्त अनुशेष असलेले शहर अमरावती आहे. अमरावती या शहराचा पाणीपुरवठयाचा प्रत्येक दिवसाचा ३२ दशलक्ष लिटर एवढा अनुशेष त्या समितीने दाखविलेला आहे. ज्या वेळेला अमरावती शहर पाणीपुरवठयाची वर्धा धरण उद्‌भव धरुन योजना तयार झाली त्यावेळी त्यामधून वितरण व्यवस्था पूर्णपणे वगळण्यात आली व ९० दशलक्ष लिटर पाण्याच्या वितरणाची व्यवस्थाच त्या ठिकाणी अस्तित्वात नाही. अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजना टप्पा - २ याकरिता गेली १० वर्ष आम्ही प्रयत्न करीत आहोत. माननीय मंत्रिमहोदयांनी त्यात मदत करण्याकरिता काही थोडासा निधीही मिळवून दिला होता. तरीदेखील सदर योजनेच्या पूर्णत्वाचे काम कुठेतरी अडकलेले आहे. हे शेपूट कुठे अडकलेले आहे ?

यानंतर श्री.बोरले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.26674** ........

प्रा.बी.टी.देशमुख ........
सोलापूर महानगरपालिकेने पैसे भरले नाहीत म्हणून हुडको अमरावती महानगरपालिकेला शहरातील योजनांसाठी कर्ज देत नाही. अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा टप्पा क्र. 2 व 3 या योजना केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहराकरिता पायाभूत सुविधांच्या विकास कार्यक्रमामध्ये समाविष्ट करण्यासाठी टेक्निकल मान्यतेनंतर अमरावती शहराची पाणीपुरवठा योजना राज्य स्तरीय समितीला सादर झाली. दुर्दैवाने या समितीच्या बैठकांमध्ये विकसित भागातील खूप योजना घेण्यात आल्या. मागास भागाकडे दुर्लक्ष झालेले आहे. प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी दिनांक 28 सप्टेंबर, 2006 च्या बैठकीमध्ये असे स्पष्टपणे सांगितले की, यामध्ये विदर्भातील एखाद्या योजनेचा तरी समावेश करावा. हे वाक्य त्या बैठकीच्या मिनिट्समध्ये आहे. नागपूर अधिवेशनामध्ये माननीय नगर विकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी अमरावती भूयारी गटार योजना व पाणीपुरवठा योजना या दोन्ही योजना केंद्र शासनाकडे पाठविण्यासंदर्भात "होय" असे उत्तर दिले होते. मी 7.50 कोटी रुपयांच्या कर्जासंबंधी प्रश्न विचारत नाही. अमरावती शहराची पाणीपुरवठा योजना केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबतचे ठाम निदेश सुकाणू समितीला देण्यात येतील काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, तशा प्रकारचे निदेश देण्यात येतील.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

---------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाचा सन 2000-2001 चा एकोणतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभागृहाचे कामकाज पुढे ढकलण्याबाबत.</u>

**सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या सर्व लक्षवेधी सूचना, शासकीय विधेयके आणि सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांचा म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्ताव मी पुढे ढकलण्याचे ठरविलेले आहे. आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या सर्व लक्षवेधी सूचना, शासकीय विधेयके आणि सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांचा प्रस्ताव दिनांक 9 एप्रिल, 2007 रोजीच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दाखविण्यात येईल. त्याचे कारण असे की, आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचा म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. त्या प्रस्तावाला योग्य न्याय मिळावा, म्हणून मी हा निर्णय घेतलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी म.वि.प. नियम 260 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे, तो प्रस्ताव दिनांक 9 एप्रिल, 2007 रोजी घेण्यात यावा.

**सभापती** : ठीक आहे. आताच मी सांगितल्याप्रमाणे लक्षवेधी सूचना, विधेयके व विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचा नियम 260 चा प्रस्ताव सोमवार दिनांक 09.04.2007 रोजी घेण्यात येईल. आज आपण सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांचा प्रस्ताव घेऊ.

--------

..4.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यासंबंधी.**

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडतो. सभापती महोदय, दहशतवाद विरोधी पथकाने 10 महिन्यांपूर्वी औरंगाबाद, मनमाड, मालेगाव आदी ठिकाणी धडाकेबाज कारवाईत आर.डी.एक्स. आणि घातक शस्त्राने भरलेल्या 16 पेटया हस्तगत केल्या होत्या. मात्र 16 नव्हे तर 25 पेटया महाराष्ट्रात पाठविण्यात आल्या होत्या, अशी माहिती उघड झाल्याने राज्यात खळबळ माजली आहे. या माहितीची शहानिशा झाल्याने आता 9 पेटयांचा शोध घेण्यात येत आहे. या पेटयांमधील 27 किलो आर.डी.एक्स. अजूनही अतिरेक्यांच्या ताब्यात असावे, अशी शंका दहशतवाद विरोधी पथकाला वाटत आहे. दिनांक 11 जुलै, 2006 मध्ये मुंबईच्या रेल्वेत व तद्नंतर मालेगांव येथे अतिरेक्यांनी बॉम्बस्फोट घडवून आणले, या घटनेमुळे सारा भारत देश हादरला, असे असतांना मुंबईतील भयभीत झालेल्या जनतेने याप्रसंगाला धैर्याने तोंड दिले. अजूनही हे आर.डी.एक्स. अतिरेक्यांकडे असल्याने महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण भागाची सुरक्षितता धोक्यात आली आहे. अतिरेक्यांकडून पुनश्च: अशा घटना घडू शकतात.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त .....

परिणामी राज्यातील जनता चिंताग्रस्त आहे. त्यासाठी अतिरेक्यांच्या ताब्यात असलेल्या आर.डी.एक्स. व शस्त्रास्त्रांचा वापर देशविघातक कृत्यांसाठी करण्यापूर्वीच दहशतवादविरोधी पथकाने त्याचा शोध लावणे गरजेचे आहे. अतिरेक्यांनी दडवून ठेवलेले आर.डी.एक्स. व शस्त्रास्त्रांच्या शोधाच्या कामात शासनाने अधिक गती आणावी व यामुळे निर्माण झालेले संशयाचे वातावरण दूर करावे तसेच शासन करीत असलेल्या कार्यवाहीसंबंधी सभागृहाला विश्वासात घ्यावे, अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

**सभापती** : सन्माननीय गृहराज्यमंत्री यांना मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्राच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही अत्यंत महत्वाची बाब आहे, याबाबत तातडीने तपास करावा व या सभागृहात निवेदन करावे, असे मी निदेश देतो.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने औचित्याचा मुद्दा मांडत आहे. महाराष्ट्र शासनातर्फे दरवर्षी चांगले काम करणाऱ्या संस्थांना राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार जाहीर केला जातो. प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या संस्थेस 5 लाख रुपये, द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या संस्थेस 3 लाख रुपये, व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या संस्थेस 2 लाख रुपयांचा पुरस्कार दिला जातो. 2005-06 चा प्रथम पुरस्कार उल्हानगरमधील शासकीय तंत्र विद्यालयास जाहीर झाला असून द्वितीय पुरस्कार अमरावती परिवहन कार्यालयास व तृतीय पुरस्कार अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयास जाहीर झालेला आहे.

सभापती महोदय, दरवर्षी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्काराचे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांचे मानकरी फक्त जाहीर केले जातात, मात्र पुरस्काराची रक्कम संबंधित संस्थांना दिली जात नाही. मागील 3-4 वर्षाच्या पुरस्काराच्या रकमा अद्यापही संबंधित संस्थांना मिळालेल्या नाहीत, याबद्दल खंत वाटते. त्यामुळे ज्या संस्थेला पुरस्कार जाहीर झाले आहेत, त्यांच्यामध्ये मोठया प्रमाणावर नाराजी पसरलेली आहे. शासन केवळ घोषणा करते परंतु पुरस्काराची रक्कम देत नाही. सभापती महोदय, मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की, राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्काराची रक्कम तातडीने संबंधित संस्थांना देण्यासाठी शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने औचित्याचा मुद्दा मांडत आहे. रायगड जिल्हयातील एस.ई.झेड. बाबत मागील आठवडयात मी सभागृहात विशेष उल्लेख केलेला होता. तसेच याबाबत दिनांक 24 मार्च 2007 रोजी तारांकित प्रश्न क्रमांक 24392 उपस्थित केला होता. माननीय उपसभापतींनी त्या प्रश्नाचे अडीच तास चर्चेमध्ये रुपांतर केले आहे, ही चर्चा करण्यासाठी अजून वेळ दिलेली नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले आहे की, एस.ई.झेड. अंतर्गत शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करण्याची कार्यवाही थांबविण्यात येईल, सुपीक जमीन घेतली जाणार नाही. परंतु शासनाकडून अजूनपर्यंत अधिकृतरित्या कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तेथील शेतकरी व अधिकारीही हतबल झालेले आहेत. रायगडचे जिल्हाधिकारी श्री.झगडे हे 15 दिवसाच्या रजेवर गेलेले आहेत. रायगड जिल्हयात रोज मोर्चे निघत आहेत, निदर्शने केली जात आहेत, शेतकरी रस्त्यावर येत आहेत. शासनाने वेळोवेळी आश्वासन देऊनसुध्दा जमिनी ताब्यात घेण्याची कार्यवाही थांबलेली नाही, आज आझाद मैदानावर रायगड जिल्हयातील हजारो शेतकरी मोर्चा घेऊन आलेले आहेत. मी शेतकऱ्यांच्या वतीने आपल्यामार्फत शासनास विनंती करतो की, या प्रकरणी गंभीरपणे लक्ष द्यावे व जमिनी ताब्यात घेण्याची कार्यवाही त्वरीत थांबविण्यासाठी आपण शासनाला निदेश द्यावेत, अशी मी औचित्याच्या मुद्दयाद्वारे विनंती करतो.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आता येथे सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे तो शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे आणि शेतकऱ्यांचे हित पाहणे हे आपले कल्याणकारी राज्य असल्याने प्रथम कर्तव्य आहे. शेतकऱ्यांची कोठल्याही प्रकारे पिळवणूक होता कामा नये या दृष्टीने आपण येथे चर्चा केली आहे आणि शेतकऱ्यांचे हित पाहण्याचेही ठरविले आहे. म्हणून रायगड जिल्ह्याच्या अनुषंगाने जो औचित्याचा मुद्दा येथे सन्माननीय सदस्यांनी मांडला आहे तो अत्यंत महत्त्वाचा आणि गंभीर आहे. तरी आपण स्वत: त्याबाबत लक्ष द्यावे आणि तो प्रश्न सुटेल, मार्गी लागेल यादृष्टीने प्रयत्न व्हावेत. याबाबत महसूल विभागाने विशेष करून लक्ष घालावे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे करण्यात येईल.

**सभापती** : सुदैवाने येथे पालकमंत्री आहेत आणि हा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी जेवढ्या तातडीने आणि पोटतिडकीने मांडला आहे तेवढ्याच तातडीने आणि पोटतिडकीने पालकमंत्र्यांनी त्यात लक्ष घालावे आणि हा प्रश्न शेतकऱ्यांचा असल्याने त्याबाबत योग्य ती उचित कारवाई होईल हे पहावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांना औचित्याचा मुद्दा मांडण्यास मी परवानगी देत आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने एका महत्त्वाच्या सार्वजनिक बाबीसंबंधात औचित्याचा मुद्दा येथे मांडू इच्छितो. सभापती महोदय, आपल्या सर्वांच्या प्रयत्नांनी चार हजार तुकड्यांना अनुदान मान्य करण्यात आले आहे. परंतु मराठवाड्यातील 308 तुकड्यांना अनुदान मंजूर होऊनही, संचालक आणि उपसंचालक, शिक्षण या दोन्ही कार्यालयांमध्ये योग्य तो समन्वय नसल्याने, ते देण्याबाबत टाळाटाळ केली जात आहे. तो अन्याय दूर करण्याचा प्रयत्न आम्ही केल्यानंतर वित्त मंत्री आणि संबंधित विभाग या दोन्हींमध्ये समन्वय नसल्याने अनुदान रिलिज होत नाही. या संदर्भात सर्व कागदपत्रांची पूर्तता संस्था चालकांनी केलेली असताना देखील या 308 तुकड्यांतील शिक्षक आणि अन्य कर्मचारी यांच्या वेतनाचा प्रश्न अनुदान अद्याप रिलिज न झााल्यामुळे निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, आपण स्वत: याबाबत संबंधितांना निदेश

..... ओ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

द्यावेत, तरच या लोकांना दिलासा मिळणार आहे. अन्यथा सरकारी कार्यालयातील भ्रष्ट कारभारामुळे या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न गंभीर होणार आहे.

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी या दोन्ही विभागांमध्ये समन्वय घडवून तातडीने हा प्रश्न कसा सुटेल हे पहावे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी मराठवाड्यातील 308 तुकड्यांच्या संदर्भात जो विषय औचित्याच्या मुद्याद्वारे येथे मांडला आहे अशी परिस्थिती महाराष्ट्रभर आहे. साऱ्या महाराष्ट्रातील या संदर्भातील जे प्रस्ताव आलेले आहेत ते सगळे परत पाठविले गेले आहेत. त्यामुळे त्या सर्वच बाबतीत येथे निवेदन होणे आवश्यक आहे.

**सभापती** : सन्माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी या दोन्ही बाबत लक्ष घालून योग्य ती कारवाई करावी.

श्री. हसन मुश्रीफ : ठीक आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी औचित्याचा मुद्याद्वारे जो विषय येथे मांडला आहे आणि तुकड्यांची जी संख्या सांगितली आहे ती वाढून आता 685 इतकी झालेली आहे. त्या सगळ्याच तुकड्यांना अनुदान मिळण्याची गरज आहे.

**सभापती** : सन्माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी या गोष्टीचीही दखल घ्यावी.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला आपल्या काही गोष्टी निदर्शनास आणावयाच्या आहेत, आपण मला बोलण्याची परवानगी द्यावी.

सभापती महोदय, आपले येथील अधिकार, आपली ज्येष्ठता लक्षात घेऊन आम्ही आपले आदेश सदैव मानत असतो आणि आपल्याकडून देखील आम्हाला नेहमीच सहकार्य आणि संरक्षण मिळत आलेले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी आपल्याकडे एकंदर 134 प्रश्न दिले होते. 9 तारखेपर्यंत पहिल्या 50 मध्ये बॅलेटला मी स्वत: उपस्थित होतो. पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या लॉटमध्ये प्रश्न काढले गेले. आता हे अधिवेशन सुरू होऊन एक महिना संपत आला. मी कोणाच्या हेतूबद्दल शंका घेत नाही. परंतु मी दिलेल्या 134 पैकी एकही प्रश्न वैयक्तिक स्वरूपाचा नव्हता तर ते सारे प्रश्न सार्वजनिक हिताचे, सार्वजनिक महत्त्वाचे होते. पण त्यापैकी एकही प्रश्न येथे

...... ओ 3 ....



KBS/ SBT/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 12:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

लागलेला नाही. आपण आम्हाला नेहमी औचित्याचे मुद्दे मांडण्यास संधी देता, त्यावर शासनाला आदेश देखील देता. त्याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु आपली ज्येष्ठता, आपले सभागृहातील स्थान लक्षात घेता आम्ही कोणाकडे न्याय मागायचा ? त्यासाठी आम्ही आपल्याकडेच येणार. मी आपल्याला सांगू इच्छितो की, माझी एकही लक्षवेधी लागलेली नाही. एस.टी.महामंडळामध्ये 5 कोटीचा भ्रष्टाचार झाल्याबद्दलची लक्षवेधी डिसेंबरमध्ये लागली होती. ती पुढे लावण्यात येईल असे आपण सांगितले होते. पण तीही आलेली नाही. तेव्हा मला कळत नाही की, प्रश्नाची पद्धत नेमकी काय आहे ? .....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सदस्यांनी प्रश्न दिल्यानंतर त्याबाबत जो प्रोसेस होते किंवा दिलेला प्रश्न योग्य आहे किंवा कसे या अनुषंगाने तपास होतो. आपण काही आमदार माझ्या दालनामध्ये आलात तर या संदर्भात जी प्रचलित पद्धत आहे ती माझ्या विभागामार्फत आपणास समजावून सांगण्यात येईल. त्यामध्ये काही बदल झाला असेल, काही चुकीचे झाले असेल तर ज्यांनी कोणी तसे केले असेल त्याला अत्यंत कठोर पद्धतीने शिक्षा करणे याबाबत मी निश्चित कडक कारवाई करीन. ...

( यानंतर श्री. सरफरे .... पी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा. सभापती...**

परंतु जे नियम आहेत व जे निकष ठरविण्यात आले आहेत त्या अनुषंगाने प्रश्नांची निवड करण्याची पध्दत आहे, प्रश्नांना प्रॉयॉरिटी देण्याची पध्दत आहे. या संदर्भामध्ये यापूर्वी एक-दोन वेळा मी गट नेत्यांची बैठक बोलाविली होती. प्रश्न स्वीकारण्याच्या पध्दतीमध्ये थोडेसे रिझर्व्हेशन असावे असे मलाही वाटते. आज अस्तित्वात असलेल्या पध्दतीमध्ये एक पध्दत अशी आहे की, एखादा प्रश्न स्वीकृत करण्यासंदर्भात माननीय विरोधी पक्षनेत्यांनी किंवा गट नेत्यांनी पत्र दिले तर मी समजू शकतो. एका माननीय सदस्यांनी अशाप्रकारे अकरा जणांची पत्रे आणली तर त्या प्रश्नाला प्रॉयॉरिटी मिळते. परंतु कोणत्याही परिस्थितीत ही पध्दत आता आपल्याला थांबवावी लागेल. माननीय विरोधी पक्षनेते किंवा गट नेत्यांच्या पत्रांना जरुर मान देण्यात येईल, परंतु त्याचबरोबर माननीय सदस्यांनी त्याठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित असले पाहिजे. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, मी या अधिवेशनादरम्यान एक दिवस नियम समितीची बैठक बोलावितो. याबाबत विधानसभेमध्ये कोणती पध्दत आहे, विधानपरिषदेमध्ये कोणती पध्दत आहे आणि कोणती पध्दत स्वीकारल्यामुळे माननीय सदस्यांना योग्य व अचूक न्याय मिळेल यादृष्टीने माझा नक्की प्रयत्न राहील. आणि त्यामध्ये आपला तारांकित प्रश्न जाणुनबुजून बाजूला काढला गेला असल्याचे आढळले तर त्याबाबत कठोर पध्दतीने विचार करणे माझे कर्तव्य राहील. विधानमंडळ सचिवालयाच्या माध्यमातून असे काही झाले तर त्याबाबत मी कठोर राहीन. या पध्दतीमध्ये असलेल्या त्रुटी दूर होऊन या अनुषंगाने माननीय सदस्यांना योग्य तो न्याय मिळावा अशी माझी स्वत:ची भावना आहे. याकरिता आपण एक-दोन वेळा बैठक घेतली होती. त्या बैठकीतील चर्चेमधून फारशी प्रगती झाली नाही. त्यामुळे या अधिवेशनामध्ये मी जरुर पुन्हा बैठक घेईन. माननीय सदस्यांकडून मागील अधिवेशनामध्ये शेवटच्या दिवशी जी लक्षवेधी सूचना देण्यात आली होती ती पुढील आठवडयात कामकाजात घेण्याची व्यवस्था होईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, प्रश्न लक्षवेधी सूचनेचा नाही. धर्मादाय रुग्णालयासंबंधी शासनाने निर्णय घेण्याबाबत आपण आदेश दिले होते. त्या लक्षवेधी सूचनेला दोन वर्षे झाली. या धर्मादाय रुग्णालयांनी शासनाचे आदेश धुडकावून लावले म्हणून मी प्रश्न विचारला होता. हा प्रश्न पहिल्या पाच प्रश्नामध्ये यावयास पाहिजे होता, परंतु ते न झाल्यास एक महिन्यामध्ये दहा प्रश्नांमध्ये तरी यावयास पाहिजे होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आपल्या मनातील शंका रास्त आहे. दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांच्या मनामध्ये सुध्दा अशी शंका असते. माझे याबाबत असे म्हणणे आहे की, या अनुषंगाने जे नियम केले आहेत त्याबाबत मी आता पुढे जात आहे. बॅलेटची जी पध्दत आहे, त्याबाबत नियम समितीची बैठक या अधिवेशनादरम्यान पुढील आठवडयात घेण्यात येईल. या पध्दतीबाबत माझ्याही मनामध्ये काही शंका आहेत. आणि म्हणून याबाबत आपण जोपर्यंत निर्णय घेणार नाही तोपर्यंत नियम बदलणे बरोबर नाही. म्हणून मी त्याबाबतीत पुढे गेलो आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी अत्यंत व्यथित मनाने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. या सदनाचे सन्माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरेजी यांच्या संदर्भात मागे एकदा "महानगर" मध्ये आलेल्या बातमीबद्दल मी औचित्याचा मुद्दा मांडला होता. त्याबाबत खुलासा झाला की नाही मला माहीत नाही. त्या पाठोपाठ पुन्हा शनिवार, दि. 31 मार्च 2007 च्या "महाराष्ट्र टाईम्स" व "सकाळ" या दोन्ही वर्तमानपत्रांमध्ये बातमी छापून आली आहे. या बातमीमध्ये पीठासीन अधिकाऱ्यांच्या दिशेने तीर रोखले आहे. याठिकाणी पीठासीन अधिकारी सन्माननीय श्री. वसंतराव डावखरे बसतात त्यांच्यावर शरसंधान करण्याचा प्रयत्न केला आहे. पीठासीन अधिकारी म्हणून त्यांचा उल्लेख या बातमीमध्ये आला नसता तर आमची कोणतीही तक्रार नव्हती. परंतु "महाराष्ट्र टाईम्स"ची बातमी पाहिली तर त्यामध्ये विधानपरिषदेचे उपसभापती श्री. वसंतराव डावखरे अशाप्रकारे सुरुवात झाली आहे. त्यानंतर "सकाळ"ची बातमी तपासून पाहिली तर त्यामध्ये सुध्दा विधानपरिषदेचे उपसभापती श्री.वंसतराव डावखरे यांनी गेल्या काही वर्षात मोठया प्रमाणात गैरव्यवहार करुन बेहिशेबी संपत्ती जमविल्याचा आरोप कामगार नेते श्री. शरद राव यांनी केला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू....

या पुढचा कळस असा आहे की, या कामगार नेत्यांनी ठाण्यामध्ये पत्रकार परिषद घेतली. त्यांनी एनसीपीच्या त्यांच्या लेटरहेडवर सन्माननीय श्री.डावखरे यांना पत्र लिहिलेले आहे. त्यामध्ये त्यांनी आपल्या संपूर्ण भावना मांडलेल्या आहेत. माझे एकच म्हणणे आहे की, ही पक्षांतर्गत लढाई आहे पैलवानांनी बाहेर कोठेतरी आखाडा पहावा आणि कुस्ती खेळावी. त्यांनी विधानपरिषदेच्या जागेचा उल्लेख करणे आणि त्यांची बदनामी करणे उचित नाही, हे मला प्रामुख्याने सांगायचे आहे. हा त्यांचा राष्ट्रवादी पक्षाच्या अंतर्गत प्रश्न आहे. पक्षाचे वरिष्ठ येथे उपस्थित आहेत, त्यामध्ये माननीय श्री.अजित पवार बसलेले आहेत, त्यानंतर अर्थमंत्री श्री.जयंत पाटील उपस्थित आहेत, त्याचबरोबर त्या पक्षाचे जनरल सेक्रेटरी श्री.गुरूनाथ कुलकर्णी उपस्थित आहेत. त्यांनी आपापसात बसून हा प्रश्न सोडवावा . परंतु जाहीर वाच्यता केल्यामुळे या सदनाची बदनामी होते. तसे होणे योग्य नाही. सभागृहाचे पीठासीन अधिकारी हे राजकारणापासून दूर असायला पाहिजते, ते ज्यावेळेस आपल्या स्थानावर बसतात, त्यावेळेस त्यांनी पक्षातीत काम करावे अशी अपेक्षा असते. तसे केले नाही तर ओरड होण्याची शक्यता असते. त्या स्थानावरून त्यांनी अनेकवेळेला सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे, तसेच त्यांनी निदेश देऊन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. पीठासीन अधिकारी म्हणून त्यांच्या वागण्यामध्ये चूक झाली तर त्या संदर्भतील उल्लेख करण्याची जबाबदारी ही या सभागृहातील सन्माननीय सदस्यांची आहे. बाहेरच्या व्यक्तींनी तसा उल्लेख करणे म्हणजे या सभागृहाचा अवमान आहे. जसे पूर्वी "दै. महानगर" या वृत्तपत्रामध्ये बातमी आली होती ती उचित नाही, योग्य नाही, असा निर्णय दिला होता. या दृष्टीकोनातून मुद्दाम निदर्शनास आणावयाचे आहे की, 15 दिवसाच्या फरकाने ही घटना घडलेली आहे. आपले अधिवेशन 14 तारखेला सुरु झाले, अजून एक महिना व्हायचा आहे. अशाच प्रकारची घटना सन्माननीय श्री.डावखरे साहेबांच्या बाबतीत घडलेली आहे, ती केव्हाही उचित नाही. या संदर्भात खुलासा घेणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारे सदनाचा अवमान होईल, अशाप्रकारचे वर्तन अपेक्षित नाही. सभापती महोदय, आपण त्या स्थानावर बसलेला आहात. या संदर्भातील चौकशी करून, अशाप्रकारचे वर्तन होणार नाही या दृष्टीने पावले उचलावीत. याकडे मी प्रोप्रायटी ऑफ द हाऊस या दृष्टीकोनातून पहातो. या संबंधात आपण निश्चित काळजी घ्याल, असा विश्वास वाटतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांनी या ठिकाणी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला. या सभागृहाचे उपसभापती सन्मानीय श्री.डावखरे साहेब आहेत आणि श्री.शरद राव हे या सभागृहाचे सदस्य नाहीत, त्यांचा या संदर्भात त्यांनी उल्लेख केला. आपल्या माध्यमातून या सभागृहाचे उपसभापती यांच्यावर जे आक्षेप आणि आरोप जाहीरपणे घेण्याची भूमिका घेतली गेलेली आहे, त्या संदर्भाने आपल्या माध्यमातून सभागृहाला कळवू इच्छितो की, श्री.शरद राव यांना पक्षाच्या माध्यमातून सूचना देण्याचा प्रयत्न केला जाईल. अशा पध्दतीने वाद केव्हाही होता कामा नये, याची दखल या निमित्ताने घेतली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अत्यंत गंभीर अशा विषयाला सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी वाचा फोडली. गेल्या आठवडयामध्ये एका वृत्तपत्रात अशीच एक बातमी आली होती. माननीय उप सभापती यांच्या बंगल्याचा उपयोग करून या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आणि विधान सभेचे सन्माननीय सदस्य, काही मंत्री महोदय यांच्या नावाचा उल्लेख करून, अशाप्रकारे नाचगाण्याचा कार्यक्रम झाला, असे वक्तव्य करून बदनामी करण्याचा प्रयत्न वृत्तपत्राच्या माध्यमातून झाला.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

त्या दिवशी त्या घटनेला या ठिकाणी वाचा फोडण्यात आली. आपण त्याबाबत चौकशीचे आदेश दिले होते आणि चौकशी करुन सभागृहाला माहिती देण्यात येणार होती. सभापती महोदय, एका आठवड्यातील हा दुसरा प्रकार आहे. या सभागृहाच्या माननीय उपसभापतींची जाणीवपूर्वक बदनामी करण्याचा तर हा प्रयत्न नाही ना ? हे सर्वोच्च सभागृह आहे. महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेचे लक्ष या सभागृहाकडे असते. जनतेचे प्रश्न अतिशय नि:पक्षपातीपणे सोडविण्याचे जे काम या ठिकाणी चालते त्याला बदनाम करण्याचा प्रयत्न काही लोक करीत असतील तर हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. याची ताबडतोब चौकशी करुन जे कोणी संबंधित असतील त्यांना आपल्या माध्यमातून समज देता येईल काय किंवा चौकशी करुन जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करता येईल काय हे तपासून बघून आपण त्या पध्दतीचे निदेश द्यावेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या सभागृहामध्ये माननीय सभापतींच्या आसनाला महत्व आहे. समजा मी एखादा मुद्दा मांडला आणि आपण त्याबाबत निर्णय दिल्यानंतर आम्ही खाली बसतो. कारण त्या ठिकाणी आसनस्थ असलेल्या व्यक्तीला महत्व आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी या ठिकाणी उल्लेख केला की, आमच्या पक्षाने त्यांना जाणीव दिली. हा पक्षीय प्रश्न नाही. लोकशाहीचे जे संकेत आहेत त्यामध्ये लोकसभेचे अध्यक्ष असतील, राज्यसभेचे सभापती असतील किंवा विधानसभेचे अध्यक्ष किंवा विधान परिषदेचे सभापती असतील त्या पदाला महत्व आहे. श्री. शरद राव हे महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदी असलेल्या व्यक्तीबद्दल काही बोलले. अशा पध्दतीने चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला जाणे हे बरोबर नाही. माननीय मंत्रिमहोदयांबद्दल किंवा प्रशासकीय यंत्रणेबद्दल बोलणे वेगळे परंतु या सभागृहाच्या सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीबद्दल बोलत असताना, त्यांची गावी किती प्रॉपर्टी आहे, त्यांची कशा प्रकारची संपत्ती आहे, त्यांचे किती बंगले आहेत याबाबत बोलणे योग्य नाही. श्री. वसंत डावखरे हे केवळ आमदार नाहीत तर ते या सर्वोच्च सभागृहाचे उपसभापती आहेत. खरे म्हणजे माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे यांचे आभार मानावयास पाहिजेत. लोकांना वेठीस धरुन श्री. शरद राव यांनी संप करण्याचे ठरविले. मुंबईमध्ये सुध्दा ज्या ज्या वेळी अतिवृष्टी होते त्या त्या वेळी श्री. शरद राव यांनी शासनाला आणि प्रशासनाला वेठीस धरण्याचे काम केलेले आहे. ठाणे येथे

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

रिक्षा चालकांच्या संपाच्या संबंधाने त्यांनी लोकांना वेठीस धरण्याचा प्रयत्न केला. श्री. वसंत डावखरे साहेबांनी सर्व पक्षाच्या लोकांना एकत्र केले आणि त्या ठिकाणी यातून मार्ग काढला. यामध्ये केवळ पक्षीय संबंध नाही. त्यामुळे अशा प्रकारे बेछूट आरोप करणे योग्य नाही. राजकारण्यांबद्दल समाजामध्ये सहज बोलले जाते. त्याची काही कारणे असतील. त्याला आम्हीही कारणीभूत असू. परंतु आमची प्रतिष्ठा सांभाळण्याचे काम जसे आमच्याकडे आहे तसेच आमच्याबद्दल किंवा या ठिकाणी सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीबद्दल बेछूट बोलण्याचा अधिकार या लोकशाहीमध्ये कोणालाही दिलेला नाही. आपण याची गांभीर्याने नोंद घ्यावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, पीठासीन अधिकाऱ्यासंबंधी वर्तमानपत्राच्या माध्यमातून झालेली चर्चा अयोग्य असली तरी सभापती म्हणून किंवा उपसभापती म्हणून जी कार्यकक्षा आहे त्या कार्यकक्षेमध्ये राहून काम केले तर अशा घटना घडणार नाहीत. खरे म्हणजे रिक्षाचा संप आणि त्यातून मार्ग काढणे या सगळ्यामध्ये माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे साहेबांनी का पडावे असा प्रश्न मला पडलेला आहे. कारण ते कोठेही गेले तरी या सदनाचे उपसभापती म्हणून त्यांचा जो प्रोटोकॉल आहे त्यामध्ये ते असतात. त्यांनी ही मध्यस्थी का करावी असा प्रश्न मला पडलेला आहे. आमच्या सभापतींनी आक्षेप घेणे कितपत योग्य आहे असा प्रोप्रायटीचा प्रश्न मघाशी उपस्थित झाला होता. माननीय श्री. वसंत डावखरे हे या सभागृहामध्ये बोलले तसेच त्यांनी मध्यस्थी वगैरे केली. परंतु त्यांची कितीही चांगली इच्छा असली तरी कोणी त्यांची मध्यस्थी मागितली असती आणि त्यांनी मध्यस्थी केली असती तर ठीक आहे. त्यांनी युनियनच्या राजकारणामध्ये का पडावे असा प्रश्न माझ्यासमोर निर्माण झालेला आहे. बाहेरच्या कामकाजाविषयी सांगावयाचे तर जे काम आमदाराने, नगरसेवकाने, महापौराने, नगराध्यक्षाने करावयाचे आहे त्या कामकाजामध्ये यांनी लक्ष घातल्यानंतर असे होणार असेल तर सदनामध्ये असा प्रश्न उपस्थित होईल. त्यांनी रस्त्याच्या बाबतीत निदेश दिले हे ठीक आहे परंतु त्यांनी त्या ठिकाणी रस्त्यावर उतरणे ठीक होणार नाही. भविष्यामध्ये यासंदर्भात त्यांनी योग्य ती नोंद घ्यावी अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 12:30

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या सदनाच्या पीठासीन अधिका-यांबद्दल कोणत्याही स्तरावर अनुचित प्रकारे चर्चा होणे इष्ट नाही अशा प्रकारच्या भावना सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या आहेत. दोघेही आपापल्या पदावर योग्य पध्दतीने काम करीत आहेत आणि सुदैवाने ते माझ्या पक्षाशी संबंधित आहेत. मी दोघांचीही संयुक्त बैठक घेईन. तसेच पुन्हा असे प्रकार होणार नाहीत असा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण आणि सदनाचे नेते सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी एक अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. हे सदन, हे सार्वभौम सभागृह आहे. या सार्वभौम सभागृहाची प्रतिष्ठा सर्वांकडून सातत्याने टिकविली गेली पाहिजे आणि ती टिकवित असताना वृत्तपत्र स्वातंत्र्यांवर कोणत्याही पध्दतीचे बंधन येता कामा नये. तसचे वृत्तपत्रांनी देखील त्यांचे कर्तव्य जरुर करावे, परंतु या सदनाचे सार्वभौमत्व अबाधित राहील याचीही त्यांनी काळजी घेणे जरुरीचे आहे. पीठासीन अधिका-यांची प्रतिष्ठा ही संसदीय लोकशाही परंपरेमध्ये सातत्याने टिकविणे हे आपणा सर्वांचेच काम आहे. वृत्तपत्रामध्ये ज्या पध्दतीने लिखाण प्रसिध्द झाले त्याबाबतीत सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी स्वत: लक्ष घालण्याचे ठरविलेले आहे. या संदर्भात सन्माननीय उपमुख्यमंत्री किंवा सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे पक्षीय पातळीवर जरुर चर्चा करतील. पीठासीन अधिका-यांच्या बाबतीत अशा पध्दतीचे लिखाण टाळता येण्याच्या बाबतीत पीठासीन अधिकारी म्हणून काय करणे आवश्यक आहे याचा मी स्वत: अभ्यास करुन यासंदर्भातील निर्णय देईन.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या संदर्भातील निर्णय याच अधिवेशनामध्ये द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : अधिवेशन संपण्यापूर्वी यासंदर्भातील निर्णय पूर्ण होईलच असे नाही.

--

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाचे कामकाज पुढे ढकलण्यासंबंधी**

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये नियम 260 अन्वयेचे दोन प्रस्ताव दाखविण्यात आलेले आहेत. हे दोन्ही प्रस्ताव पुढे ढकलावेत अशी सन्माननीय सदस्यांनी विनंती केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी त्यांचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव सोमवारी घ्यावा अशी विनंती केली. त्यामुळे मी आज सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव चर्चेला घेण्याचे ठरविले होते. परंतु सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी देखील त्यांचा प्रस्ताव पुढे ढकलावा अशी विनंती केल्यामुळे नियम 260 अन्वयेचे दोन्ही प्रस्ताव पुढे ढकलण्याचा निर्णय मी घेतलेला आहे.

आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना देखील मी पुढे ढकललेल्या आहेत. मात्र अर्धा-तास चर्चा आज घेण्यात येतील.

---

..3..

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 93 अन्वये सूचना**</u>

**सभापती** : सन्मानीय सदस्य श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी "अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डीनजीक राहाता शहरातील जत्रेत मानाच्या काठीवरुन दोन गटात झालेल्या भांडणातून शिवसेना शहर अध्यक्षांचे घर भर दुपारी जमावाने पेटवून देणे, तसेच नगराध्यक्षाच्या घरावर जमावाने हल्ला करुन त्यांच्या कार्यालयाची मोडतोड केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण व रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्यापीठ लोणेरे ( ता. माणगाव. जि. रायगड) येथील शिक्षकेतर कर्मचा-यांना शासनाने दिनांक 4.2.1999 रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार 5व्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू न केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व प्रतापराव सोनवणे, वि.प.स. यांनी "नाशिक जिल्ह्यातील गोंदे औद्योगिक वसाहतीमध्ये सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या लिअर सिटिंग प्रा.लि. या कंपनीचे व्यवस्थापन व कामगार यांच्यात वाद झाल्याने दिनांक 4.4.2007 रोजी कंपनी अचानक बंद केल्याने कामगारांमध्ये खळबळ निर्माण झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मा.सभापती**.........

यानंतर सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, पाशा पटेल, प्रतापराव सोनवणे,वि.प.स. यांनी "मराठवाडयातील मागास भागातील तंत्रनिकेतने मजबूत करण्यासाठी शासनाने मंजूर केलेले 50 लाख रुपये तंत्र संचालकांच्या हलगर्जीपणामुळे व्यपगत झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निर्देश देत आहे.

यानंतर सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे,वि.प.स. यांनी "सन 2003-04 पासून राज्यातील इयत्ता 1 ली ते 5 वी पर्यंतच्या शालेय विद्यार्थ्यांना पोषण आहार, अन्न शिजवून देण्याच्या योजनेंतर्गत साहित्य खरेदी करण्याचे अधिकार संबंधित शाळा मुख्याध्यापक किंवा ग्रामशिक्षण समितीला न देता सेवाभावी संस्थांना देण्याचा शासनाने निर्णय घेतल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निर्देश देत आहे.

उर्वरित सर्व सूचना मी दालनात नाकारल्या आहेत.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सांगली-मिरज परिसरातील सहकारी बँका व पतसंस्थांमध्ये सुरु असलेल्या भ्रष्ट कारभार.

**मु.शी.**: सांगली-मिरज परिसरातील सहकारी बँका व पतसंस्थांमध्ये सुरु असलेल्या भ्रष्ट कारभार याबाबत प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी "सांगली-मिरज परिसरातील सहकारी बँका व पतसंस्थांमध्ये सुरु असलेल्या भ्रष्ट कारभार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रातील विशेषत: सांगली जिल्हयातील अनेक नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांच्या संचालकांनी केलेल्या गैरव्यवहारामुळे या सर्व सहकारी संस्था अडचणीत आलेल्या आहेत. या सहकारी बँका व पतसंस्थांच्या ठेवीदारांच्या ठेवी अडचणीत आलेल्या आहेत. या सर्व सहकारी बँका आणि पतसंस्थांमधील ठेवी परत न मिळाल्यामुळे ठेवीदार हवालदिल होऊन आंदोलने करीत आहेत. सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांकडे, मंत्र्यांकडे, जिल्हाधिकाऱ्यांकडे गाऱ्हाणी मांडून आपल्या ठेवी परत मिळविण्याचा ते प्रयत्न करीत आहेत, परंतु त्यांच्या प्रयत्नाला यश येत नसल्यामुळे अनेक ठेवीदार आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होत आहेत. अशा परिस्थितीत या नागरी सहकारी बँका आणि पतसंस्थातील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्यासाठी शासनाने त्वरित उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. निवेदनाच्या अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, रिझर्व्ह बँकेने या नागरी बँकांवर ठेवी परत करण्यासाठी जे निर्बंध घातले आहेत ते निर्बंध शिथील करुन या बँकांच्या कर्जाची वसुली जशी होईल त्याप्रमाणात ठेवीदारांचे पैसे टप्प्याटप्प्याने परत देण्यासंबंधी रिझर्व्ह बँकेला महाराष्ट्र शासन सूचना देईल का? नागरी सहकारी बँका आणि पतसंस्थांच्या संचालकांनी गैरव्यवहार करुन ठेवीदारांचे पैसे धोक्यात आणले आहेत. अशा संचालकांच्या वैयक्तिक मालमत्तेवर टाच आणून त्यांच्याकडून या गैरव्यवहाराची रक्कम वसूल करुन ठेवीदारांचे पैसे परत करण्यासंबंधी शासन निर्णय घेईल का?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे काही गोष्टी सांगली जिल्हयातील अर्बन बँका आणि पतसंस्थांबाबत झालेल्या आहेत. ठेवीदार अडचणीत आले आहेत. संबंधित संस्थांची कलम 83 व 88 प्रमाणे चौकशी चालू आहे. चौकशीच्या अनुषंगाने काही गुन्हे देखील दाखल केले आहेत. सन्माननीय सदस्यांनी ठेवी परत करण्यासंबंधी रिझर्व्ह बँकेला राज्य शासन सूचना देईल का असा प्रश्न उपस्थित केला आहे. राज्य सरकार जरुर त्याबाबत पुढाकार घेऊन वसुलीच्या माध्यमातून काही पैसे वसूल होतील ते ठेवीदारांना मिळावे यासाठी पुढाकार घेऊन राज्य बँकेकडे रिप्रेझेंटेशन करेल. ज्या संचालक मंडळातील व्यक्तींचा दोष कुठे आहे हे चौकशी अहवालाच्या आधारे निश्चित झाल्यानंतर त्यांच्या वैयक्तिक प्रॉपर्टीवर टाच आणता येत असेल तर त्यादृष्टीने सुध्दा कारवाई करण्यात येईल.

श्री.विलासराव शिंदे : बँकांच्या वसुलीच्या संदर्भात कोर्टाचा निकाल येऊनही धनदांडगे लोक अशा वसुलीमध्ये अडथळे आणतात. याबाबत शासनाकडून पोलिसांची मदत मिळत नाही.

(नंतर श्री.जुन्नरे...

अप्रमाणित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे ....

याबाबतीत शासन काही कार्यवाही करणार आहे काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, वसुलीच्या संदर्भात कडक कारवाई करण्यात येईल, आवश्यकता पडल्यास पोलिसांची मदत घेऊन वसुली करण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, बँका आणि पतसंस्था या काही एकदम डबघाईस आलेल्या नाहीत. 4-5 वर्षापासून सहकार खात्यामार्फत या संस्थांना को-ऑपरेशन अधिकारी भेट देत होते परंतु या अधिका-यांनी संबंधित बँकाची किंवा पतसंस्थेची योग्य चौकशी, योग्य नोंदणी न केल्यामुळे या बँका, कायद्याचा दुरुपयोग केल्यामुळे पतसंस्था डबघाईस आलेल्या आहेत. त्यामुळे चौकशी करणारे डेप्युटी रजिस्ट्रार यांनी चांगल्या पध्दतीने काम केले नसल्यामुळे संबंधित अधिका-यांवर शासन काही कारवाई करणार आहे काय? संबंधित अधिका-यांनी कामामध्ये हलगर्जीपणा केला असेल तर त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, कार्यक्षेत्र वाढल्यामुळे जिल्हयाच्या बाहेर पंतसंस्था गेलेल्या आहेत. 2-3 जिल्हयामध्ये बँकेचे किंवा पतसंस्थेचे कार्यक्षेत्र असते तेव्हा त्यावर आयुक्तांचे नियंत्रण असते. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे अधिका-यांनी जर कायद्याचा दुरुपयोग केला असेल किंवा हेतुपुरस्सर या अधिका-यांनी डोळेझाक केली असेल तर जरुर अधिका-यांवर कारवाई केली जाईल.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, वित्तीय संस्थेत ठेव ठेवणा-यांना संरक्षण मिळावे म्हणून 1999 मध्ये महाराष्ट्र शासनाने एक अध्यादेश काढला व त्या अध्यादेशाचे सन 2000 मध्ये कायद्यात रुपांतर झाले होते. परंतु या कायद्याला माननीय राष्ट्रपतींनी संमती नाकारल्यामुळे तो कायदा रद्द झाला. त्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांना असे विचारु इच्छितो की, पतसंस्था, बँका, कंपन्या आणि इतर वित्तीय संस्थांमध्ये ज्या ठेवीदारांचे पैसे गुंतलेले आहेत, त्यांचे पैसे सुरक्षित रहावेत यासाठी महाराष्ट्र शासन पुन्हा नव्याने कायदा करणार आहे काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, नागरी बँकामध्ये 1 लाखाच्या ठेवीवर संरक्षण दिले जाते. पतसंस्थेच्या बाबतीत कायदा करुन आम्ही थांबलो नाही. पतसंस्थांची वाढती संख्या आणि वाढती अनियमितता लक्षात घेऊन पुन्हा नव्याने प्रयत्न करुन पतसंस्थातील ठेवीदारांना , सभासदांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने कायदा केला जाईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 93 अन्वये निवेदन क्रमांक 2 , पुढे ढकलण्याबाबत</u>**

**सभापती** : नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदनास सन्माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील उत्तर देणार आहेत परंतु ते सध्या विधानसभेतील कामकाजात व्यस्त असल्यामुळे नियम 93 चे निवेदन क्रमांक 2 पुढे ढकलण्यात यावे अशी त्यांनी विनंती केलेली आहे. त्यामुळे नियम 93 अन्वयेचे दुस-या क्रमांकाचे निवेदन नंतर घेण्यात येईल.

--------

**<u>नियम 93 अन्वये निवेदन क्रमांक 3 , पुढे ढकलण्याबाबत</u>**

**सभापती** : नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील वरील निवेदन क्रमांक 3 , सोमवार दि. 9 एप्रिल, 2007 रोजी घेण्यात यावे अशी विनंती सन्माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांनी केलेली आहे.

श्री. जयंत पाटील ( वित्त मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 चे निवेदन क्रमांक 3 सोमवारी घेतले तर चालेल काय?

प्रा. बी.टी. देशमुख : माननीय सभापती महोदय, नियम 93 अन्वयेचे निवेदन सोमवारी घेण्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी जी विनंती केलेली आहे त्यास आमची काही हरकत नाही. त्यामुळे नियम 93 वरील निवेदन क्रमांक 3 सोमवारी घेण्यास आपण मान्यता द्यावी.

**सभापती** : नियम 93 वरील निवेदन क्रमांक 3 , सोमवार दि. 9 एप्रिल, 2007 रोजी घेण्यात येईल.

----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सांगवी-जोमदेव, ता. बाळापूर, जि. आकोला येथील दलित वस्तीतील पिण्याच्या पाण्याची विहीर बजवुन त्यावर सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत शाळा खोल्यांचे बांधकाम करणे.

**मु. शी.** : सांगवी-जोमदेव, ता. बाळापूर, जि. आकोला येथील दलित वस्तीतील पिण्याच्या पाण्याची विहीर बजवुन त्यावर सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत शाळा खोल्यांचे बांधकाम करणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, जगदीश गुप्ता यांनी "सांगवी-जोमदेव, ता. बाळापूर, जि. आकोला येथील दलित वस्तीतील पिण्याच्या पाण्याची विहीर बजवुन त्यावर सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत शाळा खोल्यांचे बांधकाम करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या आहेत.

माननीय सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये पुढील प्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक 2 वरील तिस-या परिच्छेदात " मुख्य कार्यकारी अभियंता" या ऐवजी "मुख्य कार्यकारी अधिकारी" असे वाचावे. सदर दुरुस्तीसह मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे प्रकरण गेल्या चार अधिवेशनात उपस्थित होत आहे. या प्रश्नाच्या संदर्भात संबंधित अधिका-याला पाठीशी घालण्याच प्रयत्न चालला आहे. सांगवी-जोमदेव ता. बाळापूर, जि. अकोला येथे सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत एका शाळा खोलीचे बांधकाम करावयाचे होते. सदर बांधकाम करीत असतांना त्या ठिकाणी दलित वस्तीमध्ये जी विहीर होती ती विहीर बुजवून त्या ठिकाणी जाणीवपूर्वक शाळा खोलीचे बांधकाम ग्रामप्रचांयतीने केलेले आहे. दलित वस्तीतील लोक या विहिरीचा उपयोग पाणी पिण्यासाठी करीत होते. परंतु या ठिकाणच्या सरपंचाने दलित वस्तीतील जनतेला पिण्याच्या पाण्यापासून वंचित केले व तेथे जी विहीर होती ती बुजवून त्या जागेवर सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शाळा खोलीचे बांधकाम केले. यासंदर्भात तेथील गटविकास अधिका-यांनी चौकशी केली व त्यांनी असे सांगितले की, "सदर तक्रार असत्य आहे." त्यानंतर पुन्हा यासंदर्भात तक्रार करण्यात आली म्हणून ....

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

दिनांक 25.8.2005 रोजी विस्तार अधिकारी, पंचायत, सहाय्यक लेखा अधिकारी, कनिष्ठ लेखा अधिकारी, शाखा अभियंता यांच्या संयुक्त चौकशी समितीने शाळा खोल्यांच्या बांधकामाची चौकशी केली. संयुक्त समितीने ग्रामसेवक, तत्कालीन गट शिक्षणाधिकारी व गट विकास अधिकारी यांना दोषी ठरवून त्यांच्यावर कारवाई करावी असा अभिप्राय दिलेला आहे. असे असताना या अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. या दोन्ही अहवालांमध्ये फरक आहे म्हणून शिक्षण अधिकाऱ्यांचे आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे मत मागविण्यात आले. हा सर्व प्रकार म्हणजे गट विकास अधिकारी आणि गट शिक्षण अधिकारी यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न आहे. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, संयुक्त चौकशी समितीने अहवालामध्ये गट विकास अधिकाऱ्यावर 98 लोकांच्या खोट्या सह्या घेतल्या असा स्पष्ट ठपका ठेवलेला आहे. तेव्हा संयुक्त चौकशी समितीने सुचविल्याप्रमाणे शासन गट विकास अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अकोला जिल्ह्यातील सांगवी (जामदेव) ता.बाळापूर येथील गावामध्ये विहीर वजा खड्डयावर सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत शाळाखोलीचे बांधकाम करण्यात आले......

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्याकडे संयुक्त चौकशी समितीचा अहवाल आहे. त्याठिकाणी पैसे खर्च करुन विहीर बांधण्यात आलेली आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय सभागृहाची दिशाभूल करणारी उत्तरे देत आहेत. त्यांनी त्यांच्या उत्तरात सुधारणा करावी अन्यथा त्यांनी चुकीचे उत्तर दिले म्हणून आम्हाला त्यांच्या विरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव द्यावा लागेल.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सांगवी ( जामदेव ) या गावाची लोकसंख्या 483 असून त्यापैकी दलित लोकसंख्या 95 ( 21 कुटंबे) आहे. तेथील दलितांची पिण्याची पाण्याची व्यवस्था केलेली आहे. या प्रकरणाची तीन वेळा चौकशी करण्यात आलेली आहे. त्याठिकाणी शाळाखोलीचे बांधकाम करण्यासाठी इतरत्र जागा नसल्यामुळे आणि शाळाखोलीची आवश्यकता असल्यामुळे तेथे बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच शाळाखोलीचे बांधकाम चांगले झालेले आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनास कळविलेले आहे....

..2..

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, या प्रकरणात तीन वेळा चौकशी करण्यात आली. मग यापैकी कोणती चौकशी शासनाने ग्राह्य धरली ? संयुक्त चौकशी समितीने केलेली चौकशी ग्राह्य धरली की, वेगवेगळ्या अधिकाऱ्यांनी केलेली चौकशी ग्राह्य धरण्यात आली ? मी मघाशी म्हटल्याप्रमाणे सरकार या अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे. तेव्हा संयुक्त चौकशी समितीने दिलेल्या अहवालाप्रमाणे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दिनांक 30.9.2003 च्या प्रशासकीय मान्यतेने सांगवी ( जामदेव ) ता.बाळापूर, जि.अकोला येथे एका वर्गखोलीचे बांधकाम सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आले. सदरचे बांधकाम ग्राम शिक्षण समितीने करावयाचे होते. त्यानुसार ग्रामपंचायतीने दिनांक 28.8.2003 च्या ठराव क्रमांक 6 नुसार या वर्गखोलीच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन दिली. सदरहू जागा 15 वर्षापासून वापरात नसल्यामुळे त्यास खड्डयाचे स्वरुप प्राप्त झाले होते तेव्हा त्या जागेवर बांधकाम करण्यात यावे असा ग्राम पंचायतीमध्ये ठराव झाला होता. त्याठिकाणी विहीर नव्हती आणि दलितांसाठी पिण्याच्या पाण्याची वेगळी व्यवस्था होती. आता तेथे खोलीचे बांधकाम पूर्ण झालेले असून ते चांगल्याप्रकारे झालेले आहे अशाप्रकारचा अभिप्राय आलेला आहे. दलितांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे, शाळाखोलीचे बांधकाम चांगल्याप्रकारे झालेले आहे. तेव्हा अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्न नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्याकडे संयुक्त चौकशी समितीचा अहवाल देतो. त्या अहवालात स्पष्ट नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणात गैरव्यवहार झालेला आहे हे सिध्द झालेले आहे. तेव्हा संयुक्त समितीचा अहवाल विचारात का घेतला जात नाही? अधिकाऱ्यांना पाठिशी घालण्याचा प्रयत्न चालला आहे. गट विकास अधिकारी श्री.बी.डी.जाधव असे त्या अधिकाऱ्याचे नाव आहे. आमच्या प्रश्नाला बगल देणारी उत्तरे मिळत असतील आम्ही प्रश्न विचारणार नाही.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी यासंबंधीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. संयुक्त समितीचा अहवाल माझ्यामार्फत आपल्यापर्यंत पोहचविण्याची तयारीही त्यांनी दर्शविली आहे. तसेच, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याबाबतची वस्तुस्थिती सातत्याने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये ज्यांनी कोणी चुकारपणा केलेला आहे किंवा यामध्ये जे कोणी दोषी असतील, त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी त्यांची इच्छा आहे. याबाबतीत आपले असे मत असल्याचे दिसून येते की, त्याठिकाणी शाळा खोल्यांची गरज होती, परंतु त्याठिकाणी पाण्याची व्यवस्था नाही. त्याठिकाणी स्थानिक शिक्षण विभागाने याअनुषंगाने निर्णय घेऊन खोल्या बांधल्या. परंतु माननीय विरोधी पक्षनेत्यांचे मत असे आहे की, 10-11 हजार रुपये खर्च करुन त्याठिकाणी पूर्वी कधीतरी एक विहिरी बांधली होती. परंतु दरम्यानच्या काळात ती कोरडी पडली असेल. म्हणून याबाबतीत मी माननीय मंत्री महोदयांना अशा सूचना देईन की, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत पुन्हा एकदा याबाबत संयुक्त समितीचा जो अहवाल आहे त्याप्रमाणे पाहणी करुन तपासणी करावी. तसेच, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सूचना केल्याप्रमाणे, यामध्ये जर कोणी दोषी आढळले तर त्यांवर पाहणीनंतर योग्य ती कारवाई करण्याचा प्रयत्न करावा.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, फेर तपासणीच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात येतील.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, संयुक्त समितीच्या अहवालाप्रमाणे कार्यवाही होऊन दोषी अधिका-यांवर कारवाई झाली पाहिजे, असेच माझे म्हणणे आहे.

**सभापती** : ठीक आहे. मी तशाच सूचना दिलेल्या आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यामध्ये रॅकेट आहे. मी आपल्याला हा संयुक्त समितीचा अहवाल सादर करतो व त्याप्रमाणे कारवाई व्हावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

**सभापती** : ठीक आहे.

( संयुक्त समितीच्या अहवालाची प्रत माननीय सभापती महोदयांना देण्यात आली. )

-------

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोंदरे दुमाला, ता.इगतपुरी,जि.नाशिक कार्यक्षेत्रातील जमिनी संपादन केल्यामुळे गावातील बहुतांश लोक अल्पभूधारक होणे

**मु. शी.** : गोंदरे दुमाला, ता.इगतपुरी,जि.नाशिक कार्यक्षेत्रातील जमिनी संपादन केल्यामुळे गावातील बहुतांश लोक अल्पभूधारक होणे याबाबत सर्वश्री प्रतापराव सोनवणे, सय्यद पाशा पटेल, श्रीकांत जोशी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रतापराव सोनवणे, सय्यद पाशा पटेल, श्रीकांत जोशी यांनी "गोंदरे दुमाला, ता. इगतपुरी, जि.नाशिक कार्यक्षेत्रातील जमिनी संपादन केल्यामुळे गावातील बहुतांश लोक अल्पभूधारक होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, गोंदरे दुमाला व वाडीवरे ता.इगतपुरी, जि.नाशिक येथील जमिनी मोठया प्रमाणात याआधीच विविध कारणांसाठी सरकारने संपादित केलेल्या आहेत. आता एम.आय.डी.सी.च्या उभारणीसाठी पुन्हा एकदा याच परिसरातील जमिनी संपादित करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे दिसून येते. या एम.आय.डी.सी. च्या उभारणीसाठी ज्या जमिनी संपादित करण्याचा प्रस्ताव आहे, त्यातील काही जमिनी याआधीच व्यावसायिकांनी, उद्योजकांनी, डेव्हलपर्स यांनी खरेदी केलेल्या आहेत. त्याठिकाणी अगदी थोडया जमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यात आहेत. तेव्हा ज्या जमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यात आहेत, ज्या जमिनीत पीकपाणी घेतले जात आहे व त्यावरच शेतकऱ्यांचा जीवनचरितार्थ अवलंबून आहे, त्या जमिनी या प्रस्तावामधून वगळून शासन शेतकऱ्यांना दिलासा व संरक्षण देईल का ? तसेच, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी शासन संपादित करणार आहे त्या शेतकऱ्यांना शासकीय व्हॅल्यूअेशनप्रमाणे, रेडी रेकनरप्रमाणे अथवा मार्केट रेटप्रमाणे मोबदला देण्यात येईल का ? तसेच, गोंदरेच्या धर्तीवर वाडीवारे, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथील जमिनी याच कारणासाठी संपादित करण्यासंबंधीचा शासनाचा प्रस्ताव आहे का ? असल्यास, या प्रस्तावाबाबततही गोंदरे दुमालाप्रमाणेच निकष लावण्यात येतील का ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन 2001 चा जो प्रादेशिक नियोजन आराखडा आहे, त्यामध्ये हे सर्व क्षेत्र आहे. त्यामध्ये इंडस्ट्रीजचा युज नोटीफाय केलेला आहे.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील :सभापती महोदय, या ठिकाणी ज्या जमिनीचे भूसंपादन झालेले आहे तेथील 288 हेक्टरपर्यंतची सर्व जमीन पडिक आहे. या शेतजमिनीवरच ज्यांचा उदरनिर्वाह चालतो असे काही शेतकरी तेथे असतील तर त्या शेतकऱ्यांची जमीन भूसंपादन प्रक्रियेतून वगळण्यात येईल. भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत एम.आय.डी.सी. ॲक्ट अंतर्गत निगोसिएशन करुन किंमत ठरवता येईल. केवळ रेडी रेक्नरवर अवलंबून न राहता खाजगी वाटाघाटीतून किंमत ठरविण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, नाशिक येथे महामंडळातर्फे औद्योगिक विकास करण्यासाठी भूसंपादन करण्यात आले त्या विषयी काही हरकत नाही. सातपूर एमआयडीसी व अंबड एमआयडीसी मधील सर्व भूखंड उद्योजकांना वितरीत करण्यात आले आहेत . परंतु उद्योजकांनी या भूखंडाचा विकास केलेला नाही .औद्योगिक वापरासाठी असलेल्या या जागेचा वापर न करता त्यामधून पैसे कमावले जात आहेत. जर औद्योगिकग वापर करावयाचा नसेल तर शेतकऱ्याच्या जमिनी ताब्यात का घेण्यात आल्या ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सातपूर व अंबड या औद्योगिक क्षेत्रातील जे प्लॉटस आहेत त्या प्लॉटसवर डेव्हलपमेंट झालेली नाही असे म्हणणे योग्य होणार नाही.परंतु सर्व भूखंडांचा वापर झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे व असे अनेक प्लॉटस तेथे आहेत त्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या जमिनींचे 10-10 वर्षापासून प्लॉटिंग करण्यात येते, शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात येतात परंतु त्या जमिनीचा वापर होत नाही याबाबतीत कोणती उपाययोजना केली जाईल ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, एम.आय.डी.सी क्षेत्रामधील या ज्या प्लॉटचा वापर होणार नाही त्या प्लॉट मालकांना दंड लावायचा निर्णय घेण्यात आलेला आहे. हा दंड दर वर्षी सबस्टेंशियली वाढत जाणार आहे. त्यामुळे डेव्हलपमेंट लवकर होऊ शकेल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या संपादित केलेल्या ज्या जमिनी आहेत त्या शेतकऱ्याच्या असल्यामुळे त्यांना मार्केट दराने नुकसान भरपाई देण्यात येईल का ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, आताच सांगितल्याप्रमाणे निगोसिएशन करुन मार्केट रेट प्रमाणे या जमिनींची किमत देतांना विचार करण्यात येईल.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भिवंडी येथील मुलांची विक्री करणा-या महिलेला करण्यात आलेली अटक.

**मु. शी.** : भिवंडी येथील मुलांची विक्री करणा-या महिलेला करण्यात आलेली अटक याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे यांनी "भिवंडी येथील मुलांची विक्री करणा-या महिलेला करण्यात आलेली अटक" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, भिवंडी शहरामधे 15 -20 हजार रुपयांना मुले विकण्याचा धंदा राजरोसपणे चालू आहे. ही मुले, बाहेरच्या प्रांतातून आणून या ठिकाणी त्याची विक्री केली जाते. तसेच राज्यामध्ये अनेक ठिकाणी अशा प्रकारच्या मुलांच्या अपहरणाच्या घटना घडलेल्या आहेत. माझा प्रश्न असा आहे की, परप्रांतातून पळवून आणलेल्या मुलांची संख्या किती आहे ? पोलिसांनी छापा टाकला त्यामध्ये अटक झालेल्या मुलांची सखोल चौकशी करुन मुलांना विकल्याचे आपल्या निदर्शनास आलेले आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ही मुले हैद्राबाद मधून पळवून आणलेली होती. या कालावधीमध्ये हैद्राबाद बंजारा हिल पोलीस स्टेशन, माधवपुरा पोलीस स्टेशन येथे 5 गुन्हे घडले होते. 21 मार्च 2007 रोजी दोन मुले पकडली गेली. 24 तारखेला धर्मा ऊर्फ सुजाता नावाच्या महिलेला पकडण्यात आले. भिवंडीमध्ये काही मुले विक्रीसाठी आणली आहेत असे कळल्यावर फोन करुन आंध्रमध्ये कळविण्यात आले. हैद्राबादचे पोलीस व अधिकारी विमानाने मुंबईला आले, त्या ठिकाणी छापा टाकण्यात आला व 5 लोकांना पकडण्यात आले. त्या दोन मुलांपैकी एका मुलाचे वय 2 वर्ष होते तर दुसऱ्या मुलाचे वय 10 वर्ष होते. या सर्व मुलांना हैद्राबाद पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये सन 2006 मध्ये मुले पळविण्याचे 164 प्रकार घडलेले आहेत.

---------------

यानंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती, श्री.भास्कर जाधव)**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुले पळविण्याची 164 प्रकरणे गेल्या वर्षभरात या राज्यात घडली, असे मंत्री महोदयांनी आताच सांगितले आहे. या राज्यामध्ये एखादी आंतरराष्ट्रीय टोळी कार्यरत आहे का व ही टोळी मुले पळवून नेण्याचे उद्योग करते का, तसेच पळवून आणलेल्या मुलांची विक्री नेपाळमध्ये केली जाते, अशा प्रकारची माहिती शासनाकडे आहे का ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 164 मुले पळविण्याच्या गुन्हयांमधील कारणे वेगवेंगळी आहेत. मालमत्तेतील वाद, भाऊबंदकी, व्यवसाय, मुलांना पळवून भिकेला लावणे असे वेगवेगळे प्रकार त्यामध्ये आहेत. त्या त्या प्रकरणानुसार सखोल चौकशी सुरु आहे व काही प्रकरणी कारवाई करण्यात आली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गुन्हयांचे प्रकार वेगवेगळे आहेत, असे मंत्री महोदयांनी सांगितले. महाराष्ट्रामध्ये किंवा मुंबईमध्ये लहान मुले भीक मागत फिरतांना आपल्याला दिसतात. या मुलांची चौकशी करुन त्यांना त्यांच्या घरी पाठविण्यात येईल काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, लहान मुलांना सुधारगृहात पाठविण्याची व्यवस्था केली होती. सुधारगृहात जागेची कमतरता असल्यामुळे काही मुलांना त्यांच्या घरी पाठविण्यात आले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबईतील भिकारी किती श्रीमंत आहेत, याबाबतच्या बातम्या आपण वर्तमानपत्रात वाचतो. वर्तमानपत्रातच हे छापून आल्यामुळे लोकांचा त्या धंद्याकडे वळण्याचा कल वाढला आहे. त्यामुळे भिकारी बनविण्यात आलेल्या मुलांना ताब्यात घेऊन, त्यांची चौकशी करुन खरोखरच ज्या मुलांना भिकेला लावले असेल त्यांना आपापल्या घरी पाठविण्याची व्यवस्था पोलीस करतील काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे भिकेला लावण्यात आलेल्या मुलांचा शोध घेण्यात येईल व या मुलांना त्यांच्या पालकांकडे सुपूर्द करण्यासंबंधी कार्यवाही करण्यात येईल.

---------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाबाबत</u>**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कार्यक्रम पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना आज घेण्यात येणार नाहीत, असे आपण घोषित केले आहे. परंतु, लक्षवेधी सूचनांवरील निवेदने सन्माननीय सदस्यांना मिळालेली नाहीत.

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : लक्षवेधी सूचनांवरील निवेदने सर्व सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

--------------

..3...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 च्या सूचनांवरील निवेदनांबाबत**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी काल शिक्षण शुल्क समितीच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, या समितीला आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग देण्यात आलेला आहे, वगैरे वगैरे. कालच शिक्षण शुल्क समितीच्या अध्यक्षांनी पत्रकार परिषद घेऊन असे सांगितले आहे की, आम्हाला काहीही मिळालेले नाही, त्यामुळे आम्ही आमचे काम करु शकत नाही. एक दिवस अगोदर मंत्री महोदय सभागृहात सांगतात की, कर्मचारी वर्ग दिलेला आहे आणि निवृत्त न्यायाधीश असलेले शिक्षण शुल्क समितीचे अध्यक्ष पत्रकार परिषदेत काहीही मिळाले नसल्याचे सांगत आहेत. या विरोधाभासाचे स्पष्टीकरण सभागृहात झाले पाहिजे. संबंधित मंत्री महोदयांवर हक्कभंग आणण्याची वेळ आमच्यावर येऊ नये, आमची तशी इच्छा नाही. मात्र, स्पष्टीकरण झाले पाहिजे, असा आमचा आग्रह आहे.

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांचे आणि सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांचे सौहार्दाचे संबंध आहेत. तेव्हा त्यांनी मंत्री महोदयांना खाजगीत विचारले तरी त्यांचे शंका-समाधान होऊ शकेल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी खाजगीत माझे शंका-समाधान करुन घेईन, तो भाग वेगळा. परंतु, सभागृहात झालेले वक्तव्य व पत्रकार परिषदेत झालेले वक्तव्य लोकांपर्यन्त पोहोचले आहे व त्यामुळे सभागृहात केलेले वक्तव्य खरे आहे की पत्रकार परिषदेत केलेले वक्तव्य खरे आहे, याबद्दल लोकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने शिक्षण शुल्क समितीची स्थापन केली आहे. त्यामुळे याबाबतचे स्पष्टीकरण सभागृहातच झाले पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय उच्चशिक्षण मंत्री आता सभागृहात उपस्थित नाहीत. अर्धा तास चर्चेच्या वेळी ते सभागृहात येतील त्यावेळी आपल्याला बोलता येईल.

---------------

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ.शी.**: नेरुळ, नवी मुंबई येथील दिल्ली पब्लिक हायस्कूलमध्ये स्थानिकांना प्रवेश नाकारणे

**मु.शी.**: नेरुळ, नवी मुंबई येथील दिल्ली पब्लिक हायस्कूलमध्ये स्थानिकांना प्रवेश नाकारणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्या, श्रीमती मंदा म्हात्रे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिलेली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते :-

"दिल्ली पब्लिक हायस्कूल, सेक्टर 48, नेरुळ, नवी मुंबई या हायस्कूलमध्ये स्थानिक मुलांना प्रवेश नाकारण्यात येणे, सदर शाळेत मुंबईतील विविध ठिकाणांहून येणा-या मुलांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येणे, परिणामी स्थानिक रहिवाशी व तेथील विद्यार्थी वर्गात पसरलेले तीव्र चिंतेचे वातावरण, याच हायस्कूलमध्ये दूरवरुन आलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यामुळे मुंबईत विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी गेलेल्या स्कूलबसचा अपघात होऊन त्यात बरीच मुले जखमी झाल्याची नुकतील घडलेली घटना, या घटनेबाबत अद्याप कोणतीच कारवाई झालेली नसून आजपर्यन्त स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात येत असणे, याबाबत सखोल चौकशी करुन संबंधित हायस्कूलवर तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

सभापती महोदय, अतिशय खेदाने परत परत या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना मला सभागृहात मांडावी लागत आहे. गेल्या दोन अधिवेशनांमध्ये याच विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना मांडली होता व सभापती महोदयांनी त्यावर निदेशही दिले होते. परंतु, अद्याप यासंबंधी कार्यवाही झालेली नाही. नवी मुंबई हे शहर शिक्षणाचे माहेरघर होण्याची प्रक्रिया सुरु असतांना वाढणा-या लोकसंख्येमुळे नवनवीन शिक्षण संस्था उदयास येत आहेत.

सभापती महोदय, नेरुळ येथील सेक्टर 48 मधील दिल्ली पब्लिक हायस्कूल बाबतचा विषय मी यापूर्वी दोन वेळा सभागृहात उपस्थित केला होता.

यानंतर कुमारी जयश्री.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती.मंदा म्हात्रे.......

दिल्ली पब्लिक हायस्कुल,सेक्टर 48 नेरुळ, नवी मुंबई या हायस्कूलमध्ये इतर शहरातील मुलांना प्रवेश देण्यात येतो व स्थानिक मुलांना ॲडमिशन दिले जात नाही. या शाळेचे मुख्याध्यापक श्री.छाब्रीया यांना मी प्रत्यक्ष जाऊन भेटले. तेथील रहिवाशांच्या मुलांना त्या शाळेत ॲडमिशन मिळत नसल्यामुळे पालकांच्या व पाल्यांच्या मनामध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. या शाळेचे मुख्याध्यापक प्रवेश यादीमध्ये एखादे मराठी आडनाव दिसल्यास त्या विद्यार्थ्यांना प्राथम्यक्रमाने प्रवेश नाकारतात. या शाळेला सिडकोने 8,000चौरस मीटरचा एस.ई.झेड.चा भूखंड सवलतीच्या दरामध्ये उपलब्ध करुन दिलेला आहे. या शाळेची सखोल चौकशी होऊन तातडीने संबंधितांवर कारवाई करण्याकरिता मी हा विशेष उल्लेख या सभागृहामध्ये आणलेला आहे. याबाबत मला शासनातर्फे काहीतरी ठोस उत्तर पाहिजे.

**तालिका सभापती** : शासनाने या गोष्टीची तातडीने दखल घ्यावी.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आलेला आहे की, विनाअनुदानित शाळेंच्या प्रवेश - प्रक्रियेमध्ये शासन कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करु शकत नाही. या शाळांचे मुख्याध्यापक प्रवेश प्रक्रियेसंदर्भात कोणत्याही अधिकारी,मंत्री,आमदार यांचा हस्तक्षेप जुमानत नाहीत व मनाप्रमाणे फी आकारुन प्रवेश देतात. याबाबत चौकशी करण्याचे सर्व अधिकार शिक्षण उपसंचालकांना देण्यात येणार आहेत.

श्रीमती मंदा म्हात्रे : चेंबूर आणि घाटकोपरवरुन मुले या शाळेमध्ये शिकण्यासाठी येतात, त्यांना शाळा सूटल्यावर परत घरी सोडण्याकरिता जात असतांना या शाळेच्या बसला अपघात होऊन 22 मुले जखमी झाल्याची नुकतीच घडलेली घटना. प्रवेश प्रक्रियेमध्ये आम्ही कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करीत नाही. पण स्थानिक मुलांना जर प्रवेश नाकारणा-या या शाळेवर शासन कोणत्या प्रकारची कारवाई लवकरात लवकर करणार आहे ?

श्री.गणेश नाईक : शासन या शाळांना कोणत्याही प्रकारची ग्रँट वगैरे देत नाही, या शाळा स्वत:च्या पायावर उभ्या राहतात परंतु अशा प्रकारच्या शाळांवर कोणत्यातरी प्रकारे शासनाचा अंकुश वा नियंत्रण हे राहिलेच पाहिजे, यासाठी शासन लवकरात लवकर निर्णय घेणार आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : या शाळा काही स्वत:च्या मालकीच्या जागेवर उभ्या राहिलेल्या नाहीत, त्यांना सिडकोने सवलतीच्या दरामध्ये सुमारे 8,000चौ.मी.चा भूखंड दिलेला आहे. सिडकोने तो





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती.मंदा म्हात्रे.......

भूखंड या शाळेला देतांना काहीतरी नॉर्म्स ठरले असतीलच. अशा प्रकारे सर्व विनाअनुदानित शाळा मनमानी करावयास लागल्या तर स्थानिक रहिवाशांच्या मुलांनी शिकावयाचे कोठे ?

**तालिका सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी सुरुवातीलाच सांगितले की, शिक्षण उपसंचालकांना याबाबतच्या सर्वांगीण चौकशीचे अधिकार देण्यात येतील व या गोष्टींवर शासनाचे नियंत्रण राहण्याकरिता शासन नव्याने प्रयत्न करणार आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, हे लवकरात लवकर झाले पाहिजे.

**तालिका सभापती** : विशेष उल्लेखाच्या सूचनेवर एवढा वेळ चर्चा करता येत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला या गोष्टीची कल्पना आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी अत्यंत महत्वाचा विषय या ठिकाणी मांडलेला आहे. या गोष्टींमधील त्रूटीबाबत मी त्यांना दोष देत नाही. माझा प्रश्न असा आहे की, यावर शासनाचे काही नियंत्रण नाही, अशा प्रकारच्या ज्याशाळा असतात, त्यांना शासन जरी अनुदान देत नसले तरी या शाळांना महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण खात्याचेच धोरण लागू आहे, जर यांच्यावर काही निर्बंध लवकरात लवकर घातले गेले नाहीत तर या शाळा स्वत:चा असा वेगळा सिलॅबस चालू करावयाला सुरुवात करतील व या राज्याच्या शिक्षण खात्याच्या धोरणाला सुरुंग लावण्याचा प्रयत्न करतील. यापुढील अधिवेशनात या शाळांना निर्बंध घालण्याच्या दृष्टीकोनातून एखादे विधेयक तयार करुन कायदा तयार करण्यात यावा. यामुळे शिक्षण खात्याची अशा प्रकारची हतबलता निर्माण होणार नाही.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, होय.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Z -3

JPK/ KGS/ KTG/

13:05

**पृ.शी.**: ता.इगतपूरी,जि.नाशिक येथे मुकणे धरणाखाली पाच के.टी.वेअर बंधारे बांधण्याची प्रशासकीय मान्यता मिळून एक वर्ष होऊन बांधकामास सुरुवात न होण्याबाबत.

**मु.शी.**: ता.इगतपूरी,जि.नाशिक येथे मुकणे धरणाखाली पाच के.टी.वेअर बंधारे बांधण्याची प्रशासकीय मान्यता मिळून एक वर्ष होऊन बांधकामास सुरुवात न होण्याबाबत याबाबत श्री.प्रतापराव सोनावणे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री.प्रतापराव सोनावणे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रतापराव सोनावणे ( नाशिक विभाग पदवीधर ): महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" मुकणे धरणाखाली डावा तट कालवा रद्द होऊन त्या ऐवजी शेतक-यांच्या मागणीनुसार मुकणे धरणाखाली पाच के.टी.वेअर बंधारे बांधण्याकरिता प्रशासकीय मंजूरी मिळाली असून के.टी.वेअर बंधारे बांधकामाचे भूमिपूजन होऊन सुमारे 01 वर्ष होऊनही अद्यापही कुठल्याही प्रकारचे प्रत्यक्ष बांधकाम सुरु झाले नसल्याने शासकीय अधिका-यांना बांधकामासंदर्भात त्वरित आदेश करुन के.टी.वेअर बांधकाम तातडीने सुरु करण्यात यावे,व शेतक-यांना दिलासा द्यावा,अशी ग्रामपंचायत कार्यालय,गोंद्रे इमाला ( ता.इगतपूरी,जि.नाशिक ) येथील सरपंचांनी केलेली मागणी, या मागणीकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष. "

नाशिक जिल्हयातील इगतपुरी तालुक्यात मुकणे हे धरण बांधलेले आहे. या मुकणे धरणातून मुकणे डावा कालवा प्रस्तावित केलेला होता, या कालव्याच्या प्रस्तावास स्थानिक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांनी विरोध केल्यावर सदर प्रस्ताव रद्द करण्यात आला. त्यानंतर स्थानिक शेतक-यांच्या मागणीनुसार कालव्याऐवजी तेथे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्याचा निर्णय घेतला गेला. या निर्णयानुसार एकूण पाच के टी वेअर बांधण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. या पाचपैकी मुकणे के टी वेअरचे काम सुरु झाले, परंतु निधीच्या अनुपलब्धतेमुळे सदरचे काम रेंगाळले आहे. तेव्हा शासनाने या कामासाठी त्वरित निधी उपलब्ध करुन देऊन सदरचे काम पूर्ण करावे. तसेच गोंदे - पाडवी के टी वेअरचे काम अजूनपर्यंत सुरु झाले नाही ते त्वरित सुरु करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कु-हेगांव व अस्वली याही के टी वेअरला मान्यता देऊन काम त्वरित पूर्ण करावे व शासनाने शेतक-यांना दिलासा द्यावा, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करतो.

यानंतर श्री.बोरले......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महापारेषणच्या पडघा उपकेद्रात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, अंबरनाथ या शहरांमध्ये तसेच परिसरामध्ये होत असलेले भारनियमन.

**मु. शी.** : महापारेषणच्या पडघा उपकेद्रात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, अंबरनाथ या शहरांमध्ये तसेच परिसरामध्ये होत असलेले भारनियमन याबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महापारेषणच्या पडघा उपकेंद्रात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, अंबरनाथ या शहरात तसेच परिसरातील रहिवाशांना भारनियमनाचा अतिरिक्त फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पडघा उपकेंद्रात गेल्या महिन्याभरात दुस-यांदा हा तांत्रिक बिघाड झाला आहे. परिणामी मोहने उपकेंद्रातील विजेचा दाब वाढल्यास आकस्मित भारनियमन करावे लागणार आहे. एकीकडे आधीच 7 ते 8 तासाचे भारनियमन जनता सहन करीत आहे. तर दुसरीकडे घडत असलेल्या तांत्रिक बिघाडांच्या अशा घटनांमुळे येथील अतिरिक्त भारनियमनाला जनतेला तोंड द्यावे लागणार आहे. परणिामी गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. याच प्रश्नावर यापूर्वी अनेक वेळा या परिसरातील संतप्त जनतेने जनआंदोलने देखील केली आहेत. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन या महत्वाच्या विषयावर तातडीने तोडगा काढण्यासाठी शासनाने संबंधित वरिष्ठ अधिका-यांची आजच बैठक आयोजित करुन सदर प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावण्याबाबत कार्यवाही करावी, अशी मागणी या गंभीर प्रश्नाबाबत मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे उपस्थित करीत आहे. सभापती महोदय, आता विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु आहेत. परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी आपण शासनाला यासंदर्भात उपाययोजना करण्याचे निदेश द्यावेत, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती** : शासनाने याची दखल घ्यावी.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :पंढरपूर शहरात घडणा-या चो-या व दरोडयाच्या घटना तसेच शहरातील अवैध धंदे कायमचे बंद करणे.

**मु. शी.** :पंढरपूर शहरात घडणा-या चो-या व दरोडयाच्या घटना तसेच शहरातील अवैध धंदे कायमचे बंद करणे याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□□य सदस्य श्री.मधुकर चव्हाण यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे, त्यां□ ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, पंढरपूर शहरामध्ये विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी दरवर्षी कार्तिकी आणि आषाढी एकादशीला लाखो भक्त येत असतात. पंढरपूर हे पवित्र शहर आहे. पंढरपूर शहरातील कायदा व सुव्यवस्था कोलमडून पडलेली आहे. पंढरपूर शहरात गेल्या 15 महिन्यात 20 लाख 40 हजार रुपयांची मालमत्ता चोरीस गेल्याची नोंद पंढरपूर पोलीस ठाण्यात झालेली आहे. पंढरपूर शहरात गेल्या 15 महिन्यांमध्ये 28 घरफोडया, दरोडे, 58 किरकोळ चो-या झाल्याची अधिकृत नोंद पोलीस ठाण्यात होऊन घरफोडया, दुचाकी वाहने तसेच सायकलींची चोरी, दागदागिन्यांच्या चो-या या शहरामध्ये वाढून सुध्दा पोलीस यंत्रणा जाणूनबुजून त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. भाविक दर्शनासाठी आल्यावर संपूर्ण सुरक्षितता मिळावी याकरिता समस्त वारकरी संघटनेच्यावतीने पंढरपूर शहरातील अवैध धंदे कायमचे बंद व्हावेत, यासाठी गेल्या कार्तिकी वारीत माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांना दिनांक 27 मार्च, 2007 रोजी निवेदन देण्यात आले होते. त्याच वेळेस माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी ठोस आश्वासनही दिले होते. पंढरपूर शहरात भर वस्तीच्या ठिकाणी 20 दारुचे गुत्ते असून, त्यातून हातभट्टीची दारु राजरोसपणे पुरविली जाते. त्याच बरोबर काही लॉजवरुन अनधिकृत वेश्या व्यवसायही केला जातो. विठ्ठल मंदिर परिसरात अनेक अनधिकृत जुगाराचे व मटक्यांचे धंदे सुरु आहेत. परिणामी शहरातील तरुण पिढी वाममार्गाला लागत आहे. पंढरपूर शहरातील वाहतूक व्यवस्था देखील कोलमडलेली आहे. भक्त जीपमधून, क्वॉलिसमधून पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. त्या गाडया अडवून पोलीस त्यांच्याकडे पैशांची मागणी करतात. ड्रायव्हरने पैसे दिले नाहीत तर पांडुरंगाच्या दर्शनासाठी आलेल्या

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ........

भक्तांकडे पोलीस पैशांची मागणी करतात. पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या भक्तांकडून पैसे उकळले जातात. पंढरपूर शहरातील कायदा व सुव्यवस्था कोलमडून पडलेली आहे.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

सभापती महोदय, श्री.अजय पवार नावाच्या तहसीलदाराने एक कोटी रुपयांचा धान्य घोटाळा केला, तो कोर्टातून बाहेर आल्यानंतरसुध्दा त्याला पकडले नाही.

सभापती महोदय, तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी विशेषत: गंगेच्या काठावर, चंद्रभागेच्या काठावर स्नान करण्यासाठी भाविक जमतात, त्या वेळी त्यांचे सामान किनाऱ्यावर ठेवलेले असते. त्या ठिकाणी कोणत्याही सुरक्षिततेची व्यवस्था नाही. कपडयासह भाविकांच्या बॅगा तेथे असतात, त्याची चोरी केली जाते. मला असे वाटते की, याची गंभीर दखल शासनाने घेणे आवश्यक आहे. या ठिकाणी केवळ महाराष्ट्रातील भाविक येत नाही तर दक्षिण काशी असल्यामुळे दररोज हजारो, लाखो लोक तेथे दर्शनासाठी येत असतात. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री आषाढी-कार्तिकी एकादशीला देवाची पूजा करायला जातात, त्यांचा तो मान आहे, तेथे नियमानुसार जाणे हा त्यांचा अधिकार आहे. पंढरपूर शहरामध्ये लाखो भाविक येत असतात, केवळ आषाढी-कार्तिकी एकादशी यात्रेच्या कालखंडात भाविकांची सुरक्षा करणे गरजेचे नाही तर इतर वेळीही पंढरपूरला येणाऱ्या भाविकांची सुरक्षा करणे गरजेचे आहे. पंढरपूर शहरात काही अधिकारी 4-5 वर्षापासून काम करीत आहे, त्यांनीही याकडे लक्ष दिले पाहिजे. सभापती महोदय, या विशेष उल्लेखाद्वारे या गंभीर बाबीकडे लक्ष वेधित आहे. पोलीस याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करीत असल्याने पंढरपूर शहरातील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. याकडे शासनाने त्वरीत लक्ष द्यावे मला आपण विशेष उल्लेख करायची परवानगी दिली, त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, याबाबत नोंद घेतलेली असून योग्य ती दखल घेण्यात येईल.

-------------

<u>अर्धा तास चर्चा क्र.1 व 2 संबंधी</u>

**तालिका सभापती** : आपण अर्धा-तास चर्चेला सुरुवात करीत आहोत. पहिली अर्धा-तास चर्चेची सूचना सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांची आहे परंतु संबंधित विभागाचे मंत्री खालच्या सभागृहात असल्यामुळे त्यांची अर्धा-तास चर्चेची सूचना मी पुढे ढकलतो, मंत्री महोदय वरच्या सभागृहात आल्याबरोबर ताबडतोब चर्चा सुरु करण्यात येईल. दुसरी अर्धा-तास चर्चा सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांची आहे, ते सभागृहात उपस्थित नाहीत. तिसरी अर्धा-तास चर्चा सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांची आहे, ती त्यांनी मांडावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

**पृ.शी.**: मुंबई शहरातील ट्रस्टच्या रुग्णालयात 10 टक्के गरीब रुग्णांना नियमाप्रमाणे मोफत उपचार न मिळणे.

**मु.शी.**: मुंबई शहरातील ट्रस्टच्या रुग्णालयात 10 टक्के गरीब रुग्णांना नियमाप्रमाणे मोफत उपचार न मिळण्याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"मुंबईतील बहुतांश धर्मदाय रुग्णालये मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ४१ अअ चे पालन करीत नसल्याचे आढळून येणे, जसलोक, भाटीया, ब्रिचकँडी, लिलावती, जैन, रहेजा, बांद्रा होली फॅमिली, हरकिसनदास, हिंदुजा, नानावटी इत्यादि रुग्णालयांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील तरतूदी नुसार दहा टक्के गरीब रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन न देणे, वेळप्रसंगी उपचारा दरम्यान रुग्णाचा मृत्यु झाल्यास बिलाचे पूर्ण पैसे न भरल्याने रुग्णाचे शव नातेवाईकांच्या ताब्यात न देणे, नगर विकास विभाग, महसूल विभाग व मुंबई महानगरपालिकेने या रुग्णालयांना दिलेल्या सवलतींचा फायदा घेऊनही अटी व शर्तीचे पालन न करणे, शासनाने व धर्मदाय आयुक्तांनी वारंवार सूचना देऊनही त्याकडे ह्या रुग्णालयांनी हेतुपुरस्सर दुर्लक्ष करणे, या विषयी सन २००६ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी त्वरीत कारवाईचे आश्वासन देऊनसुध्दा, शासनाच्या संबंधित विभागामार्फत व मुंबई महानगरपालिकेमार्फत सवलती देणे सुरुच असणे, या रुग्णालयांना देण्यात येणाऱ्या सवलती काढून घेऊन गरीब रुग्णांना मोफत उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांच्या नियमबाह्य वर्तनाविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम 1950 मधील कलम 41 अ 1 पोटकलम 4 प्रमाणे मी दिनांक 4 एप्रिल 2005 रोजी अर्धा-तास चर्चा सभागृहात उपस्थित केली होती. माननीय मंत्री महोदय श्री.हसन मुश्रीफ त्यावेळी चर्चेला उपस्थित होते. त्यावेळी मी आपल्या लक्षात आणून

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिले होते की, मुंबई शहरामध्ये अनेक रुग्णालये आहेत, त्यापैकी सध्या 70 धर्मादाय रुग्णालये आहेत. 200-250 धर्मादाय रुग्णालये या अधिनियमाखाली येऊ शकतात. ही रुग्णालये सामान्य माणसाला कोणत्याही प्रकारची सवलत देत नाही. मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम 1950 च्या कलम 41 अ नुसार 10 टक्के रुग्णांना मोफत सेवेचा लाभ देणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु कोणती रुग्णालये ही सेवा देत नाही याची यादी माझ्याकडे उपलब्ध आहे. माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी दिनांक 7.4.2005 रोजी म्हणजे सुमारे दोन वर्षापूर्वी अर्धा-तास चर्चेला उत्तर दिले होते, त्याचे प्रोसीडींग माझ्याकडे आहे. त्यावेळी मंत्री महोदय असे म्हणाले होते की, "झालेल्या काळातील वसूली करण्याचा विचार करु शकत नाही. परंतु यापुढे जे ट्रस्ट गरिबांना 10 टक्के योजनेअंतर्गत रुग्ण सेवा देणार नाहीत त्यांच्यावर शासन निश्चितपणे कारवाई करील".

सभापती महोदय, त्यावेळी माननीय मंत्री महोदय श्री.हसन मुश्रीफ यांनी उत्तराच्या भाषणात मान्य केले होते की, "माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी विधान परिषद नियम 92 अन्वये अर्धा-तास अन्वये चर्चा उपस्थित केलेली आहे. मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट 41 अ नुसार शासन व चॅरीटी कमिशनर यांना आदेश देण्याचे अधिकार आहेत. रुग्णालयामध्ये जेवढे बेडस् असतील त्याच्या 10 टक्के बेडस् हे गरीब रुग्णांसाठी व ऑपरेशनसाठी राखून ठेवायचे. रुग्णालयातील एकूण रुग्णसंख्येच्या 10 टक्के राखीव रुग्णांना ट्रिटमेंट द्यावयाची, असा बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्टनुसार शासन व चॅरीटी कमिशनर यांना आदेश दिलेला आहे ज्याचा उल्लेख सदस्यांनी केलेला आहे. मुंबईतील अनेक मोठमोठया रुग्णालयात अशी सेवा देण्याबाबत जनहित याचिका दाखल केली असून उच्च न्यायालयाने चॅरीटी कमिशनरला निर्देश दिलेले आहेत. या निर्देशानुसार चॅरीटी कमिशनरच्या अधिकाऱ्यांनी रुग्णालयाची तपासणी केली, आणि एकाही गरीब रुग्णांवर अशी रुग्णालये उपचार करीत नाहीत हे दिसून आलेले आहे. ही रुग्णालये जमिनीच्या किंमतीमध्ये सवलत घेतात, ऑक्ट्रायमध्ये सवलत घेतात. इतकेच नव्हेतर कायद्याप्रमाणे जे जे फायदे मिळतात ते सर्व फायदे घेतात. मात्र 10 टक्के गरीब रुग्णांवर उपचार करण्याची जी अट त्यांच्यावर लादलेली आहे त्या अटीप्रमाणे ते गरीब रुग्णांवर उपचार करीत नाहीत, हे मंत्री महोदयांचे उत्तर आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

एखाद्या रूग्णाचा मृत्यू झाल्यास संपूर्ण पेमेंट केल्याशिवाय त्याचे शव त्याच्या नातेवाईकांच्या ताब्यामध्ये दिले जात नाही. आता कोर्टानेच या बाबत निर्णय दिलेला आहे. पण मी आपल्याला विचारू इच्छितो की, आपण गेली दोन वर्षे काय केले ? आपण एकही पाऊल उचलले नाही. सभापती महोदय, माझ्याकडे यासंबंधातील सारी माहिती आहे. अंदाज समितीचा अहवाल देखील त्याबाबत आहे. जसलोक हॉस्पिटल आपल्या कायद्यातील कलमांची अमलबजावणी करते आहे काय ? तर त्याचे उत्तर 'नाही' असेच आपल्या अधिकाऱ्यानेच दिलेले आहे. त्यात इतरही सगळ्या रूग्णालयांची नावे आहेत आणि त्याच्यापुढे तेथे काय स्थिती आहे ते दाखविले आहे. भाटिया रूग्णालय - नाही, बॉम्बे हॉस्पिटलने मात्र ज्याप्रमाणे येथे सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागाकडून उत्तर दिले जाते की, हे अंशत: खरे आहे त्याप्रमाणे बॉम्बे हॉस्पिटलने देखील याबाबत 'अंशत: खरे आहे' असे उत्तर दिल्याचे दाखविले आहे. म्हणजे त्यांना खरी परिस्थिती मान्य करण्यास लाज वाटते म्हणून त्यांनी असे म्हटले असावे. त्यानंतर ब्रीचकॅण्डी हॉस्पिटल - नाही. लीलावती हॉस्पिटल - नाही. जैन हॉस्पिटल - नाही, रहेजा हॉस्पिटल - नाही. सभापती महोदय, या रहेजा हॉस्पिटलने उत्तर देताना एक अजब असे उत्तर दिलेले आहे. त्यांनी म्हटले आहे की, सदर हॉस्पिटलमार्फत रूग्णांना मोफत तसेच सवलतीच्या दरामध्ये उपचार देत होतो परंतु रूग्णालयाच्या इमारतीच्या दुरूस्तीचे काम सुरू असल्याने इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर रूग्णांना सवलतीच्या दरामध्ये उपचार करण्याचे आश्वासन दिलेले आहे. असे हा जो कोणी हरिचा लाल आपला शासकीय अधिकारी तपासणीसाठी गेला होता त्याने अहवाल दिलेला आहे. तसेच हिंदूजा रूग्णालय - नाही., नानावटी रूग्णालय - नाही. सभापती महोदय, या ठिकाणी या विषयी यापूर्वी चर्चा झाली होती तेव्हा सन्माननीय राज्यमंत्री श्री.मुश्रीफ हेच तेव्हाही येथे उपस्थित होते. त्यावेळी देखील आरोग्य मंत्री म्हणून डॉ.विमल मुंदडा होत्या. त्यांनी सांगितले की, यासाठी समिती नमली आहे आणि शासनाने ॲफिडेविट केले आहे. तसेच या कायद्याची कठोरपणे अमलबजावणी केली जाईल. सभापती महोदय, हा विषय मी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून येथे आणणार आह हे काल समजल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी माझ्याकडे एक कागद दिला होता. अशाच हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यानंतर रूग्णाच्या व त्याच्या नातेवाईकांच्या बाबतीत घडलेली वस्तुस्थिती त्यात त्यांनी दिली होती. हे प्रकरण अगदी अलिकडचे

...... सीसी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

आहे. 9.2.2007 चे आहे. सभापती महोदय, शासनाने केलेल्या कायद्याच्या अमलबजावणीबाबत नेहमी आम्ही येथे बोलतो, आपण जो सातत्याने शाहू-फुले-आंबेडकरांचा उल्लेख करून जनतेचे कैवारी आपणच आहात असे म्हणता पण प्रत्यक्षात तसे नाही असे जेव्हा आम्ही येथे सांगतो तेव्हा आपल्याला आम्ही टवाळी करतो आहे असे वाटते. खरे तर सर्वसामान्य जनतेला शासनाने केलेल्या कायद्याचा फायदा मिळाला पाहिजे. शासनाला 'मायबाप सरकार' असे म्हणतात. कारण आई-वडील ज्याप्रमाणे आपल्या अपत्यांची काळजी घेतात, त्यांचे भविष्य, आरोग्याची व्यवस्था पाहतात त्याप्रमाणे सरकारने काम करावयाचे असते आणि म्हणून सरकारला 'मायबाप सरकार' असे म्हटले जाते. आई-वडिलांच्या भावनेतून, भूमिकेतून शासनाने गरीब जनतेची काळजी घेतली पाहिजे. शासनाने जो कायदा केलेला आहे तो सर्वसामान्य माणसासाठी, गरीबांसाठी केलेला असतो. किंबहुना गरीब माणसाला डोळ्यासमोर ठेवूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कार्य केले आहे, भाषणे केली आहेत. तेव्हा खरे तर आपल्यापेक्षा आम्हीच त्यांना जास्त मानतो. त्यांनी जी 'घटना' तयार केली आहे तिचा मूळ गाभा हा दलित, पीडित, शोषित, गरीब माणूस आहे आणि त्यांना डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी घटना तयार केलेली आहे. श्रीमंत माणूस त्याला लागणारी हरएक वस्तू, हरएक गोष्ट पैसा टाकून घेऊ शकतो पण गरीबाला ते शक्य नसते आणि म्हणूनच त्याच्याकरिता सरकारने कायदे केलेले आहेत. पण सरकारने हा जो कायदा केला आहे त्याची अमलबजावणी आपण केलली नाही, करीत नाही. सभापती महोदय, मी या ठिकाणी एक प्रकरण आपल्याला सांगतो. श्री.प्रमोद नेरू नवार या इसमाच्या भावाला रहेजा रूग्णालयामध्ये ॲडमिट केले होते. तेथे रूग्णालयातील डॉक्टरांनी, तसेच प्रशासनाने त्यांना सांगितले की, तुला हार्ट अटॅक आलेला आहे, तुला तातडीने ॲंजिओप्लास्टी केली पाहिजे. त्याप्रमाणे त्याने ती केली. त्यानंतर तीन दिवसांनी ... सभापती महोदय, हा पोलिसांनी घेतलेला जबाब आहे. पोलीस निरीक्षक, पवई पोलीस ठाणे यांचेकडे मृत रूग्णाच्या बंधूंनी दिलेला हा जबाब आहे. तेथे त्यांना सांगण्यात आले की, तुमचे हृदय एक मिनिटासाठी बंद पडलेले आहे, नंतर फुफ्फुस बंद पडले आहे असे सांगितले, अशा अनेक गोष्टी सांगितल्या आणि त्यात त्या रूग्णाचा मृत्यू झाला. त्यानंतर त्या रूग्णाच्या भावाने, माझ्या भावावर काय उपचार केले त्याची कागदपत्रे द्या म्हणून रूग्णालय प्रशासनाकडे मागणी केली तेव्हा त्याला

...... सीसी 3 ...

श्री. मधुकर चव्हाण ....

सांगण्यात आले की, 4 लाख 52 हजार रूपये दिल्याशिवाय तुम्हाला काहीही दिले जाणार नाही आणि आजपर्यात त्याला काहीही दिलेले नाही. म्हणून तो शेवटी कोर्टामध्ये गेला आहे. या रूग्णालयांवर तुमचे नियंत्रण आहे काय ? येथे सदस्यांनी प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा, ठराव आणले की, मंत्री त्यावर उत्तरे देतात आणि निघून जातात. ...

( यानंतर श्री. सरफरे .... डीडी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

याठिकाणी मी प्रचलित शब्द वापरीत नाही. तुम्ही ते सर्व आडवे मारता? हा शब्द असंसदीय असला तरी त्याठिकाणी कुणी हजर रहात नाही. याठिकाणी जनतेचे, सार्वजनिक हिताचे प्रश्न आम्ही मांडतो. आम्ही लोकप्रतिनिधी म्हणजे काय असतो? जनतेच्या सुखदु:खाचे प्रतिबिंब आमच्या माध्यमातून सभागृहामध्ये उमटते. त्याची नोंद होत असते. ब्लॉटींग पेपर ज्याप्रमाणे शाई टिपते त्याप्रमाणे याठिकाणी प्रश्न विचारले जातात. तुम्ही ते टिपले पाहिजेत त्यांची नोंद घेतली पाहिजे. आणि आपण दालनामध्ये गेल्यानंतर अधिकाऱ्यांना बोलावून घेऊन त्याची अंमलबजावणी केली पाहिजे ती आपण करता कां? मी दोन वर्षापूर्वी अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती, तिला आपण वाटाण्याच्या अक्षता लावल्या. ही एक केस मी आपणाकडे देत आहे.

दुसरे प्रकरण रहेजा हॉस्पिटलचे आहे. डॉ. अलंकार खानविलकर यांनी तक्रार केली आहे. त्यांच्या आईला दि.16.12.2006 रोजी ॲडमिट करण्यात आले. तिच्यावर 16 दिवस ट्रिटमेंट करण्यात आली. आणि त्यांना सांगण्यात आले की, तुमची आई आता बरी आहे. तिला अतिदक्षता विभागामधून बाहेर काढतो. त्यांनी सांगितले की, मी देखील डॉक्टर आहे. तिला अतिदक्षता विभागामध्ये ठेवण्याची आवश्यकता आहे. एके दिवशी ती अत्यवस्थ झाल्यानंतर रात्री 2 वाजता त्यांनी सांगितले की, माझ्या आईला बरे नाही. स्टाफ नर्सने 5 ते 10 मिनिटामध्ये येऊन तिला इंजेक्शन ॲकनील दिले. आणि नंतर नेसल ऑक्सीजन वाढविला. मी नर्सला विचारले की, ही ट्रिटमेंट तुम्हाला द्यायला कुणी सांगितली?. त्यावेळी तिने सांगितले की, डयुटीवरील आर.एम.ओ. यांना पेशंटची कंडिशन फोनवर सांगितली. खाजगी रुग्णालयामध्ये काय चालते ते आपण बघा. एखाद्या शासन संचालित किंवा महानगरपालिका संचालित रुग्णालयाच्या बाबतीत आम्ही सभागृहात प्रश्न विचारल्यानंतर आपण ताबडतोब तेथील कर्मचाऱ्यांना सस्पेंड करता त्यांना सस्पेंड करण्याचा अधिकार देता? खाजगी रुग्णालयांवर तुमचा कंट्रोल आहे काय? आर.एम.ओ. हा 24 तास डयुटीवर असला पाहिजे परंतु तो आलेला नाही. आणि मग शेवटी दुर्दैवाने त्यांच्या आईचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी ट्रिटमेंटचे पेपर मागितले. त्यावेळी त्यांना सांगण्यात आले की, तुम्ही सर्व पैसे दिल्याशिवाय तुमच्या आईला काय ट्रिटमेंट दिली याचे डॉक्युमेंट आम्ही देणार नाही. याठिकाणी अशाप्रकारची दोन उदाहरणे दिली आहेत. ही जी रुग्णालये आहेत त्याठिकाणी कशाप्रकारचा कारभार चालू आहे, ही रुग्णालये कशी चालतात? सभापती महोदय, मी आपला अधिक वेळ घेत नाही. आपल्या माध्यमातून मी मागील सर्व प्रोसेडिंग त्यांना देणार आहे. आपण काय केले? 7 एप्रिल 2005 ला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ KTG/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण...

सभागृहात अर्धा तास चर्चा झाली होती. आज 5 एप्रिल आहे म्हणजे या गोष्टीला दोन वर्षे पूर्ण झ ााली. आपण हायकोर्टामध्ये काय ॲफिडेव्हिट केले.? त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी काय केले? या रुग्णालयांनी 10 टक्के ओ.पी.डी. पेशंट घेतले पाहिजेत. हॉस्पिटलच्या परिसरात अपघात झाला तर त्यांच्यावर उपचार केले जात नाहीत. इतकी दादागिरी आणि लूटमार त्याठिकाणी चाललेली असते. त्याठिकाणी एक विशिष्ट सर्कल आहे. ते हे चेकींग करा, ते चेकींग करा, ते चेकींग करा असे पेशंटला सांगत असतात. पेशंटची चांगली ओळख नसल्यामुळे त्याठिकाणी हे सर्व होते. सर्वसामान्य माणसांना वाटते की, ही मुंबई शहरातील रुग्णालये आपल्यासाठी आहेत. केईएम रुग्णालय असेल, नायर रुग्णालय असेल, लोकमान्य टिळक रुग्णालय असेल, भाटीया रुग्णालय असेल, राजावाडी रुग्णालय असेल या रुग्णांलयांमध्ये ओव्हरक्राऊड आहे. त्याठिकाणी इतकी गर्दी आहे की, एखादा पेडियाट्रिक वॉर्ड असेल, एखादा गायनाकॉजिकल वॉर्ड असेल, एखादा ई.एन.टी. चा वॉर्ड असेल, एखादा मेडिसीनचा वॉर्ड असेल, एखादा सर्जिकल वॉर्ड असेल, एखादा ऑर्थोपेडिक वॉर्ड असेल त्या वॉर्डामध्ये जर 50 खाटा असतील मर पेशंट 100 असतात. ओ.पी.डी. मध्ये एवढी रांग लागलेली असते की, रेल्वे स्टेशन्स त्यापेक्षा बरी. या रुग्णालयांमध्ये आरोग्य मंत्री कधी गेले आहेत काय? अकबर-बिरबलाच्या गोष्टीमध्ये राजा वेश बदलून जायचा आणि प्रजेचे हाल बघायचा त्याप्रमाणे आपण वेश बदलून कधी गेला आहात काय? त्यामुळे ही रुग्णालये ओव्हरक्राऊड्स आहेत. उदा. याठिकाणी महात्मा गांधी रुग्णालय आहे. त्यामध्ये 750 खाटा आहेत. डॉ. दत्ता सामंत यांनी गिरणी कामगारांची वाट लावली. त्यांच्या मृत आत्म्याबद्दल पूर्ण आदर ठेवून मी बोलतो. संपामध्ये सर्व कामगार उद्ध्वस्त झाले. आज त्याठिकाणी 150 पेशंट्स नाहीत. आज याठिकाणी अर्धा तास चर्चा उपस्थित करण्यात आली. त्यावेळी हे रुग्णालय सार्वजनिक रुग्णालय करावे अशी मागणी करण्यात आली. त्यावेळी आम्ही जोरात प्रयत्न करु असे याठिकाणी सांगण्यात आले. आम्हाला याचे गांभीर्य केव्हां लक्षात आले? जुलै महिन्यामध्ये रेल्वे गाडीमध्ये बॉम्बस्फोट झाले आणि ज्यावेळी प्रेते के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये यायला लागली त्यावेळी गांधी हॉस्पिटल आपल्याकडे प्रेते ठेवायला तयार नव्हते. ते म्हणाले की, आमच्याकडे शवागार नाही. के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये आत शिरल्यानंतर डाव्या बाजूला एकावर एक प्रेते ठेवण्यात आली होती.

(यांनंतर श्री. किल्लेदार)

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरू...

या ठिकाणी बाजूलाच असलेले महात्मा गांधी रूग्णालय रिकामे पडलेले आहे. ती सगळी आपलीच प्रॉपटी आहे, आपणच त्याचे विश्वस्त आहोत परंतु गेल्या दोन वर्षामध्ये काही केले नाही. मध्यंतरी बातमी आलेली होती की, या हॉस्पिटलमध्ये ऑनररी डॉक्टर आहेत त्यांना बाहेर खाजगी प्रॅक्टीस करण्यास परवानगी नाही. परंतु ते डॉक्टर खाजगी हॉस्पिटल चालवितात आणि ते हस्पिटलमये नावाला येतात. त्या हॉस्पिटलमध्ये ते हेड ऑफ द डिपार्टमेंट म्हणून काम करतात, ऑनररी म्हणून काम करतात, डेप्युटी ऑनररी म्हणून काम करतात. त्यांची खाजगी हॉस्पिटले असतात. सरकारी हॉस्पिटल ओव्हर क्राऊडेड असल्यामुळे मध्यमवर्गीय लोक आपले दागिने गहाण ठेवून आपल्या बंधूचे, मुलाचे प्राण वाचावे म्हणून खाजगी रुग्णालयामध्ये जातात. परंतु त्या ठिकाणी बकरा कापावा त्याप्रमाणे ही खाजगी रुग्णालये त्यांची लुटमार करतात. रुग्ण मेल्यानंतर डेड बॉडी मिळविण्यासाठी लाखो रुपये खर्च करावे लागतात. या संबंधाने अंदाज समितीमध्ये चर्चा झालेली होती. समितीचे माननीय सदस्य चटकन उभे राहून अहवाल सादर करतात. कोणत्याही समित्यांचे अहवाल सभागृहामध्ये सादर होतात त्यावेळेस ते एका मिनिटामध्ये सादर केले जातात. पण त्या अहवालामध्ये काय फाईंडींग काढलेल्या आहेत, कोणत्या सूचना केलेल्या आहेत, हे सांगितले जात नाही. अंदाज समित्यांसारख्या विधिमंडळाच्या वेगवेगळया समित्या असतात त्या समित्यामधील सदस्यांना भत्ता दिला जातो, जनतेच्या करातून जमा होणाऱ्या रक्कमेमधून मानधन मिळते. अंदाज समितीने खाजगी रुग्णालयांच्या संदर्भाने अहवाल दिलेला आहे. सभापती महोदय मी जास्त वेळ घेत नाही. सगळयाच रुग्णालयामध्ये असे आहे असे मला म्हणायचे नाही. परंतु शासनाने त्यांना 80 जी मध्ये सवलत दिलेली आहे. मुंबई महानगरपालिकेने पाणीपट्टीमध्ये सवलत दिलेली आहे. या रुग्णालयांना कमर्शियल रेटने पाणी न देता सवलतीच्या दराने पाणी दिले जाते. "रुग्ण सेवा ही ईश्वर सेवा " असे लिहिले जाते. परंतु प्रत्यक्षात ते दरोडेखोरांपेक्षा कमी नाही. हे फक्त लिहिण्यापुरते असते. या माध्यमातून मला विनंती करावाची आहे की, कायद्यामध्ये तरतूद केलेली आहे, त्याच्या अंमलबजावणीसाठी काय केलेले आहे ? याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे. सेक्शन 41 अअ खाली समाजातील गरीब लोकांसाठी 10 टक्के खाटा राखून ठेवणे, त्यांना ट्रीटमेंट देणे आवश्यक आहे. परंतु तसे काही होत नाही. सन्माननीय राज्यमंत्री श्री.मुश्रीफ साहेब उपस्थित आहेत. दोन वर्षामध्ये काय केले याचे उत्तर द्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण साहेबांनी धर्मादाय रुग्णालये मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,1950 मधील कलम 41 अअ चे पालन करीत नसल्याच्या संदर्भात अर्धा-तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे. याप्रमाणे खाजगी रुग्णालयामध्ये 10 टक्के खाटा गरिबांसाठी राखीव ठेवल्या पाहिजेत, त्यांनी रुग्णांना मोफत ओपीडीमध्ये सेवा उपलब्ध करून दिली पाहिजे, रुग्णालयामध्ये सवलतीचा जाहीर फलक लावला पाहिजे, अशा गोष्टी करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, 10 टक्के खाटा या आर्थिकदृष्ट्या, गरीब असलेल्या रुग्णांसाठी खाटा राखून ठेवायच्या आहेत. त्यांना 2 टक्के पीपीएफ फंड माफ करतो, त्याची ते सवलत घेतात. मुंबई महानगरपालिकेने चटई क्षेत्रामध्ये, जमिनीमध्ये सवलती दिलेल्या आहेत. परंतु 10 टक्के गरिंबासाठी जी सवलत द्यावयाची आहे ती देत नाहीत अशाप्रकारच्या तक्रारी लोकांकडून आणि लोकप्रतिनिधींकडून आलेल्या होत्या.

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .....

सभापती महोदय, धर्मादाय आयुक्तांनी या सर्व रुग्णालयांची एकदा पाहणी केली. त्यामध्ये असे दिसून आले की, ही रुग्णालये गरिबांसाठी सेवा देत नाहीत. त्यांच्यासाठी 10 टक्के खाटा आरक्षित ठेवत नाहीत. ज्या खाटा आरक्षित ठेवल्या म्हणून सांगतात त्या आपल्याच कर्मचाऱ्यांसाठी राखून ठेवतात आणि गरिबांसाठी आरक्षित केल्या होत्या असे सांगतात. यासाठी काय करावयाचे याबाबत एक योजना ते तयार करीत होते. दरम्यान उच्च न्यायालयामध्ये 3132/2004 क्रमांकाची एक जनहित याचिका दाखल झाली. त्या जनहित याचिकेची दखल घेऊन उच्च न्यायालयाने यामध्ये हस्तक्षेप केला. अजूनही त्याचे मॉनिटंरींग उच्च न्यायालय करीत आहे. त्यांनी धर्मादाय आयुक्तांना एक कमिटी करण्यास सांगितले. मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त, धर्मादाय आयुक्त, आरोग्य खात्याचे संचालक त्या कमिटीमध्ये आहेत. हायकोर्टाने त्यांना एक योजना बनवून देण्यास सांगितले. त्या कमिटीमध्ये या दवाखान्यांचे प्रतिनिधी सुध्दा होते. जी योजना उच्च न्यायालयामध्ये दाखल केली त्यामध्ये स्पष्टपणे 10 टक्के खाटा गरिबांसाठी, 10 टक्के खाटा अत्यंत गरिबांसाठी ठेवाव्यात अशी सूचना केलेली आहे. जे लोक तहसिलदाराचा दाखला आणतील, ज्यांच्याकडे दारिद्रय रेषेखालची शिधापत्रिका आहे अशा लोकांना या खाटा उपलब्ध करुन देण्याबाबत त्यामध्ये सूचना केली आहे आणि त्याचे संपूर्ण मॉनिटरींग त्या समितीकडे सोपवले आहे. या योजनेमध्ये स्पष्टपणे असे म्हटले आहे की, 10 टक्के खाटा गरिबांसाठी, 10 टक्के खाटा विकर सेक्शनमधील लोकांसाठी ठेवाव्यात. त्या याचिकेच्या बाबतीत बऱ्याच तारखा झाल्या. जी धर्मादाय रुग्णालये आहेत त्यांनी मोठमोठे वकील दिले. त्यांनी सांगितले की, आम्हाला हे परवडणार नाही. हार्टचे ऑपरेशन असेल, कॅन्सरचे ऑपरेशन असेल किंवा दुसरे मोठे ऑपरेशन असेल त्याकरिता आमची सुविधा देऊ परंतु बाहेरुन जी औषधे आणावी लागतात किंवा जे साहित्य आणावे लागते ते आम्हाला परवडणार नाही असे त्यांनी सांगितले. याबाबत सारासार विचार करुन या दवाखान्यांना जी देणगी मिळते त्याचे वेगळे खाते उघडावयाचे. त्या खात्यातील निधी आणि आम्ही त्यांच्या उत्पन्नावर आधारित ट्रस्टची जी फी आहे त्यामध्ये 2 टक्के सवलत देतो तो निधी घेऊन त्यातून गरिबांचा खर्च करावयाचा अशी योजना तयार केली. त्या योजनेप्रमाणे त्या कमिटीने 29.1.2007 रोजी सगळ्या दवाखान्यांची पाहणी केली. ती पाहणी केल्यानंतर असे दिसून आले की, भाटिया रुग्णालयाने त्याची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

अंमलबजावणी सुरु केली नाही. बाकीच्या सर्व रुग्णालयानी अंमलबजावणी केली. भाटिया रुग्णालयाविरुध्द फौजदारी केस दाखल केली आहे. त्यांनी हायकोर्टामध्ये जाऊन स्थगिती मिळविण्याचा प्रयत्न केला. याबाबतचे संपूर्ण मॉनिटरींग हायकोर्टाने आपल्या हातामध्ये घेतलेले आहे. त्या रुग्णलयांनी गरीब रुग्णांना सेवा देणे कंपल्सरी झालेले आहे. त्यांना जो फंड मिळतो तो ताळेबंदामध्ये दाखवावा, त्याचे ऑडीट करुन घ्यावे असा दंडक उच्च न्यायालयाने त्यांच्यावर घातलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी पेशन्टच्या बाबतीत दुसरे जे सांगितले ते सार्वजनिक आरोग्य खात्याशी संबंधित आहे. जे गरीब रुग्ण आहेत, जे विकर सेक्शनमधील रुग्ण आहेत त्यांच्यासाठी या रुग्णालयांनी 10 टक्के खाटा राखून ठेवणे, त्यांची मोफत शुश्रृषा करणे, त्यांचे ऑपरेशन करणे याबाबत ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यांना ट्रस्ट ॲक्टच्या अंतर्गत दोन टक्के सवलत देतो. त्यांना इतर सगळ्या सवलती मिळालेल्या आहेत. त्यांना महापालिकेच्या सवलती मिळालेल्या आहेत. त्यांना शासनाच्या जमिनी दिलेल्या आहेत. राज्यामध्ये असे एकूण 92 दवाखाने आहेत. यामध्ये जसलोक हॉस्पिटल, ब्रिचकँडी हॉस्पिटल, लिलावती हॉस्पिटल अशी मोठमोठी हॉस्पिटल्स आहेत आणि ते काम करीत आहेत. भाटिया हॉस्पिटलने ते काम केले नाही म्हणून त्यांच्यावर फौजदारी केस दाखल केली आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगेन की, असे जे गरीब लोक आहेत, ज्यांच्याकडे तहसीलदाराचा दाखला आहे, ज्यांच्याकडे दारिद्रय रेषेखालील शिधापत्रिका आहे अशांची नावे माझ्याकडे किंवा धर्मादाय आयुक्तांकडे दिली तर त्यांच्यावर उपचार करण्याच्या बाबतीत धर्मादाय खाते मॉनिटरींग करील. तशा प्रकारचा दंडक हायकोर्टाने घातलेला आहे. हायकोर्ट दर दोन महिन्यांनी पूर्ण मॉनिटरींग करते. उच्च न्यायालयाने याची दखल घेतलेली आहे. शासनाने सातत्याने याचा पाठपुरावा केलेला आहे. या गरीब लोकांना मोठ्या दवाखान्यांमध्ये शुश्रृषा मिळण्याची सोय उपलब्ध झालेली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे त्याबाबत व्यक्तीश: त्यांच्याबाबत मी शंका घेत नाही. कारण अधिकाऱ्यांनी त्यांना जी माहिती दिली त्याप्रमाणे त्यांनी उत्तर दिलेले आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आपण संध्याकाळी या सगळ्या रुग्णालयांमध्ये एक राऊंड घेऊ.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, ते कमिटी बरोबर केंव्हाही जाऊ शकतात.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराबद्दल मला कोणतीही शंका घ्यावयाची नाही. परंतु कोणत्याही धर्मादाय रुग्णांलयामध्ये "ओ.पी.डी.मध्ये 10 टक्के गरीब रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा दिली जाते" असे लिहिलेले फलक नाहीत. लिलावती, ब्रिचकँडी, हिंदुजा, अशा सारख्या रुग्णालयांमध्ये ओ.पी.डी.मध्ये किती गरीब रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा दिलेली आहे ? हिंदुजामध्ये गरीब माणूस वैद्यकीय सेवा घेण्यासाठी गेला होता. त्यावेळी त्याच्याकडून डॉक्टरांनी 800 रुपये फी घेतली. त्या डॉक्टरांनी सांगितले की, त्यांची तेवढीच फी आहे. माझा मंत्री महोदयांना एकच प्रश्न आहे की, या गरीब रुग्णांना या धर्मादाय रुग्णालयांतून वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत कोणती सिस्टीम केलेली आहे? एखादी व्यक्ती मंत्र्यांकडे आल्यानंतर मंत्री महोदय त्या व्यक्तीला चिठ्ठी देतील. परंतु सर्वसामान्य माणूस मंत्र्यांकडे येऊ शकत नाही. जसलोक, भाटीया, लिलावती इत्यादी रुग्णालयांमधून किती हार्ट सर्जरी आणि बायपास सर्जरी मोफत केल्या, याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी पटलावर ठेवावी. या रुग्णालयांमधून ओ.पी.डी.मध्ये किती रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा दिली, याचीही माहिती पटलावर ठेवावी. सभापती महोदय, लिलावती रुग्णालयामध्ये झोपडपट्टीतील एखादा गरीब माणूस गेला तर त्या रुग्णालयाचा वॉचमन त्याला आत देखील घेणार नाही. सार्वजनिक रुग्णालयांमध्ये इनडोअर पेशण्ट आणि ओ.पी.डी.चे रजिस्टर ठेवलेले असते. त्याप्रमाणे या धर्मादाय रुग्णालयातून 10 टक्के रुग्णांचे रजिस्टर ठेवले जाते काय ? सभापती महोदय, अशा प्रत्येक धर्मादाय रुग्णालयातून गरीब रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी एमएसडब्ल्यूची नेमणूक करावयास पाहिजे. सन्माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत जे काही नियम आहेत ते सांगितले. परंतु त्या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने एमएसडब्ल्यू सारख्या व्यक्तीची नेमणूक करावी, त्यासंदर्भात एक सिस्टिम तयार करावी.

श्री. हसन मुश्रीफ : लोकसत्ता आणि इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रातून ही योजना आणि रुग्णालयांची नावे प्रसिध्द केली होती. ज्या रुग्णालयामध्ये बोर्ड लावलेले नसतील त्यांच्यावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हसन मुश्रीफ...

कंटेम्प्टची कारवाई होईल. या योजनेमध्ये फलक कुठे लावयचे हे आमच्या विभागाचे लोक पाहून आलेले आहेत. त्याबाबतीत मॉनिटरिंग होत आहे. मी सर्वसाधारण व्यक्तींसंबंधी काही सांगत नाही. परंतु जे गरीब लोक आहेत, ज्यांच्याकडे शिधापत्रिका आहे, तहसिलदाराचा दारिद्र रेषेखालील असल्याचा दाखला आहे, अशा लोकांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी म्हणून सन्माननीय सदस्यांनी अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे...

**तालिका सभापती** : प्रत्येक रुग्णालयामध्ये शासनाच्या वतीने एमएसडब्ल्यूची नेमणूक केली जाईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : नावे धर्मादाय आयुक्तांकडे द्यावीत, रुग्णालयामध्ये कोणी ऐकले नाही तर कुठे तक्रार करायची यासंबंधीची योजना वर्तमानपत्रातून जाहीर केलेली आहे.

श्री. संजय केळकर : माननीय मंत्री महोदयांनी 93 धर्मादाय रुग्णालये असल्याचे सांगितले. या 93 धर्मादाय रुग्णालयांना भेटी दिल्या तर त्यातील 50 रुग्णालयांवर तरी नियमांची अंमलबजावणी करीत नसल्याबद्दल गुन्हे दाखल करावे लागतील. शासनाने भूखंड दिलेले धर्मादाय रुग्णालये किती आहेत ? तसेच महानगरपालिकेअंतर्गत सवलती देण्यात आलेली धर्मादाय रुग्णालये किती आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भातील यादी फार मोठी आहे. प्रत्येक रुग्णालयाला कोणकोणत्या सवलती दिलेल्या आहेत याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. संजय केळकर : किती रुग्णालयांना सवलती व भूखंड दिले ? महानगरपालिकेअंतर्गत किती रुग्णालयांना भूखंड दिलेले आहेत ? या 93 धर्मादाय रुग्णालयांतून नियमांची अंमलबजावणी केली जाते की नाही हे पाहण्यासाठी त्या धर्मादाय रुग्णालयांना येत्या 15 दिवसात भेट देण्यात येईल काय ?

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 13:45

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासन ज्या ज्या सवलती देते, उदा.चटईक्षेत्राची सवलत, जागा देण्याकरिता सवलत, 2 टक्के ट्रस्ट फीमध्ये सवलत दिली जाते तसेच जी मशिनरी परदेशातून आयात केली जाते त्याकरिता भरावी लागणारी एक्साईज डयुटी माफ केली जाते, विक्रीकरामध्ये सवलत दिली जाते. अशा अनेक सवलती आहेत. याची यादी पटलावर ठेवण्यात येईल. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे, त्यांनी त्या समितीसोबत रुग्णालयाला भेट द्यावी. मला जी माहिती देण्यात आली आहे त्यानुसार सगळया रुग्णालयांनी सुविधांबाबतच्या माहितीचा फलक लावलेला आहे.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : सन्माननीय महोदय, आपण त्या समितीसोबत भेट देण्यासाठी जायला तयार आहात का?

श्री.हसन मुश्रीफ : होय.

श्री.मधुकर चव्हाण : या सर्वसामान्य माणसाची जी लुटमार झाली त्याचे काय करणार आहात? दिनांक 10.1.07 रोजी 30 हजार रुपये भरावेत असे रुग्णालयाकडून सांगण्यात आल्यानंतर त्यांनी दुसऱ्या दिवशी 30 हजार रुपये भरले. दिनांक 11.1.07 रोजी पुन्हा 50 हजार रुपये भरावेत असे सांगण्यात आले.

**तालिका सभापती** : ही व्यक्ती दारिद्र्य रेषेखालील आहे का?

श्री.मधुकर चव्हाण : होय. कुठून आणणार एवढे पैसे? लोकप्रतिनिधी म्हणून आमच्याकडे तक्रार पाठविण्यात आली. या व्यक्तीच्या भावाचा मृत्यू दाखला 4.52 लाख रुपयांचे बिल भरल्याशिवाय दिलेला नाही. मी उदाहरण म्हणून सांगितले. शासन हिरानंदानी रुग्णालयाकडे विचारणा करील का? सेक्शन 41एए खाली 10 टक्के सवलतीचा अर्ज करुनही त्यांना सवलत का दिली नाही?

**तालिका सभापती** : मंत्रीमहोदयांनी मान्य केले आहे, ती व्यक्ती जर दारिद्र्य रेषेखालील असूनही अशा पध्दतीची ट्रिटमेंट दिली असेल तर रुग्णालयाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल.

श्री.हसन मुश्रीफ : होय. सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे या प्रकरणाची माहिती द्यावी. शासन खटला दाखल करण्यास तयार आहे. त्याशिवाय इतर दारिद्र्य रेषेखालील रुग्णांची माहिती असेल तर ती देखील माझ्याकडे द्यावी. धर्मादाय आयुक्तांना सांगून त्यांना मोफत उपचार देण्याची व्यवस्था करता येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : अशा प्रकारची केस समोर आली तर या धर्मादाय रुग्णालयांच्या वर्तणुकीवर दहशत बसेल आणि गरीब रुग्णांना सवलतीच्या दरात सुविधा मिळतील.

--------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील अनुदानित शिक्षण संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन योजना लागू करणे.

**मु.शी.**: राज्यातील अनुदानित शिक्षण संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन योजना लागू करणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धातास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धातास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे अनुदानित संस्थामधील शिक्षक शिक्षकेतरांना निवृत्तीवेतन योजना लागू असणे, राज्य शासनाने निवृत्तीवेतन योजनेत बदल करुन ३१ ऑक्टोंबर, २००५ च्या आदेशानुसार लागू केलेली नवीन निवृत्तीवेतन योजना, नवीन योजना १ नोव्हेंबर, २००५ अथवा त्यानंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना लागू असणे, महाराष्ट्रात सध्या जून, २००० पासून शिक्षण सेवक योजना सुरु असून शिक्षण सेवकास ३ वर्षानंतर वेतनश्रेणी मिळत असल्यामुळे वेतनश्रेणी मिळण्याच्या तारखेपासून सेवा ग्राह्य धरणे अवैध व अन्यायकारक असणे, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांनाही पूर्वीची निवृत्तीवेतन योजना लागू करावी मग ते शिक्षण सेवक असोत किंवा वेतनश्रेणीत असो हे विचारात न घेता लागू करण्याची असलेली मागणी, शिक्षण सेवकाचा कालावधी हा अर्हताकारी सेवा धरला जात असल्याने दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या शिक्षण सेवकांना नवीन पेन्शन योजना लागू होत नसल्यामुळे त्यांचेवर होणारा अन्याय याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ज्या सोयी, सवलती व सुविधा मिळतात त्या बहुतेक सोयी, सवलती व सुविधा अनुदानप्राप्त शिक्षण संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्या त्या विभागाच्या फेरफारासह लागू आहेत. अनुदानित शाळांमध्ये काम करणाऱ्या, मग ती प्राथमिक शाळा असेल, माध्यमिक शाळा असेल, उच्चमाध्यमिक शाळा असेल या शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेली सेवानिवृत्ती वेतन योजना लागू आहे. या निवृत्तीवेतन योजनेखाली जो काही आर्थिक बोजा शासनावर पडतो अशा प्रकारचे शासनाचे म्हणणे आहे म्हणून या सेवानिवृत्ती

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

योजनेमध्ये बदल करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ रोजी शासनाच्या वित्त विभागाने एक आदेश काढला आहे. या नवीन आदेशानुसार केंद्र शासनाने त्यांच्या सेवेमध्ये दिनांक १ जानेवारी, २००४ रोजी किंवा त्यानंतर नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना म्हणजे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली. महाराष्ट्र शासन सुध्दा ही योजना लागू करण्याचा विचार करीत होते. या संदर्भात महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला आहे. तो निर्णय असा आहे की, "शासनाने असा निर्णय घेतला आहे की, शासन सेवेत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी.....

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजने ऐवजी, केंद्रशासनाच्या धर्तीवर, नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" खाली नमूद केल्यानुसार, लागू करण्यात येईल. नवीन योजना राज्य सरकारी कर्मचा-यांना शासनाने लागू केलेली आहे. 31 ऑक्टोबर, 2005 रोजीच्या निर्णयामध्ये शासनाने असे म्हटलेले आहे की, "शासन असा आदेश देत आहे की, ज्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तिवेन योजना व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू आहे, अशा मान्यताप्राप्त व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषी विद्यापीठे आणि त्यांच्या संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषी विद्यापीठे इत्यादींच्या सेवेमध्ये 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील," याचा अर्थ 1 नोव्हेंबर , 2005 किंवा त्यानंतर सेवेत येणारे जे कोणी शासकीय कर्मचारी असतील किंवा अनुदानित संस्थेमध्ये काम करणारे शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी असतील त्यांना 31 ऑक्टोबर, 2005 च्या निर्णयानुसार नवीन पेन्शन योजना लागू होईल. या ठिकाणी एक बेसिक प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने 1 नोव्हेंबर, 2005 ही डेड लाईन इन सर्व्हीस ठरवून दिलेली आहे. त्या दिवशी किंवा त्या नंतर येणारे याचा अर्थ असा आहे की, 31 ऑक्टोबर, 2005 पर्यंत जे कर्मचारी सेवेत होते किंवा जे शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी अनुदानित संस्थेत सेवेत होते त्या कर्मचा-यांना नवीन पेन्शन योजना लागू होणार नाही. त्यामुळे प्रश्न असा निर्माण झाला आहे की, एंट्री इन सर्व्हीस हा सर्वात महत्वाचा फॅक्टर आहे. जो या योजनेत लागू होण्यासाठी आहे. म्हणजे सेवेमध्ये आल्यानंतर प्रथम दिनांक महत्वाचा असतो, ज्याच्या आधारे पेन्शन योजना लागू होण्याचा थेट संबंध येतो. परंतु शैक्षणिक संस्थेमध्ये जो गुंता निर्माण झालेला आहे तो शिक्षण सेवक योजनेमुळे झालेला आहे. महाराष्ट्र शासनाने 13 ऑक्टोबर, 2000 च्या निर्णयानुसार अनुदानित शिक्षण संस्था, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेमध्ये नवीन शिक्षण सेवक योजना लागू केलेली आहे. शिक्षण सेवक योजनेअंतर्गत कर्मचा-यांची नेमणूक शिक्षक म्हणून होत असते. परंतु शासनाची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे, शासनास आर्थिक चणचण असल्यामुळे, शासनाची आर्थिक परिस्थिती ढासळलेली असल्यामुळे, शासना जवळ पैसे नसल्यामुळे शासन शिक्षण सेवकांना तीन वर्षे

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

सुरुवातीस वेतन न देता मानधन देत असते. तीन वर्षानंतर हे शिक्षक वेतनश्रेणीत काम करण्यास सुरुवात करीत असतात. खरा प्रश्न असा येतो की, अनेक शिक्षण सेवक हे 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी सेवेत आलेले आहेत. जे शिक्षक 2004 मध्ये सेवेत आलेले आहेत ते 2007 मध्ये वेतनश्रेणीत येतात, जे शिक्षक 2003 मध्ये सेवेत आलेले आहेत ते 2006 मध्ये वेतनश्रेणीत येतात. याचा अर्थ असा आहे की, जे शिक्षक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी नियुक्त झालेले आहेत, ज्यांना मानधन मिळत होते अशा कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू होईल. ज्या दिवशी शिक्षक नियुक्त झालेला आहे तो दिवस एंट्री इन सर्व्हीस म्हणून ग्राहय धरुन जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी अशी आमची मागणी आहे. परंतु शासकीय अधिकारी याचा अर्थ असा लावतात की, ज्या शिक्षकांना 1 नोव्हेंबर, 2005 रोजी वेतनश्रेणी लागू झालेली आहे,

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.........

त्यांना पूर्वीची निवृत्ती योजना लागू होणार नाही. त्यांना मानधन मिळाले की वेतनश्रेणी मिळाली हा प्रश्न महत्वाचा नसून त्यांना ही योजना लागू करणे हे महत्वाचे आहे. एन्ट्री इन सर्व्हीस हा बेसिक फॅक्टर आहे. तेव्हा मानधनावर काम केले किंवा वेतनश्रेणीवर काम केले याचा विचार न करता सर्व शिक्षकांना, शिक्षण सेवकांना जे 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी सर्व्हीसमध्ये आलेले आहेत त्या सर्वांना नवीन पेन्शन योजना लागू होणार नाही. त्यांना शासनाची पूर्वीचीच पेन्शन योजना लागू होते. तेव्हा या संदर्भात निर्णय होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाने दिनांक 28 नोव्हेंबर 2006 रोजी राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानीत शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर संदर्भात एक जी.आर.काढला. त्यामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, "वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी 12 वर्षाची अर्हताकारी सेवा विचारात घेताना अन्य अटींची पूर्तता करीत असल्यास शिक्षण सेवक म्हणून व्यतीत केलेला कालावधी विचारात घ्यावा." याचा अर्थ शिक्षण सेवक म्हणून व्यतीत केलेला कालावधी हा निवडश्रेणीसाठी ग्राह्य असेल तर तो जुन्या पेन्शन योजनेसाठी सुध्दा ग्राह्य आहे. तेव्हा या जी.आर.प्रमाणे सर्व योजनांसाठी शिक्षण सेवक म्हणून व्यतीत केलेला कालावधी ग्राह्य धरला जावा. दिनांक 1 नोव्हेंबर 2005 नंतर शिक्षक किंवा शिक्षण सेवक म्हणून या क्षेत्रामध्ये जे कोणी कर्मचारी आले त्यांना 31 ऑक्टोबर 2005 रोजीची जुनी पेन्शन योजना लागू न होता नवीन अंशत: पेन्शन योजना लागू होईल. आज महाराष्ट्रात असे अनेक शिक्षक आहेत की, जे 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी सेवेत आले तेव्हा त्यांना मानधन मिळत होते. त्यांनी तीन वर्षाचा कालावधी पूर्ण केल्यानंतर त्यांना शिक्षक वेतनश्रेणीवर घेण्यात आले परंतु त्यांचा भविष्य निर्वाह निधी सुरु झालेला नाही. पूर्वीच्या शिक्षकांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्यात आली होती. ती योजना या शिक्षकांना लागू करण्यास आपले अधिकारी नकार देत आहेत. त्यामुळे 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांवर अन्याय होत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.........

सभापती महोदय, मी या निमित्ताने आपल्यामार्फत मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आम्ही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासंबंधी दिलेली लक्षवेधी सूचना, प्रश्न स्वीकृत होत नाहीत. म्हणून अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. जेव्हा आम्ही राज्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न येथे मांडतो तेव्हा चर्चेच्या माध्यमातून शासनाने निर्णय घेणे आवश्यक असते.परंतु मला खेदाने म्हणावेसे वाटते की, एकदा चर्चा संपली की, त्या विषयाची फाईल बंद होते. शिक्षकांच्या रजेच्या संदर्भात दोन वर्षापूर्वी चर्चा झाली. परंतु त्यासंदर्भात शासनाने अद्यापपर्यंत निर्णय घेतलेला नाही. सेवाखंड क्षमापनाच्या बाबतीत अधिकारी चुकीचे इन्टरप्रिटेशन करतात. त्यामुळे शिक्षक त्या योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेले आहेत. याबाबतीत सुध्दा मी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केला होता, परंतु त्या बाबतीत सुध्दा अद्यापपर्यंत निर्णय झालेला नाही. आम्ही येथे चर्चा करायची, मंत्रिमहोदयांनी उत्तरे द्यायची. मात्र निर्णयाची अंमलबजावणी होणार नसेल तर त्याला काहीच अर्थ नाही. म्हणून माझी आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, हा अत्यंत महत्वाचा विषय प्रश्न आहे. तेव्हा या संदर्भात निर्णय होणे आवश्यक आहे, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी राज्यातील अनुदानीत माध्यमिक शाळांतील शिक्षक, शिक्षण सेवक यांना निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून हा विषय मांडलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, दिनांक 4 नोव्हेंबर 1968 पासून निवृत्ती योजना सुरु केलेली आहे.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )

श्री.हसन मुश्रीफ...

दरवेळी केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे त्यामध्ये फेरबदलही केलेला आहे. केंद्र शासनाने दिनांक 1 जानेवारी, 2004 रोजी त्यांच्या सेवेत नवीन रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन अशंदान निवृत्ती योजना जाहीर केलेली आहे. त्यासंबंधीचा उल्लेख आताच सन्माननीय सदस्यांनी केला. परिभाषित निवृत्ती योजनेमध्ये पूर्वी राज्याचा हिस्सा नव्हता. परंतु आता तो हिस्सा केंद्र शासन आपल्या राज्य शासनाकडून गोळा करुन घेणार आहे. दिनांक 22 डिसेंबर 2003 रोजी ही योजना सगळया राज्यांना केंद्र शासनाने लागू केलेली आहे. त्याप्रमाणे आपल्याही राज्य सरकारने दिनांक 1 नोव्हेबर, 2005 नंतर सेवेत येणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना जूनी निवृत्ती योजना रद्द करुन नवीन योजना लागू केलेली आहे. जून्या लोकांनाही ती लागू राहील. दिनांक 31 ऑक्टोबर, 2005 पर्यंतचे जे कर्मचारी आहेत, त्यांना जूनी निवृत्ती योजना लागू राहील. परंतु दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 नंतरच्या लोकांना नवीन निवृत्ती योजना लागू होईल. तसेच, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मुख्य मुद्दा हा शिक्षण सेवकांचा मांडला. काटकसरीच्या कारणास्तव राज्य सरकारने शिक्षण सेवकाची योजना सुरु केली. शिक्षण सेवकांना मान्यता मिळाल्यानंतर त्यांना तीन वर्षानंतर शिक्षकाची वेतनश्रेणी मिळते, तोपर्यंत ते मानधनावर असतात. परंतु त्यांना पेन्शनची योजना लागू होईल की नाही, याबाबत माननीय सदस्यांनी शंका व्यक्त केली, त्यासंदर्भात त्यांची सूचना रास्त असून शिक्षण सेवकाची सेवा निवडश्रेणीमध्ये व वरिष्ठश्रेणीमध्ये धरली जाते. त्यामुळे त्यांनाही आपण या योजनेचा लाभ देणार आहोत. फक्त याबाबतीतील एन्ट्री इन सर्व्हीस हेच ग्राहय धरण्यासंबंधी वित्त विभागाशी चर्चा करुन जी जूनी पेन्शन योजना आहे तीच लागू करण्यासंबंधीचा आमचा मनोदय आहे, एवढे मी निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी याठिकाणी दोन-तीन मुद्दे उपस्थित केले, त्यासंबंधीचे निर्णय मिळत नाहीत. माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टपणे "होकारार्थी" किंवा "नकारार्थी" असे स्पेसिफीक उत्तर द्यावे. मी याठिकाणी परत मागणी करतो की, आपण किती दिवसांत यासंबंधी निर्णय घेणार आहात ?

..2.....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन-तीन मुद्यासंबंधी अर्धातासाची सूचना उपस्थित केलेली आहे. सेवाखंड क्षमापित करण्यासंबंधीची अर्धातासाची चर्चा उपस्थित करुनही त्याचा निर्णय लागला नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच, रजेच्यासंदर्भातही चर्चा उपस्थित करुनही निर्णय झालेला नाही, अशी त्यांनी भावना व्यक्त केली. याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, या दोन्ही मुद्यांच्या बाबतीत नेमकी परिस्थिती काय आहे, ती सदस्यांना कळविण्यात येईल. तसेच, याठिकाणी मी हेही सांगू इच्छितो की, दिनांक 1 नोव्हेंबर,2005 पूर्वीचे जे शिक्षण सेवक असतील त्यांना जुनी निवृत्तीवेतनाची योजना लागू करण्यात येईल. यासंबंधी अधिवेशन झाल्यानंतर एक बैठक घेण्यात येईल व त्यातून मार्ग काढण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : अधिवेशन झाल्यानंतर म्हणजे कधी ?

श्री.हसन मुश्रीफ : अधिवेशन झाल्यानंतर म्हणजे एका आठवडयाच्या आत.

----------

..3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून ग्रामीण व शहर सेवा अशा दोन प्रकारे प्रवासी कर वसूल करण्यात येणे

**मु. शी.** : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून ग्रामीण व शहर सेवा अशा दोन प्रकारे प्रवासी कर वसूल करण्यात येणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून ग्रामीण व शहर सेवा अशा दोन प्रकारे प्रवासी कर वसूल करण्यात येणे, करापोटी प्रवाशांकडून 103.50 पैसे तिकीटाचे घेतल्यास त्यातील 3.50 पैसे प्रवासी कर म्हणून शासनाला देय असताना शासनाने 3.63 पैसे वसूल करुन माहे एप्रिल, 2001 ते डिसेंबर, 2005 या कालावधीत राज्य परिवहन महामंडळाकडून सुमारे 283.63 कोटी रुपये जादा वसूल करणे, असे महालेखापाल (वाणिज्यिक) यांनी महामंडळाकडे पाठविलेल्या मसुदा परिच्छेदात नमुद करणे, करापोटी जादा वसूली केलेले पैसे शासनाने त्वरीत राज्य परिवहन महामंडळाला परत करण्याची आवश्यकता, राज्य परिवहन महामंडळाला इतर राज्यांप्रमाणे प्रवासी करात व डिझेलवर आकारण्यात येणाऱ्या विक्रीकरात विशेष सुट देण्याची गरज, बेकायदा प्रवासी वाहतुकीवर शासनाकडून कोणताही अंकूश ठेवला न जाणे, राज्यभरात सुमारे 90 हजार छोटी वहाने बेकायदा प्रवासी वाहतूक करीत असणे असे आढळून येणे, तसेच खाजगी बस वाहतूकदारांना पर्यटक वाहतुकीकरीता परवाना दिला जाणे, त्यांनी बेकायदेशीररित्या प्रवासी टप्पा वाहतुकीने ने-आण करणे, या बसना मार्ग फलक लावणे, व्यक्तिगत आरक्षण करणे, शहरांअतंर्गत थांब्यावरुन प्रवासी घेणे, प्रवाशांच्या नावाची यादी नसणे, अथवा यादीमध्ये वेगळी नावे असणे, तसेच महामंडळाच्या बस थांब्यावर बस उभी करुन प्रवासी घेणे, इत्यादी प्रकारे खाजगी बस वाहतुकदार परिवहन कायद्याचे उल्लंघन करीत असणे, त्याचा फटका राज्य परिवहन महामंडळाला बसणे, त्याचबरोबर राज्य परिवहन महामंडळाचे ड्रायव्हर व कंडक्टर यांनाही प्रवाशांबरोबर सौजन्याने वागण्याचे प्रशिक्षण देण्याची गरज असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ......

सभापती महोदय, मी आपला अधिक वेळ न घेता काही आकडेवारी वाचून दाखविणार आहे.त्या संबंधी 2-3 गोष्टींचा उल्लेख करुन मी माझे भाषण संपविणार आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून प्रवासी कर वसूल करण्यात येतो. याबाबतीत महालेखापालांनी (वाणिज्यिक) महामंडळाकडे पाठविलेल्या मसुदा परिच्छेदात म्हटले आहे की "महामंडळाकडून ग्रामीण आणि शहर सेवा अशा दोन प्रकारे प्रवासी कर वसूल करण्यात येतो.बॉम्बे मोटार वाहन (कर) कायदा 1958 अनुसार प्रवाशांकडून 117.50 रुपये तिकिटाच्या भाडयापोटी घेण्यात आल्यास त्या मधील 17.50 रुपये प्रवासी करापोटी घेणे आवश्यक आहे. तथापि, पहिल्या प्रकारच्या करापोटी महामंडळाकडून सरकारने 20.56 रुपये याप्रमाणे वसूल केले आहेत.

दुसऱ्या करापोटी प्रवाशांकडून तिकिटाच्या भाडयापोटी 103.50 रुपये घेतल्यास त्यापैकी 3.50 रुपये हे प्रवासी कर म्हणून घेणे आवश्यक असताना सरकारने 3.63 रुपये वसूल केले आहेत. त्यामुळे एप्रिल 2001 ते डिसेंबर 2005 या कालावधीत सरकारने महामंडळाकडून तब्बल 283.63 कोटी रुपये महामंडळाला देणे आवश्यक आहे. महामंडळाने 2000-01या वर्षासाठी प्रवासी करापोटी सरकारला 359.06 कोटी रुपये दिले होते. तीच रक्कम 2004-2005 या वर्षासाठी 455.63 कोटी रुपये इतकी वाढली आहे. डिसेंबर 1975 पासून गेल्या 32 वर्षात मोफ्फुसील आणि शहर सेवा कराचा दर अनुक्रमे 17.5 आणि 3.5 टक्के इतका असताना सुध्दा त्यांच्याकडून भरमसाठ वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या महामंडळाकडून 17.5 टक्के प्रवासी कर आकारण्यात येत आहे. परंतु कर्नाटक आणि आंध्रप्रदेश महामंडळाकडून जो प्रवासी कर आकारला जात आहे तो कमी आहे.उत्तर प्रदेशमध्ये सुध्दा प्रवासी कर यापेक्षा कमी आकारला जातो.

महाराष्ट्रात डिझेलवरील विक्रीकरही अन्य राज्यांच्या तुलनेत जास्त आहे. महाराष्ट्रात 36.60 टक्के विक्रीकर आकारण्यात येतो. कर्नाटक आणि आंध्रप्रदेशात ही टक्केवारी अनुक्रमे 25 आणि 22.25 टक्के इतकीच आहे, तर उत्तर प्रदेशात केवळ 5 टक्केच विक्रीकर आकारण्यात येतो. महाराष्ट्रात प्रति आसन प्रति बसगाडी 72 रुपये मोटर वाहन कर आकारण्यात येतो. कर्नाटक, आंध्र प्रदेश, केरळ आणि उत्तर प्रदेशात अशा प्रकारचा कर आकारण्यातच येत नाही.असे आकडीवारीवरुन दिसून येते.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

05-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) LL 2

DVG/ SBT/ MHM/ 14:05

श्री. मधुकर चव्हाण........

मला या ठिकाणी आणखी एक मुद्या मांडावयाचा आहे. शासनाने या ठिकाणी खाजगी बस वाहतूक सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. महामंडळाला सरकारकडून आर्थिक सहाय्या बाबतचा पाठपुरावा करण्याऐवजी खाजगीकरण करण्याचा शासनाचा छुपा कल दिसतो आहे. दुसऱ्या एका गोष्टीमध्ये शासनाकडून, महाराष्ट्रातील काही ठराविक एस.टी स्टँण्डस आहेत त्यामध्ये मुंबई,सोलापूर, पुणे,किंवा नाशिक असे एकूणच शासनाच्या ताब्यात जे एस.टी स्टॅण्ड आहेत, त्या जमिनी निमसरकारी संस्था, सरकारी संस्थांकडे आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला 465 कोटी रुपये शासनाकडून मिळणे आवश्यक आहे. ते सुध्दा शासनाने दिलेले नाहीत. वस्तुत: एस.टी. महामंडळाकडे चांगले भूखंड होते ते भूखंड रिलायन्सला दिले याचा उल्लेख मी परवा केलेला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे एस.टी मध्ये कशा प्रकारचा कारभार चालू आहे याबाबतही येथे चर्चा झालेली आहे त्यामध्ये टायरच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भामध्ये उल्लेख केला होता. तेथे दोन कोटी रुपयांचा टायरचा भ्रष्टाचार झाला होता. आपण त्या ठिकाणी ही गोष्ट मान्य केली होती व सी.आय.डी. चौकशी करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. आजपर्यंत त्याबाबतीत काहीही कारवाई झालेली नाही. कारण त्या भ्रष्टाचारामध्ये सामील असलेले अधिकारी अतिशय उच्च पदावरील आहेत व ते आता दुसऱ्या विभागामध्ये उच्च पदावर गेलेले आहेत. त्यांच्या बाबतीत असा शेरा मारलेला असताना आताचे जे अधिकारी आहे तें म्हणतात की, सी. आय.डी. चौकशी करण्याची काय आवश्यकता आहे ? मी आपणास विचारु इच्छितो की, आय.ए.एस. अधिकारी शासन चालवित आहेत की, मंत्री महोदय शासन चालवित आहेत ? शासनाने एस.टी महामंडळाला त्यांचे कोटयावधी रुपये देणे आवश्यक आहे. ते शासनाने त्यांना दयावे. एस.टी. चे मुंबई सेंट्रल मधील, महाड मधील डेपो पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, ते इतके गलिच्छ आहेत की, तेथे पिण्याच्या पाण्याची सोय सुध्दा आपण प्रवाशांना देऊ शकत नाही.

यानंतर श्री. रोझेकर..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.........

हे स्पर्धेचे युग आहे. स्पर्धेत टिकायचे असेल तर तुमच्या सेवा त्याच दर्जाच्या असल्या पाहिजेत. आसन व्यवस्था, बसेस वेळेवर सोडणे वगैरे सुविधा सुधारल्या पाहिजे. मी लाल डब्यात बसलो, असे म्हणणे भूषणावह नाही. "एस.टी.सर्वसामान्य माणसांसाठी सुरु केली आहे", या वाक्याचा उच्चार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी केला आहे. एस.टी.महामंडळातील अधिका-यांच्या भ्रष्टाचाराबाबत एक उदाहरण मी या ठिकाणी देऊ इच्छितो. मुंबईमधील दादर येथील एशियाड बस स्थानकाबाबतचा मुद्दा आम्ही ज्यावेळी सभागृहात उपस्थित केला होता त्यावेळी मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, बसस्थानकाच्या 200 मीटरच्या परिसरात खाजगी बस वाहतूक करणा-या कंपन्याचे कार्यालय असणार नाही. मी आपल्याला सांगू इच्छितो की, अशी कार्यालये एशियाड बस स्थानकाला लागूनच आहेत, कोहिनूर मिलच्या जवळपास 15/20 अशी कार्यालये आहेत. आम्ही सभागृहात आवाज उठविल्यामुळे हे खाजगी बस चालक रस्त्यावर उभे रहात नाहीत, एवढेच. परंतु, पूर्वी बस स्थानकावर उभ्या असलेल्या प्रवाश्यांना एशियाड बस तिकिटापेक्षा 20 रुपये कमी घेतो, 30 रुपये कमी घेतो, 100 रुपयांमध्ये पुण्याला पोहोचवितो, गाडीत पिक्चर दाखवतो, असे सांगून प्रवासी पळविण्याचे प्रकार होत असत. काय चालले आहे, हे राज्य आहे का, हे परिवहन खाते आहे का ? ग्रामीण भागातील नाही तर खुद्द मुंबई शहरातील हे उदाहरण आहे. त्या ठिकाणी खुल्लमखुल्ला तुमचे अधिकारी पैसे वसूल करीत असतात.

सभापती महोदय, एस.टी.महामंडळ तोटयात चालले आहे त्याचे कारण या महामंडळाकडे शासनाचे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. आय.ए.एस.दर्जाच्या अधिका-यांची एक प्रवृत्ती असते. एखादा आय.ए.एस. दर्जाचा अधिकारी जर मुंबई महानगरपालिकेमध्ये आयुक्त पदावर असेल आणि मुंबई महानगरपालिकेला शासनाकडून काही रक्कम येणे असेल तर तो महानगरपालिकेची बाजू घेतो व बाजू मांडतो. उदाहरणच सांगायचे झाल्यास म्हाडाकडून वेगवेगळया करापोटी सुमारे 1 हजार कोटी रुपये महानगरपालिकेला येणे होते. त्यामुळे आयुक्तपदी असलेल्या आय.ए.एस.दर्जाच्या अधिका-यांने सांगितले की, मी जरी आय.ए.एस.दर्जाचा अधिकारी असलो तरी आता मी मुंबई महानगरपालिकेमध्ये कार्यरत असल्यामुळे मी महापालिकेचा हेतू कसा साध्य होईल, याकडे लक्ष देणार. जे प्रशासकीय अधिकारी म्हणून एखाद्या विभागाचे प्रमुख असतात ते त्या विभागाचा फायदा

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..........

कसा होईल, हे पहात असतात. आय.ए.एस.दर्जाचे अधिकारी, श्री.गिल यांच्या लक्षात आणून दिले की, शासनाकडून एवढे पैसे येणे आहेत तर त्यांचे उत्तर असते की, बैठक घेऊ, बघू, अधिका-यांना विचारु, फाईल माझ्याकडे आली नाही, मंत्र्यांकडे जाणे आवश्यक आहे, माझ्याकडे खूप काम आहे.

सभापती महोदय, एस.टी.हे सर्वसामान्य माणसाचे वाहन आहे, ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेचे वाहन आहे. त्यामुळे एकूणच एस.टी.महामंडळाचा कारभार सुधारावयाचा असेल तर चांगली वाहने उपलब्ध करुन देणे, चांगली आसन व्यवस्था ठेवणे, गाडया वेळेवर सोडणे, कंडक्टर, ड्रायव्हर यांनी प्रवाश्यांशी सौजन्याने वागणे, त्यांना प्रशिक्षण देणे अशा उपाययोजना अंमलात आणाव्या लागतील. "प्रवाश्यांशी सौजान्याने वागा", अशा प्रकारची अनेक सुभाषिते वाहनांवर लिहिलेली आपल्याला दिसतात. दररोज शाळेतील फळयांवर मुलांकडून सुविचार लिहून घेतली जातात. "पर स्त्री ही मातेसमान असते" असे सुविचार केवळ फळयावर लिहून लोकांच्या वागण्यात बदल घडला असता तर समाजात बलात्काराच्या घटना घडल्या नसत्या. सुभाषिते माणसाच्या मनावर संस्कार करतात, हे खरे आहे पण त्यासाठी संस्कारक्षम मन असले पाहिजे. आपण नेहमी बघतो की, अनेक ड्रायव्हर, कंडक्टर त्यांच्या कर्तव्यावर असतांना दारु प्यायलेले असतात. मी मंत्री महोदयांचा आभारी आहे की, ते माझ्या मताशी सहमत आहेत, सरकारमधील एक मंत्रीच सहमत आहेत.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर चव्हाण यांनी माझ्याकडे पाहून असा उल्लेख केला की, ड्रायव्हर, कंडक्टर कर्तव्यावर असतांना दारु प्यायलेले असतात. मी बसूनच असे म्हणालो की, "बहुजन हिताय, बहुजन सुखाय." असा एस.टी.चा हेतू आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माफ करा, माझा गैरसमज झाला की, मंत्री महोदय माझ्या म्हणण्याशी सहमत आहेत. मंत्री महोदय जे बोलले ते अतिशय हळू आवाजात बोलले, ते किर्तनकार असल्यामुळे मृदू बोलतात. परंतु, मी त्यांना सांगू इच्छितो की, येथे "अधिकारी हिताय, अधिकारी सुखाय" अशी परिस्थिती आहे. तुमची सगळी घोषवाक्य ही वोट कॅचिंग असतात, सत्तेंचा मुकुट आपल्या डोक्यावर सतत रहावा म्हणून हा प्रयत्न असतो आणि एकदा का सत्तेचा मुकुट डोक्यावर आला, सत्ता तुमच्या पदरात पडली की मतदारांना तुम्ही लाथाडता.

..3..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...........

सभापती महोदय, मी दोन-तीन महत्वाच्या मुद्यांचा उल्लेख माझ्या भाषणात केला आहे. सी.आय.डी.चौकशीचे काय झाले, राज्यातील सर्व एस.टी.डेपो, एस.टी.स्टॅण्ड बी.ओ.टी.तत्वावर अंबानींना देणार का ? या बाबींचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा, अशी विनंती करतो आणि थांबतो.

---------------

..4...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मराव बाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर चव्हाण यांनी अर्धा तास चर्चेच्या सूचनेच्या अनुषंगाने एस.टी.महामंडळाबाबत आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यांनी काही चांगल्या सूचनाही या निमित्ताने केल्या आहेत.

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम.......

परिवहन महामंडळाच्या माध्यमातून आज आपल्या येथे जवळ जवळ 15,000 एस.टी.बसेस सुरु आहेत व त्या गाडयांमधून सुमारे 58 लाख प्रवासी रोज प्रवास करतात. या दोन अडीच वर्षाच्या काळामध्ये आपण पाहिले तर आपल्या असे लक्षात येईल की, परिवहन महामंडळाला ना तोटा ना फायदा या परिस्थितीमध्ये आणण्याचे काम या आघाडी सरकारने हाती घेतलेले आहे आणि त्यात आपण कामयाब झालेलो आहोत,हे मला या निमित्ताने या ठिकाणी सांगावयाचे आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे एस.टी.महामंडळाच्या एकूण 15,000 गाडया महाराष्ट्रामध्ये सुरु आहेत परंतु अकोट व्हाया धारणी हा जो रस्ता बांधलेला आहे. जागतिक बँकेच्या माध्यमातून बांधलेला आहे. दुर्गम व आदिवासी भागातून परिवहन महामंडळाची एकही एस.टी.बस सुरु नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे एस.टी.महामंडळ तोटयात चालू आहे.

( गोंधळ )

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, माझ्या भागापेक्षा म्हणजे भामरागडपेक्षा इतर कुठलाही इतर दुर्गम भाग असू शकतो, असे मला वाटत नाही. आज एस.टी.महामंडळच्या एकूण 15,000 हजार एस.टी.बसेस सुरु आहेत, ही गोष्ट खरी आहे. जर आपल्या भागामध्ये आपण सांगितलेल्या अकोट - धारणी या मार्गावर एकही बस सुरु नसेल तर आपण वेळ सांगावी, तेथे ताबडतोब बससेवा सुरु करण्याचे निदेश दिले जातील. एस.टी.महामंडळ फायद्यात चालावे याकरिता दोन महिन्यांपासून महामंडळाने अनेक योजना चालू केलेल्या आहेत उदा. दोन महिन्यामध्ये प्रत्येक दिवशी एका गाडीमध्ये निदान चार प्रवासी तरी वाढले पाहिजेत, या दंडकाप्रमाणे या दोन महिन्याच्या कालावधीमध्ये प्रवाशांची संख्या एक कोटीपर्यंत गेली होती, तसेच त्यातून महामंडळाला 50 - 55 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळालेले आहे, अशा प्रकारे एस.टी.महामंडळाच्या माध्यमातून जी कामे सध्या सुरु आहेत,या कामांच्या माध्यमातून सन 2007 2008 मध्ये एस.टी.महामंडळ हे थोडयाफार फायद्यामध्ये आणण्याचा प्रयत्न आमचा विभाग करीत आहे, हे मी यानिमित्ताने या सदनाला सांगू इच्छितो. परीवहन महामंडळामध्ये झालेल्या टायर घोटाळयाबाबत या सदनामध्ये मी उत्तर दिल्याप्रमाणे चौकशी आणि कारवाई चालू आहे यामध्ये कोणत्याही दोषी अधिका-याला शासन पाठीशी घालणार नाही,

NN -2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मराव बाबा आत्राम......

त्यांच्यावर योग्य ती कारवाई लवकरात लवकर केली जाईल, हे मी या निमित्ताने शासनाला सांगू इच्छितो. आपल्या राज्यामध्ये ग्रामीण भागामध्ये 17.5 टक्के प्रवासी कर आकारला जातो व आंध्र प्रदेश,तामिळनाडू या राज्यांमध्ये अनुक्रमे 12.5 व 5 टक्के प्रवासी कर आकारला जातो, हे सगळे होत असतांना सुध्दा मध्यंतरी डिझेलचे भाव कमी झाल्यामुळे देखील या एस.टी.महामंडळाला फायदा झाला. दुसरा जो मुद्दा सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मांडला की, एस.टी.महामंडळामध्ये सुविधा नाहीत. परिवहन महामंडळाच्या ज्या 55 जागांवर बी.ओ.टी.तत्वावर कामे सुरु केलेली आहेत त्या कामांच्या माध्यमातून महामंडळाला 25 कोटी रुपयांचा फायदा झालेला होता. रिलायन्स ला आपण जे काम सांगितले होते ते माननीय सभापतींच्या निदेशानुसार थांबविण्यात आलेले आहे. परीवहन महामंडळाच्या 55 जागांवरील कामांपैकी फक्त एकच काम जे 40 टक्के पूर्ण झालेले आहे ते माननीय उपसभापतींच्या आदेशानुसार थांबविण्यात आलेले आहे. बाकी सर्व कामे ॲज ईट इज आहे त्याच अवस्थेत आहेत. एस.टी.महामंडळाने जो 283 कोटी रुपयांचा अधिक कर घेतलेला आहे, त्यावर ॲटॉर्नी जनरल यांनी सुध्दा आक्षेप घेतलेला आहे, त्यासंदर्भातील एक फाईल आमच्या विभागाकडे आलेली आहे. सदर पैसे वापस एस.टी.महामंडळाला मिळाले पाहिजे या दृष्टीकोनातून आमचा विभाग प्रयत्न युध्द पातळीवर करणार आहे, ही गोष्टही मी या ठिकाणी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री.बोरले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मागच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये दिनांक 6 मार्च, 2006 रोजी माननीय मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेला दिलेल्या उत्तरामध्ये सी.आय.डी. चौकशी करण्यात येईल, असे सांगितले होते. चौकशी करण्यासाठी एक वर्षे लागते काय, चौकशी करण्यासाठी एक वर्षे का लागले ? दोन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे, हे शासनाने मान्य केलेले आहे. त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले पाहिजे. आय.ए.एस. अधिका-यांचा या भ्रष्टाचाराशी संबंध आहे काय ? या भ्रष्टाचाराशी एखाद्या क्लार्कचा संबंध असता तर त्याला निलंबित केले असते. सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. एस.टी. महामंडळ तोटयामध्ये चालले आहे, असे सांगितले जाते. दोन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे, त्यासंदर्भात कोणती कारवाई करण्यात आली ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, विधानपरिषदेमध्ये लक्षवेधी सूचनेला दिलेल्या उत्तरामध्ये सी.आय.डी. चौकशी करण्यात येईल, असे मी सांगितले होते. सी.आय.डी. चौकशी करण्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेबाबत समाननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अत्यंत महत्वाची अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. खाजगी प्रवासी वाहतूक करणा-यांवर कारवाई करण्याचे अधिकार पोलीस खात्याला आणि आर.टी.ओ.ला असतात. प्रत्येक गाडीमागे पोलिसांचे आणि आर.टी.ओ. यांचे हप्ते ठरलेले आहेत, हे आता लपून राहिलेले नाही. एस.टी. डेपोच्या आवारामध्ये खाजगी प्रवासी वाहतूक करणा-यांवर डेपो मॅनेजरला कोणत्याही प्रकारची कारवाई करता येत नाही. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करावी लागते. एस.टी. डेपोच्या आवारामध्ये खाजगी प्रवासी वाहतूक करणा-यांवर कारवाई करण्याचे अधिकार शासन डेपो मॅनेजरला देणार काय ? एस.टी. महामंडळाच्या बस गाडयांची लांबी जास्त आहे. एस.टी. डेपोच्या आवारामध्ये पटकन जीप येते आणि प्रवासी भरुन निघून जाते. एस.टी. महामंडळ नफयामध्ये नेण्यासाठी काही ठिकाणी मिनी बसेस सुरु करण्यात आलेल्या आहेत. एस.टी. महामंडळ नफयामध्ये येण्यासाठी शासन जास्तीत जास्त मिनी बसेस वापरामध्ये आणणार काय ?

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, एस.टी. डेपोच्या आवारामध्ये अवैध वाहतूक होत असेल तर अवैध वाहतूक करणा-यांवर दंड आकारण्याचे अधिकार पोलीस आणि आर.टी.ओ. यांना आहेत. पोलीस स्टेशनमध्ये गाडी जमा करण्याचे अधिकार देखील त्यांना आहेत. माझ्या गावामध्ये अवैध वाहतूक करणा-या गाडया पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी असे सांगितले की, एस.टी. डेपोच्या आवारापासून 200 किलोमीटर परिसरामध्ये खाजगी प्रवासी वाहतूक करणारी गाडी येता कामा नये. त्यादृष्टीकोनातून आर.टी.ओ. यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी सूध्दा अशा प्रकारे प्रवासी घेऊन जाण्याचे काम सुरु असेल तर संबंधित अधिका-यांवर ताबडतोब कारवाई केली जाईल. मिनी बस तोटयामध्ये गेल्यामुळे मिनी बसेस बंद करण्यात आलेल्या आहेत.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एस.टी. महामंडळाच्या अत्यावश्यक सेवेबाबत महत्वाची अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. सी.आय.डी. चौकशीसंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. त्यासंदर्भात माझा असा प्रश्न आहे की, शासनाने त्या अधिका-यांवर कायद्यानुसार कारवाई केलेली आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अनेक ठिकाणच्या बस स्थानकांची सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करता शासनाकडे किती नवीन बस स्थानकांची मागणी आलेली आहे ?

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MHM/ KTG/ पूर्वी श्री.बोरले 14:25

श्री.संजय केळकर .....

शासनाने या आर्थिक वर्षामध्ये किती बसेस व बस स्थानकांना मंजूरी दिलेली आहे, ही बस स्थानके केव्हा बांधणार आहात ? माझा तिसरा प्रश्न आहे की, ठाणे परीसरातील वाहतूक प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले आहे. यामध्ये खोपट या नवीन बसस्थानकाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. बी.ओ.टी. तत्वावर हे काम केलेले आहे, परंतु आपण हे बसस्थानक केव्हा सुरु करणार आहात ? खाजगी बसगाडयांना प्रवासी वाहून नेण्याची परवानगी दिलेली आहे, परंतु शासनाने पुरेसे लक्ष न दिल्याने ते मुजोर झालेले आहेत, वाटेल तसे वागतात, वाटेल तशी भाडे आकारणी केली जाते, त्यामुळे प्रवाशांवर अन्याय होत आहे. खाजगी प्रवासी वाहतुकीसाठी कठोर नियम करणे आवश्यक आहे. तसेच एस.टी. महामंडळात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत कोणती कारवाई सुरु आहे ? याची माहिती मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, ठाणे परीसरातील खोपट येथील नवीन बस स्थानकाचे बांधकाम पूर्ण झाल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, या बसस्थानकाच्या उद्‌घाटनाची वाट पाहिली जाणार नाही, हे बसस्थानक उद्यापासून सुरु करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, खाजगी बसेसना बेकायदेशीर प्रवासी टप्पा वाहतुकीस शासन परवानगी देणार नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील एस.टी.ची तुलना इतर राज्यातील वाहतुकीशी केली तर अतिशय चांगली बस सेवा आपले एस.टी.महामंडळ देत आहे. परंतु महत्वाचा मुद्दा हा आहे की, अवैध खाजगी वाहतुकीला आळा घातला पाहिजे. एस.टी.महामंडळ फायद्यात आणवयाचे असेल तर एस.टी. महामंडळाला गृह खात्याच्या मदतीची आवश्यकता आहे. खाजगी वाहनातून अवैध वाहतूक करताना पूर्वी जास्तीत जास्त प्रवासी वाहनात बसविले जात होते, आता तर टपावर बसविले जात आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, याबाबत डेपो मॅनेजरला अधिकार देण्यात यावेत. माझे म्हणणे आहे की, अवैध वाहतूक करणारे लोक डेपो मॅनेजरला घाबरणार नाहीत. गृह खात्याच्या माध्यमातून शासन अवैध वाहतुकीवर काही कारवाई करणार आहे का ? अवैध प्रवासी वाहतूक रोखली तर निश्चितपणे एस.टी.महामंडळ फायद्यात येईल, असे मला वाटते. याबाबत शासनाच्या माध्यमातून काही पावले उचचली जाणार आहेत का ? हे मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MHM/ KTG/

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सजेशन फॉर ॲक्शन.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध समस्येबाबत मी बोलू इच्छितो. मी बऱ्याच वेळा एस.टी. ने प्रवास करतो. बसस्थानकावरील अस्वच्छतेबाबत मी बोलू इच्छितो. बऱ्याच ठिकाणी पाहिले की, गाव स्वच्छ आहे परंतु एस.टी.स्थानकावर अत्यंत अस्वच्छता आहे. काटेरी झाडे झुडपे कंपाऊंडजवळ वाढलेली असतात, स्वच्छतागृहाची दुर्दशा झालेली असते, बसस्थानक व परिसर अत्यंत अस्वच्छ असतात. खाजगी बसचे कर्मचारी बसस्थानकामध्ये राजरोसपणे येऊन प्रवासी पळवून नेतात. या विविध बाबींकडे डेपो मॅनेजरचे व शासनाचे लक्ष नाही. शासनाने डेपो मॅनेजरला बसस्थानक स्वच्छ ठेवण्याच्या कडक सूचना द्याव्यात. या अनुषंगाने माझा प्रश्न आहे की, बसस्थानक व डेपो स्वच्छ ठेवण्यासाठी शासन कोणती कारवाई करणार ?. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार गाव तेथे एस.टी. जाणार आहे. तसेच जेथे चांगले रस्ते असतील तेथेही एस.टी. गेली पाहिजे. परभणीपासून एक नवीन आंतरराज्य महामार्ग जात आहे या मार्गावर अकोट गाव आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. खोटरे ...

तेव्हा या आदिवासी भागामध्ये एकही एसटीची बस चालू नाही. तेथे सर्व आदिवासी लोक राहतात म्हणून त्या मार्गाने ताबडतोब एसटीची बस सेवा सुरू आपण करणार का ? कारण अनेकदा आपले ड्रायव्हर-कंडक्टर जेव्हा त्या भागात जातात तेव्हा तेथे घाट आहे म्हणून तेथे जाण्यास नाकारतात...

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, जेथे जेथे गैरसोय असेल तेथे सोय करण्याच्या दृष्टीने विभाग प्रयत्न करील. तसेच आपल्याला बसचा कोणता टाईम पाहिजे आहे ते सांगितल्यास त्याप्रमाणे बस सुरू करू.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, एसटी डेपोच्या ठिकाणी एसटी प्रवाशांची मोठी गैरसोय होत असते. एसटी महामंडळाचे बस डेपो असतात तेथे 200 मीटरच्या परिसरामध्ये खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांना उभे राहण्यास, प्रवासी गोळा करण्यास बंदी आहे म्हणून आपण सांगता पण प्रत्यक्षात त्या ठिकाणी अवघ्या 10 मीटरवर खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्या उभ्या राहून एसटीचे प्रवासी त्यात भरून घेऊन जात असतात. इतकेच नाही तर ते त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी अक्षरश: कोंबून, 20-20 प्रवासी घेऊन जात असतात पण त्यांच्यावर आरटीओ वा पोलीस खाते काहीही कारवाई करीत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, या संबंधात प्रवाशांची सोय नीटपणे व्हावी आणि एसटीचे प्रवासी देखील एसटी पासून दुरावले जाऊ नयेत म्हणून तसेच दररोज होणाऱ्या खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांचे अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आपण काही उपाय योजना करणार आहात का ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आज आमच्या एसटी मध्ये प्रवासी संख्या वाढते आहे आणि दुसरे असे की, 200 मीटर परिसरात खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांना बंद असल्याचे मी सांगितले आहच पण त्याहीपुढे जाऊन मी सांगू इच्छितो की, असे प्रकार त्या भागात आढळले तर वेळ पडल्यास अशा गाड्या जप्त करण्याबाबतची देखील कारवाई आपण करू.

**उपसभापती** : ठीक आहे. अर्धा तासाची चर्चा आता संपलेली आहे.

....... क्यूक्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>आजच्या कार्यक्रमपत्रिकेतील अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्याबाबत.</u>

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांची एक तसेच श्री.कपिल पाटील यांची एक अर्धा तास चर्चा अशा दोन अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

सभागृहापुढील आजचे कामकाज संपले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन, सोमवार, दिनांक 9 एप्रिल, 2007 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 32 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 9 एप्रिल, 2007 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही